स्नेहवर्धक मंडळ सोशल अ‍ॅन्ड एज्युकेशनल ट्रस्ट
बी.एड् कॉलेज, तळेगाव दाभाडे

Accredited with B+ by NACC

# शब्दवेध : भाषा आणि विचार




आविष्कार प्रकाशन

मराठी अध्यापनशास्त्र विभाग
(२७ फेब्रुवारी २०२६)

ISBN NO. 9789395127042



सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थी



कम्युनिटी एंगेजमेंट उपक्रमांतर्गत बीएड प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी गणेश मूर्ती सजावट केली.



आनंद बाजार महोत्सवात खाद्य पदार्थाचा स्टॉल चालवताना बी एड प्रथम वर्षातील विद्यार्थी



सामाजिक उपक्रमांतर्गत तळेगाव वन उद्यान येथे वृक्षारोपण करताना बी एड प्रथम वर्षातील विद्यार्थी



वार्षिक स्नेहसंमेलनात बी एड प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी मराठी संस्कृतीचे दर्शन घडवणारे नृत्य सादर केले




विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ केला. स्वच्छता अभियानात सहभागी झालेले विद्यार्थी.

# शब्दवेध: भाषा आणि विचार


**सल्लागार मंडळ**

**डॉ. पल्लवी वर्तक**

(बी. एड. महाविद्यालय प्राचार्या)

**संपादक**

**प्रा. शितल महाले**

(बी. एड महाविद्यालय मराठी अध्यापन विभाग प्रमुख)

**सह संपादक**

**प्रा. सोनी मोरे**

(बी. एड महाविद्यालय ग्रंथपाल)

**शर्मिला शिंदे**

(बी.एड प्रथम वर्ष विद्यार्थिनी)

**निलम अडागळे**

(बी.एड प्रथम वर्ष विद्यार्थिनी)

**कार्यकारी संपादक**

**श्रीपाद शिंदे**

(बी.एड प्रथम वर्ष विद्यार्थी)

**मांडणी आणि पृष्ठसज्जा**

**आम्रपाली गायकवाड - बडगुजर**

मुद्रक

**ओंकार आर्ट, पुणे**

प्रकाशक

**आविष्कार प्रकाशन**

मलपृष्ठ

**अश्विनी बुट्टे**

(बी.एड प्रथम वर्ष विद्यार्थिनी)

# अंतरंग

संपादकीय : ५ | प्राचार्या - शुभेच्छा : ६ । प्रस्तावना : ७

## विभाग- I : भाषा आणि तंत्रज्ञान

१. मराठी दिन विशेष : कुसुमाग्रज आणि मराठी भाषा- सहा. प्रा. शितल महाले : ९
२. मराठी भाषेची स्थित्यंतरे : श्रीपाद शिंदे : ११
३. मराठी भाषेची प्राचीनता आणि वैशिष्ट्ये : पुजा गोंधळी : १४
४. शिवसाहित्य व मराठी भाषा : सहा. प्रा. अस्मा शेख : १५
५. मराठी साहित्यातील महान साहित्यिकांचे योगदान - अंकिता साळुंखे : १७
६. मराठी बोलीभाषा आणि मराठीची विविध रूपे - सहा. प्रा. हेमा देशमुख : १९
७. मराठी भाषा : माझी ओळख, माझा अभिमान- पल्लवी कांबळे : २१
८. मराठी भाषा टिकवण्यासाठी आजची पिढी काय करू शकते? - प्रणिता कोल्हापुरे : २२
९. अभिजात दर्जा व शिक्षण क्षेत्रातील बदल - मनोज देशपांडे : २४
१०. कृत्रिम युगातील (AI) मराठी भाषा: नव्या शक्यता - सहा. प्रा. सुहासिनी सूर्यवंशी : २५
११. आजचा विद्यार्थी, AI आणि मराठी भाषा - पौर्णिमा चौगुले : २८
१२. AI आधारित शिक्षण आणि मराठी विषयाचे बदलते स्वरूप - गणेश सूर्यवंशी : २९
१३. मोबाईलमधील मराठी : AI ची कमाल - मोनिका पालवे : : ३१
१४. डिजिटल युगात मराठी : संधी आणि आव्हाने - नेहा पोवार : ३२
१५. डिजिटल ग्रंथालय: मराठी ज्ञान परंपरेची नवी दिशा - सहा. प्रा. सोनी मोरे : ३३
१६. डिजिटल ग्रंथालय आणि मराठी विषयाचे बदलते स्वरूप - अंकिता चोपडे : ३७

## विभाग- II : शिक्षकाभिमुख लेख

१. भावी शिक्षकांची भाषिक जबाबदारी - डॉ. पल्लवी वर्तक : ४०
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि शिक्षक शिक्षण - सहा. प्रा. अलका नारखेडे : ४२
३. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि मातृभाषेचे महत्त्व- शर्मिला शिंदे : ४६
४. NEP 2020 नुसार शिक्षक शिक्षणातील बदल - हर्षा थारवानी :४८
५. मराठी भाषेचा शालेय जीवनावर होणारा प्रभाव - नरवाडे रोहित : ५०

## विभाग-3 : साहित्यिक विभाग

१. प्रेरणादायी शिक्षक व्यक्तिमत्व - साने गुरुजी - नीलम अडागळे : ५२
२. रीत जीवनाची (कविता ) - सुवर्णा वीर : ५४
३. शिक्षक मुलाखत - कल्याणी शिंदे : ५५
4. लाडकी लेक (कविता ) - शीतल पाटील : ५८
५. शिक्षण धोरणावर बोलू काही (संवादात्मक लेखन)- नमिता अपसिंगेकर :५९
६. पुस्तक परीक्षण - अश्विनी बुट्टे : ६१
७. नातं गुरु शिष्याचं (कविता ) - सरिता खोटे : ६२
८. चित्रपट परीक्षण - रुपाली फाटक : ६३
९. चारोळ्या - धनश्री वैद्य : ६५
10. शब्दकोडे - पुजा चव्हाण : ६६

# संपादकीय



मराठी भाषा व भावी शिक्षक या मध्यवर्ती संकल्पनेतून साकारलेले "शब्दवेध : भाषा आणि विचार" हे मराठी राजभाषा दिनानिमित्त प्रकाशित होणारे विशेष पुस्तक आपल्या सर्वांसमोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद आणि अभिमान वाटत आहे. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती विचारांची जननी, संस्कृतीची वाहक आणि समाजमन घडविणारी शक्ती आहे. मराठी भाषा आपल्या इतिहासाची, परंपरेची आणि अस्मितेची साक्ष देणारी समृद्ध परंपरा घेऊन आपल्यासमोर उभी आहे.

भावी विद्यार्थी-शिक्षकांना डोळ्यासमोर ठेवून, त्यांनी आपल्या मातृभाषा मराठीचा विविध अंगांनी विचार करावा आणि तिची समृद्धता व व्यापकता जाणून घ्यावी या उद्देशाने या पुस्तकात भाषाविषयक विविध लेखांचा समावेश करण्यात आला आहे. या लेखांमधून मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास, तिची वैशिष्ट्ये, स्थित्यंतरे आणि विविध रूपे यांचा अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे.

तसेच संतपरंपरेपासून आधुनिक साहित्यापर्यंत मराठी भाषेची वाटचाल कशी घडत गेली, तिच्यामध्ये वैचारिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तन कसे झाले, याचेही चित्रण विभाग एक मधील मराठी भाषेसंदर्भातील लेखांमध्ये आढळून येते. तसेच मराठी भाषेला मिळालेल अभिजातपण याचा अभिमान बाळगण्याबरोबरच आपली भाषा टिकावी, ती विकसित व्हावी यासाठी एक शिक्षक म्हणून आपण काय करू शकतो याचे देखील चिंतन काही लेखांमधून करण्यात आले आहे. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल माध्यमांचा शिक्षणव्यवस्थेवर व्यापक आणि दीर्घकालीन प्रभाव पडत आहे. अध्ययन -अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रक्रिया, शैक्षणिक साधनांची निर्मिती आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनशैलीत लक्षणीय बदल घडून येत आहे. माहितीचा वेग वाढला असून माहितीची सुलभता आणि उपलब्धता प्रचंड वाढली आहे. त्यामुळे भाषिक संवेदनशीलता आणि विचारांची सखोलता टिकवून ठेवणे ही आताच्या काळातील मोठी जबाबदारी बनली आहे. AI आता आपल्या खिशात सहज येऊन बसला आहे. AI आधारित साधनांमुळे भाषांतर,लेखन , ई-अभ्यासक्रम आणि डिजिटल ग्रंथालये यांसारख्या सुविधा सहज उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रसाराला नवी दारे खुली झाली आहेत. परंतु याच वेळी तंत्रज्ञानावर अति अवलंबित्व, सर्जनशीलतेत घट आणि भाषेतील अभिव्यक्तीची नैसर्गिकता कमी होण्याची शक्यता देखील वाढली आहे.

म्हणूनच या पुस्तकात AI आणि मराठी भाषा, डिजिटल युगातील संधी-आव्हाने, AI आधारित शिक्षण आणि शिक्षकाची बदलती भूमिका या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. तंत्रज्ञान हे पर्याय नसून सहाय्यक आहे, आणि मातृभाषा ही विचारांची पायाभरणी आहे . या दोन्हींचा संतुलित विचार मांडण्याचा प्रयत्न या लेखांमधून केला आहे. भारतीय शिक्षण क्षेत्रात तब्बल ३६ वर्षांनंतर जाहीर झालेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे शिक्षण व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारक पाऊल मानावे लागेल. या धोरणावर देशभर व्यापक मंथन घडून आले. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर विविध चर्चासत्रे, परिसंवाद आणि परिषदांचे आयोजन सातत्याने करण्यात आले. शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अभ्यासक, विचारवंत आणि संशोधक यांनी आपले दृष्टिकोन या धोरणातून मांडले आहेत. या धोरणाने सुरुवातीपासूनच राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन स्पष्ट केला असून अध्ययन-अध्यापन क्षेत्रात एक उत्साहवर्धक वातावरण निर्माण केले आहे. विशेषतः मातृभाषेच्या संदर्भात व्यापक चर्चा घडवून आणत, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच शिक्षक शिक्षणातील संरचनात्मक आणि गुणवत्तावर्धक बदलांवरही ठोसपणे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे विभाग दोन मध्ये एन. ई. पी. संदर्भात शिक्षकांच्या भूमिकेचे विविध पैलू उलगडून दाखविणारे अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट करण्यात आले आहेत.

विभाग तीन हा या पुस्तकाचा सर्जनशील भाग असून या विभागातून विद्यार्थी-शिक्षकांच्या विचारांना आणि अभिव्यक्तीला मुक्त वाव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्वरचित कविता, चारोळ्या आणि संवादात्मक लेखनाच्या माध्यमातून त्यांची संवेदनशीलता आणि अनुभवांचे विविध रंग दिसून येतात. याचबरोबर चिकित्सक आणि विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित व्हावी या हेतूने चित्रपट परीक्षण आणि पुस्तक परीक्षण यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच आदर्श शिक्षकाच्या मुलाखतीद्वारे एक शिक्षक विद्यार्थ्यांना घडविwण्यासाठी कोणते प्रयत्न करतो, त्याची शैक्षणिक मूल्ये आणि कार्यपद्धती काय असते, याचे मार्गदर्शन विद्यार्थी शिक्षकाला मिळते. एकूणच मातृभाषेच्या माध्यमातून विचारांची पायाभरणी दृढ करत, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण अधिक समृद्ध करण्याचा दृष्टिकोन तसेच भाषा जपणे, विचार समृद्ध करणे आणि शिक्षक म्हणून जबाबदारीने समाज घडणीच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठीच्या जाणिवा दृढ करण्याचा हा एक लहानसा पण मनापासून केलेला प्रयत्न आहे. धन्यवाद.

- सहा. प्रा. शितल महाले

# प्राचार्याचा - शुभेच्छा संदेश



सर्वप्रथम सर्व विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे मनापासून अभिनंदन ! मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित केलेल्या हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. दरवर्षी ह्या दिवशी विविध उपक्रम जसे मराठी भाषा काव्य वाचन, शब्द कोडे, म्हणी, निबंध स्पर्धा घेतल्या जातात. परंतु ह्यावर्षी मराठी विषयाचे "शब्दवेध : भाषा व विचार" हे संक्षिप्त लेखांचे पुस्तक आपल्या महाविद्यालयातील मराठी अध्यापन शास्त्र विभागाने तयार केले आहे. त्याबद्दल सर्वांचे मनापासून कौतुक आहे. या उपक्रमाने फक्त मराठी विषयाच्या नव्हे तर इतरही सर्व विषयाच्या शिक्षक विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळाली. आपण शिक्षक म्हणून मराठी भाषा संवर्धनाकरिता नेमकं काय करू शकतो याबद्दलचा विचार दृढ झाला. विशेष म्हणजे अशा एखाद्या उपक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी, त्याकरता लागणारे वेगवेगळे स्त्रोत इत्यादींची माहिती मिळाली. हा अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. त्याचे मार्गदर्शन प्राध्यापक शितल महाले, प्राध्यापक सोनी मोरे यांनी अतिशय उत्तम प्रकारे केले. त्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन!

तसेच सृजनशील उपक्रम दरवर्षी व्हावेत व विद्यार्थ्यांना वेगवेगळे अनुभव मिळावे.

याकरीता सदैव प्रोत्साहन देणार्या स्नेहवर्धक ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाचे मन:पूर्वक आभार! विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा!

**डॉ. पल्लवी वर्तक**

प्राचार्या, एस.एम.एस.ई.टी, बी.एड. महाविद्यालय तळेगाव दाभाडे

# प्रस्तावना



नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी झाली आणि प्रादेशिक भाषांना प्रचंड महत्व आले. सर्वसमावेशक शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रादेशिक भाषा अभ्यासक्रमात बंधनकारक करण्यात आल्या. भाषेची निर्मिती मुळातच विनिमयाचे माध्यम म्हणून झाली. माय मराठीचा हजारो वर्षांचा इतिहास आपल्याला तिचे वारसदार म्हणून खूप समृद्ध करणारा आहे. हाल राजाच्या गाथासप्तशती पासून आजच्या उत्तर आधुनिक कालखंडामध्ये मराठी भाषेत विपुल साहित्य निर्मिती झाली. त्या त्या कालखंडाचा प्रभाव भाषेवर पडत गेला आणि मराठी संस्कृती बहरत गेली.

स्नेहवर्धक मंडळाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने शब्दवेध:भाषा आणि विचार या पुस्तिकेचे प्रकाशन मराठी भाषा दिनाच्या पार्श्वभूमीवर होत आहे. इतका स्तुत्य उपक्रम राबविणारे संस्थेचे व त्या संस्थेचा भाग असलेल्या सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. स्नेहवर्धक मंडळ आपल्या अनेकविध उपक्रमशीलतेने मावळ तालुक्यात सदैव नावलौकीकास पात्र आहे. मावळ तालुक्याला जगद्गुरु तुकोबारायांच्या प्रबोधनाचा भक्कम वारसा लाभला आहे. शब्दांना धन मानून संत तुकाराम महाराजांनी शब्दांशी इमान राखत समाजाला सज्ञान करण्याचे काम केले. शब्दवेध या पुस्तकाच्या माध्यमातून तुकोबारायांचा हाच शब्दांचा वारसा समाजाकडे हस्तांतरित होत आहे. यातून मराठी भाषेची समाजाला नक्कीच भावेल.

शब्दवेध मध्ये अंतर्भूत असलेले लेख मराठी भाषेच्या समग्र विश्वाला कवेत घेणारे आहेत. भाषेचा बहुआयामी खानाखुणा, भाषेतील गमती, कथा, कविता अशा विविध माध्यमातून मराठी भाषेची अभिव्यक्ती शब्दवेध मध्ये पाहायला मिळते. या सुंदर उपक्रमाच्या निमित्ताने स्नेहवर्धक मंडळाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेटे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे मनःपूर्वक आभार. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पल्लवी वर्तक आणि सर्व शिक्षक विद्यार्थी यांना मनःपूर्वक शुभेच्छा! धन्यवाद!

**डॉ. संभाजी मलघे**

प्राचार्य, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे

# विभाग- I
# भाषा आणि तंत्रज्ञान

मराठी दिन विशेष

# कुसुमाग्रज आणि मराठी भाषा

ज्यांच्या नावाने मराठी भाषेला गौरव मिळाला, तो तारा तारांगणातच नव्हे तर रसिकांच्या हृदयातही विराजमान आहे. असे साहित्य विश्वातील एक आदरणीय नाव - कविश्रेष्ठ कुसुमाग्रज. अर्थात –'ज्ञानपीठ' पुरस्कार प्राप्त विष्णू वामन शिरवाडकर. जनमानसातले तात्यासाहेब! कवी, लेखक, साहित्यिक अनेक होते, आहेत व असतील ; परंतु ज्यांचे शब्द समाजाला जगण्याची प्रेरणा देतात; गडद काळोखात ठेच लागल्यानंतर त्यावर फुंकर घालतात व पुढील वाटचालीसाठी लख्ख प्रकाश देतात, असा साहित्यिक विरळाच . आपले वि.वा.शिरवाडकर म्हणजेच कविश्रेष्ठ कुसुमाग्रज हे त्यांपैकीच एक महत्त्वाचे भाषाप्रभू. २७ फेब्रु १९१२ या दिवशी पुणे येथे त्यांचा जन्म झाला व १० मार्च १९९९ रोजी त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. त्यांचा जन्मदिवस कृतज्ञतापूर्वक 'मराठी राजभाषा दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. इतका मोठा सन्मान त्यांना दिला जातो, कारण त्यांनी मराठी साहित्यात फक्त मोलाची भर घातली म्हणून नव्हे, तर आपल्या मातृभाषेला उचित सन्मान मिळावा म्हणून अविरत समाजजागरण केलं. उपेक्षित, तळागाळातील, बांधवांची प्रत्यक्ष सेवा केली आणि असंख्य मनामध्ये देशभक्ती, राष्ट्रभक्तीच्या ज्वाला प्रज्वलित केल्या.

**सहा. प्रा.**
**शितल महाले**



**" माझ्या मराठी मातीचा**
**लावा ललाटास टिळा**
**तिच्या संगाने जागल्या**
**द-याखो-यातील शिळा"**

अशा शब्दांत त्यांनी महाराष्ट्राचा गौरव केला. 'जीवनलहरी' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह असला तरी अवघ्या मराठी रसिकांनी त्यांना मानाने अभिवादन केले ते 'विशाखा' या संग्रहापासून. १९४२ साली म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळात आणि 'चले जाव!' सारख्या स्वातंत्र्य-चळवळीच्या झंझावाताच्या प्रहरात 'विशाखा' एखाद्या तलवारीच्या पात्यासारखी लोकांच्या हाती आली हाती आली आणि संपूर्ण समाज मनावर यातील कवितांनी अक्षरशः प्रहार केला. युवकांच्या धमन्यां धमन्यांतून राष्ट्रप्रेमाचे रक्त सळसळत ठेवण्याचे सामर्थ्य कुसुमाग्रजांच्या शब्दांत होते. "गर्जा जयजयकार क्रांतीचा, गर्जा जयजयकार" "अन् वज्राचे छातीवरती, घ्या झेलून प्रहार!" असे आवाहन करीत या कवितेने अक्षरशः स्वत्र्यलढ्यासाठी सर्वत्र रान जाग केल. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या प्रत्येक भारतीयाचा, क्रांतीकारकाचा आवाज त्यांच्या शब्दातून ओसंडून वाहत होता. मराठी भाषेचे तेज या शब्दांतुन आपल्याला दिसून येते. 'विशाखा' मधील

'कणा' सारख्या संवादी कवितेतून जगण्याच्या संघर्षाचे वर्णन करून या संघर्षातून नवे पंख निर्माण करणा-या आजच्या तरुणाचा कणखर कणा अर्थात कणखर मन त्यांनी मांडले.
महापुरात नवा संसार वाहून गेला, भिंत खचली... चूल विझली,
पण मन खचले नाही, जिद्धीची मशाल विझली नाही अशा
गरुडपंखी मनाचा तरुण आपल्या गुरुजींना म्हणतो,
खिशाकडे हात जाताच; हसत हसत उठला.
'पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार, पण मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून 'नुसतं लढ म्हणा!'

'क्रांतीचा जयजयकार' कवितेतील अनेक ओळी ह्या स्वतंत्रलढ्यासाठी जगण्याची प्रेरणा झाल्या. 'मृत्युंजय आम्ही! आम्हांला कसले कारागार?'
किंवा
**'कशास आई, भिजविशी डोळे,**

**उजळ तुझे भाळ**
**रात्रीच्या गर्भात उद्याचा**
**असे उष:काल,**

या काव्यपंक्ती आता वाचतानाही स्फूर्तीचे रोमांच अंगावर उभे राहतात, ‘कोलंबसाचे गर्वगीत’‘वेडात मराठे वीर दौडले सात, ‘अहि-नकूल’, ‘आगगाडी व जमीन’, ‘पृथ्वीचे प्रेमगीत’, ‘सात’, ‘टिळकांच्या पुतळ्याजवळ’, ‘निळा पक्षी’, ‘मातीचे गायन’, ‘समिधाच सख्या या, अशा त्यांच्या अनेक कविता माध्यमिक , उच्चमाध्यमिक स्तरावरील विद्यार्थी दशेत वाचायला हव्यात. शिक्षकांनी कवितेतील आवेग, गती, तेजोमय शब्द समजून सांगायला हवेत. डगमगले, तुटलेले आयुष्य शिखराकडे नेण्याचे अभूतपूर्व सामर्थ्य कुसुमाग्रजांच्या अनेक कवितांत आहे. त्या संपूर्ण मिळवून पुन्हापुन्हा वाचून घेणं, पाठ करून घेणं हाही विद्यार्थ्यांसाठी एक व्यक्तिमत्त्व विकासाचा उपक्रम होऊ शकेल. त्यासाठी भावी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे मला वाटते.

कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून समाज जागृत करणा-या व समर्पणाने आयुष्य शोषितांसाठी, उपेक्षित तसेच वंचित घटकांसाठी काम करणाऱ्या महापुरुषांचे दर्शन आपल्या साहित्यातून घडवले. त्यांनी त्यांच्या साहित्यामधून आजच्या सामाजिक सुख - दु:खांविषयी, वाढत्या विषमतेविषयी, शोषणाच्या पाशवी वृत्तीविषयी थेट संवादी लेखन लिहिले. महात्मा ज्योतीराव फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विद्यार्थी प्रिय साने गुरुजी, समाज सुधारक बाबा आमटे असे महामानव कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या कवितेतून साकारले गेले आणि त्यातून व्यक्तिपर केलेल्या कवितांना समाजपर कवितांचे परिमाण लाभले. ‘रसयात्रा’ ‘मुक्तायन’, ‘प्रवासी पक्षी’ असे काही त्यांचे कवितासंग्रह मिळवून शिक्षकांनी ते विद्यार्थ्यांकडून वाचून घेतले तर त्यातील महामानवाचे दर्शन आपल्याला घडून येते.

वि.वा.शिरवाडकरांची लेखणी कवितेप्रमाणेच नाट्यलेखनातही मनापासून रमली. त्यांच्या नाटकांचा विषय हा मानवी मन होता. त्यांनी आपल्या नाटकांतून मानवी मनातील खोल भाव भावनांचे, अथांगतेचे , अतर्क्य वर्तनाचे दर्शन घडवले. असं मानवी मन उलगडणारी- ‘दूरचे दिवे’, ‘वीज म्हणाली धरतीला’, ‘चंद्र जिथे उगवत नाही’ ही अनेक नाटके. शेक्सपिअरच्या नाटकांचे त्यांनी केलेले अनुवाद मराठी साहित्यातील स्वतंत्र लेखनाइतकेच प्रभावी ठरतात. मॅक्वेथ, ऑथेल्लो अशी काही अनुवादित नाटके भाषेचा डौल काय असावा आणि अनुवादातील परिणामकारकता पाहण्यासाठी जरूर वाचायला हवीत. परंतु त्यांच्या नाट्य लेखणीने सोन्याचा मुकुट मराठी भाषेवर चढवला तो 'नटसम्राट' या नाटकाने. अनेक नामवंत अभिनेत्यांनी ‘गणपतराव बेलवलकर’ ही केंद्रस्थानी असणारी व्यक्तिरेखा साकार केली. आताच्या पिढीला ‘नटसम्राट’ या शिरवाडकरांच्या नाटकाची ओळख झाली ती चित्रपटामुळे. नाना पाटेकर यांच्यासारख्या कसदार अभिनेत्याने-गणपतराव बेलवलकर-अर्थात नटसम्राटप्रभावी उभा करण्याचे आव्हान यशस्वीपणे पेलले. एका अतिशय यशस्वी नटाची त्याच्या घरातच, त्याच्या उतारवयात जी उपेक्षा होते, दोन पिढ्यांचा सामाजिक आणि भावनिक जो संघर्ष निर्माण होतो, तो ‘नटसम्राट’मधून असा काही साकार झाला आहे त्यातून मानवी मनाचे अनेक कंगोरे आपल्याला पाहायला मिळतात. "माणसं जोडण्यापेक्षा ती टिकवणं जास्त कठीण असतं, आणि टिकवण्यापेक्षा ती समजून घेणं त्याहूनही कठीण!"

तसेच

**जगावं कि मरावं हा एकच सवाल आहे**
**या दुनियेच्या उकिरड्यावर**
**खरकटया पत्रावळीचा तुकडा होऊन**
**जगावं बेशरम, लाचार आनंदानं**
**की फेकून द्यावं हे देहाचं लक्तर त्या गुंडाळल्या जाणिवेच्या यातनेसह मृत्यूच्या काळ्याशार डोहामध्ये?**
**खरं सांगतो बाबांनो**
**तुफानाला तुफानपणच नडतं आहे.**
**कुणी घर देता का घर !**
**तुफानाला महाल नको**
**राजवाड्याचा सेट नको**
**पदवी नको, हार नको**
**थैलीमधली भेट नको**
**एक हवं लहान घर,**
**पंख मिटून पडण्यासाठी**
**एक हवी आरामखुर्ची,**
**तुफानाला बसण्यासाठी!**
**आणि विसरू नका बाबांनो,**
**एक तुळशी वृंदावन हवं**
**मागच्या अंगणात..**
**सरकारसाठी!**

कुसुमाग्रजांच्या अशा अनेक आशयघन शब्द सुमनांची उदाहरणे देता येतील. त्यांचे विचार पुन्हा पुन्हा वाचून त्यातला विचार समजून घेणं व तो विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवण ही सुद्धा विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठीचा साधना आहे. अशा या महामानवाची रहाणी अतिशय साधी व सात्विक होती, स्वभावात लीनता, समाजातील सर्वच घटकांवर मनापासून प्रेम करणारी त्यांची करुणामय दृष्टी याचा अनुभव त्यांच्या जवळील प्रत्येकाने घेतला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील या गुणांमुळे त्यांची थोरवी त्यांच्या व्यक्तिमत्वातील अधिक खुलवते. समाजातील तरुण पिढीवर त्यांचे विशेष प्रेम होते. मराठी भाषेची त्यांना गोडी लागावी म्हणून त्यांच्या अखेरच्या काळात जोडाक्षरविरहीत सुबोध काव्यरचना त्यांनी केल्या. नाशिक मधील स्वत:च्या निवासातील काही भाग त्यांनी बाल वाचनालयासाठी दिला. चित्रकलेपासून अनेक कलांच्या विविध स्पर्धांचे आयोजन त्यांनी केले. असा थोर माणूस होणं कठीण. त्यांचा जन्मदिवस २७ फेब्रु. हा जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो, हा मराठी भाषेचा गौरव म्हणता येईल.

त्यांचे साहित्य वाचणे, मातृभाषेवर नि:स्सीम प्रेम करणे समृद्ध, आदर्श माणूस होणे हीच त्यांना आजच्या माराठी दिनानिमित्त आदरांजली असेल.

●●●

# मराठी भाषेची स्थित्यंतरे

## मराठीचा महाप्रवास: २३०० वर्षांचा देदीप्यमान इतिहास आणि नवी क्षितिजे

**अठरापगड जाती, विविध बोलीभाषा आणि समृद्ध संस्कृतीचा वारसा लाभलेली आपली 'माय मराठी' केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती महाराष्ट्राची अस्मिता आणि प्राणवायू आहे. 'मराठी' या शब्दाचा उच्चार करताच डोळ्यासमोर उभा राहतो तो नाणेघाटातील शिलालेख, ज्ञानेश्वरांच्या शब्दांतील अमृताचा गोडवा, छत्रपती शिवरायांनी जपलेले भाषिक स्वराज्य आणि कुसुमाग्रजांच्या लेखणीतून उमटलेली क्रांती. गेल्या २३०० वर्षांहून अधिक काळ अनेक स्थित्यंतरे सोसून, परकीय आक्रमणांचे प्रहार झेलून आणि अनेक राजवटींचे चढ-उतार पाहूनही ही भाषा आज अधिक टवटवीत आणि समृद्ध झाली आहे. गोदावरीच्या खोऱ्यात गुंजलेल्या 'महाराष्ट्री प्राकृत'पासून ते आजच्या डिजिटल युगातील 'युनिकोड'पर्यंत मराठीने आपला प्रवास अत्यंत आत्मविश्वासाने केला आहे. हा प्रवास नेमका कसा होता? तिला लाभलेले 'अभिजात'पण किती जुने आहे? आणि जागतिक पटलावर मराठीची मोहोर कशी उमटली आहे? या सर्व प्रश्नांचा वेध घेणारा हा एक विशेष संशोधन लेख...**

**श्रीपाद शशिकांत शिंदे**
बीएड, प्रथम वर्ष विद्यार्थी

### मराठी भाषेचा प्राचीन उगम आणि शिलालेख

मराठी भाषा प्रत्येक टप्प्यावर समृद्ध होत गेली. पूर्वी मराठीचा पद्य प्रकारात उपयोग सर्वाधिक होत असे, त्यामुळे बाराव्या आणि तेराव्या शतकातील बहुतांश साहित्य पद्य स्वरूपात आढळते. कर्नाटक मधील श्रवणबेळगोळ शिलालेखावर मराठीची पहिली ओळ 'श्री चामुंडराजे करवियले' अशी आढळते, ज्याचा काळ साधारणपणे दहाव्या शतकाचा मानला जातो. मात्र, मराठी भाषेचा उगम केवळ याच शिलालेखापुरता मर्यादित नाही, तर तिची पाळेमुळे अधिक खोलवर रुजलेली आहेत. लिखित पुराव्यांचा शोध घेतल्यास दोन हजार वर्षांपूर्वीचा पहिला लिखित ग्रंथ 'गाथा सप्तशती' आढळतो. सातवाहन राजा हाल याने गोदावरीच्या खोऱ्यातील कवींच्या रचनांचे संकलन करून हा ग्रंथ संपादित केला होता. यातील भाषा 'महाराष्ट्री प्राकृत' होती, जी मराठीची जननी मानली जाते. इसवी सन पूर्व ३०० मध्ये वररुची (कात्यायन) यांनी लिहिलेल्या 'प्राकृत प्रकाश' या ग्रंथातही याचा उल्लेख सापडतो. पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळ नाणेघाटात असलेल्या प्राचीन शिलालेखात मराठीचे अस्तित्व स्पष्टपणे दिसते. सातवाहन काळात हा शिलालेख राजा सातकर्णीची पत्नी नागनिका हिने करून घेतल्याचे पुरावे असल्याने, मराठी भाषेचा उगम किमान २३०० वर्षांपूर्वीचा असल्याचे निश्चितपणाने सांगता येते. त्यानंतर इसवी सन ११८८ मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' हा ग्रंथ लिहिला, तर महानुभाव पंथाचे माहिमभट्ट यांनी १२८३ मध्ये लिहिलेला 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला चरित्रात्मक गद्यग्रंथ ठरला.

### शिवकाळ आणि भाषिक स्वराज्याचा संकल्प

मराठी भाषेचे महत्त्व लक्षात घेत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासोबतच भाषेचेही स्वराज्य निर्माण करण्यासाठी पहिला मराठी शब्दकोश तयार करून घेतला. या शब्दकोश निर्मितीचे काम त्यांनी अमात्य रघुनाथ नारायण हणमंते यांच्यावर सोपविले होते. त्या काळात आदिलशाही, कुतुबशाही आणि मुघलशाही यांची सत्ता दीर्घकाळ असल्याने सरकारी कामकाज, न्यायदान आणि लष्करी व्यवहारात फारसी, अरबी व तुर्की शब्दांचा वापर अधिक वाढला होता. मराठी भाषा परकीय शब्दांच्या ओझ्याखाली दबली जात




होती. आपले स्वराज्य स्वभाषित असावे म्हणून महाराजांनी 'राज्यव्यवहार कोश' नावाने अत्यंत महत्त्वाची शब्दकोश निर्मिती केली. यामध्ये किल्लेदार, मुलुख, हुकूम, कारखाना, तबल यांसारख्या फारसी शब्दांच्या जागी अनुक्रमे गडकरी, देश, आज्ञापत्र, कार्यशाळा, नगारा असे सुमारे १५०० मराठी पर्याय दिले गेले. ही प्रक्रिया म्हणजे केवळ शब्दांचा संग्रह नव्हता, तर मराठीवरील परकीय भाषेचे अतिक्रमण उलथून लावण्याची एक मोठी सांस्कृतिक चळवळ होती. यामुळे मराठीला खऱ्या अर्थाने प्रशासकीय भाषेचा दर्जा प्राप्त झाला.

## ब्रिटिश राजवट आणि व्याकरणाची शिस्त

भारतातील ब्रिटिश राजवटीत १८१९ मध्ये माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन हे मुंबई प्रांताचे गव्हर्नर म्हणून आले आणि त्यांनी स्थानिक भाषेत शिक्षण देण्याचे महत्त्व ओळखले. त्यातूनच मराठी भाषेचा शिक्षणात उपयोग होऊ लागला. १८०५ मध्ये विल्यम कॅरी यांनी मराठी भाषेचे व्याकरण लिहायला घेतले होते आणि या कामाला एल्फिन्स्टन यांनी मोठे प्रोत्साहन दिले. विल्यम कॅरी यांच्या 'ए ग्रामर ऑफ दि मराठा लँग्वेज' या पुस्तकाने मराठी व्याकरणाचा पाया रचला. त्यानंतर १८२२ मध्ये स्थापन झालेल्या 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'मार्फत मराठीत व्याकरण, गणित आणि विज्ञानाची पुस्तके तयार करण्यात आली. मराठी भाषेच्या व्याकरणाचा खरा विकास आणि विस्तार दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी केला. १८३६ मध्ये त्यांनी 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' नावाचे पुस्तक लिहिले, जे आजही अधिकृत मानले जाते. ज्याप्रमाणे संस्कृतला पाणिनी यांनी शिस्त लावली, तशीच शिस्त तर्खडकरांनी मराठीला लावून दिली, म्हणूनच त्यांना 'मराठी भाषेचे पाणिनी' हा किताब मिळाला. त्यांनी वर्णविचार, शब्दविचार आणि वाक्यविचार अशा मुख्य भागात नियमांची अचूक मांडणी केल्याने मराठीला प्रमाण भाषेची मान्यता मिळाली.

## आर्या मयूरपंतांची

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात मोरेश्वर रामचंद्र पराडकर (मोरोपंत) यांनी मराठीसाठी दिलेले योगदान वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी रामायण आणि महाभारताचे मराठीकरण केले. त्यांनी मराठी भाषेत रामायण 108 प्रकारे लिहिले. उदाहरणादाखल सांगितले जाते की, त्यांनी 'निरोष्ठ्य' रामायण लिहिले. म्हणजे त्यांनी लिहिलेल्या रामायणात ओष्ठ्य गटातील प, फ, ब, भ, म हे शब्दच नाहीत. रामायणाचे असे 108 प्रकार त्यांनी लिहिले. मराठी भाषा त्यांनी एखाद्या लहान मुलाप्रमाणे आपल्या अंगाखांद्यावर खेळवली. मोरोपंतांनी 20 ओळींची एक कथा लिहिली. प्रत्येक ओळीत बारा अक्षरे होती. ही अक्षरे आडवी, उभी कशीही वाचली तरी त्याचा तोच अर्थ लागत असे. या मोरोपंतांनी मराठीला समृद्ध केले. त्यांनी आर्या या छंद वृत्ताचा प्रभावी वापर केला. म्हणूनच त्यांच्याबद्दल म्हटले जाते;

**सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची,**
**ओवी ज्ञानेशाची, आर्या मयूरपंतांची.**

## विसावे शतक: साहित्याचा सुवर्णकाळ

विसाव्या शतकात मराठी साहित्याचा चौरंगी विकास झाला आणि हे शतक मराठीचा सुवर्णकाळ ठरले. या काळात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आणि वास्तववादी असे नवीन प्रवाह साहित्यात आले. वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज,

पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, साने गुरुजी, व. पु. काळे, विजय तेंडुलकर, बहिणाबाई चौधरी, अण्णाभाऊ साठे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या दिग्गजांनी मराठी भाषेला सुवर्णसाज चढवला. सावरकरांनी केवळ स्वातंत्र्यलढाच लढला नाही, तर मराठी भाषेतही अमूल्य योगदान दिले. त्यांनी महापौर, हुतात्मा, दिग्दर्शक, विशेषांक, विधिमंडळ, प्राध्यापक, दिनांक, क्रमांक, ध्वनीक्षेपक यांसारखे शेकडो शब्द मराठीला दिले. कोणत्याही राष्ट्राची भाषा ही त्या राष्ट्राची अस्मिता असते, त्यामुळे परकीय शब्दांवर आपण अवलंबून राहता कामा नये, असे त्यांचे ठाम मत होते. स्वातंत्र्यानंतर १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसह मराठीला राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला. मराठी साहित्य संमेलनांच्या माध्यमातून ही भाषा महाराष्ट्राबाहेरील हैदराबाद, बडोदा, रायपूर, ग्वाल्हेर, दिल्ली, अहमदाबाद, कारवार, पणजी, बेळगाव, घुमान सारख्या शहरांपर्यंत पोहोचली.

## जागतिक स्तरावरील मराठीची भरारी

आज मराठी केवळ भारतापुरती मर्यादित नसून ती सातासमुद्रापार पोहोचली आहे. जगातील १०० हून अधिक देशांत मराठी भाषिक लोक वास्तव्यास आहेत. उत्तर अमेरिकेतील 'बृहन्महाराष्ट्र मंडळ' ही संस्था परदेशात मराठीसाठी मोठे काम करत असून एकट्या अमेरिकेत १०० पेक्षा जास्त मराठी शाळा चालवल्या जातात. लंडन, दुबई, सिंगापूर आणि सिडनी यांसारख्या शहरांमध्येही मराठी मंडळे अत्यंत सक्रिय आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो, युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्वेनिया आणि जर्मनीतील हिडेलबर्ग विद्यापीठात मराठीचे अभ्यासक्रम आणि संशोधन सुरू आहे. तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्टफोन आणि संगणकावर युनिकोड व गुगल इनपुटमुळे मराठीचा वापर अत्यंत सोपा झाला आहे. शहरी तरुण कॅलिग्राफी, टी-शर्ट्स आणि कप्सच्या माध्यमातून मराठीचे कौतुक करत आहेत, तर ग्रामीण भागात शेतकरी ऑनलाइन माध्यमातून मराठीतून प्रगत शेतीचे धडे घेत आहेत. मराठी चित्रपटांच्या संहिता आज जागतिक दर्जाच्या होत असून विविध कालखंडातील संकटांना झेलत आपली माय मराठी आजही टवटवीत राहिली आहे.

## ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विकास

शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर आपण अनेकदा इंग्रजीला अवाजवी महत्त्व देतो. मात्र, जपानसारख्या देशाने इंग्रजी बाजूला ठेवून आपल्या मातृभाषेला प्राधान्य दिले, म्हणूनच तिथे ५३०० हून अधिक संशोधन संस्था कार्यरत आहेत. जपानची लोकसंख्या केवळ १२ कोटी असूनही त्यांनी मातृभाषेतून क्रांती केली. आपण परकीय भाषेचा अभिमान आणि मातृभाषेचा न्यूनगंड बाळगल्याने आपली प्रगती खुंटत आहे. संपर्क भाषा म्हणून इंग्रजीला महत्त्व दिलेच पाहिजे, पण ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विकास होणे ही काळाची गरज आहे. मराठीच्या अहिराणी, वऱ्हाडी, कोकणी अशा अनेक बोलीभाषांची श्रीमंती अफाट आहे. दरवर्षी अडीच हजार पुस्तके आणि २५० साहित्य संमेलने होणारी ही भाषा कोश वाड.मया्बाबत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशातील २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत, ही आपली मोठी श्रीमंती आहे.

## भविष्य ज्ञानभाषेचे!

मराठी भाषेचा आजवरचा प्रवास पाहिला तर लक्षात येते की, ही भाषा केवळ टिकली नाही, तर ती काळाप्रमाणे बदलत अधिक समृद्ध झाली आहे. मात्र, आजच्या जागतिक स्पर्धेत आपल्याला जपानसारख्या देशांकडून एक महत्त्वाचा धडा घेण्याची गरज आहे. केवळ १२ कोटी लोकसंख्या असूनही जपानने आपली मातृभाषा 'ज्ञानभाषा' म्हणून जपली, म्हणूनच आज तो देश संशोधनात जगाच्या पुढे आहे. याउलट, आपण इंग्रजीचा अनाठायी अभिमान आणि मातृभाषेचा न्यूनगंड बाळगून स्वतःची प्रगती खुंटवून घेत आहोत. संपर्क भाषा म्हणून इंग्रजीला महत्त्व जरूर द्यावे, पण आपल्या बुद्धीची आणि प्रतिभेची खरी वाढ ही मराठीतूनच होऊ शकते. आज मराठीकडे जगातील दुसरी सर्वात मोठी 'वाड.मय्' संपदा आहे, जागतिक स्तरावर शेकडो मराठी शाळा आहेत आणि डिजिटल युगातही मराठीचा डंका वाजत आहे. ही भाषिक श्रीमंती आपली खरी ताकद आहे. शेवटी, भाषा केवळ सरकारी दप्तरात किंवा पुस्तकात जिवंत राहत नाही, ती लोकांच्या ओठांवर आणि वापरात जिवंत राहते. छत्रपती शिवरायांनी ज्याप्रमाणे परकीय शब्दांचे ओझे झुगारून 'राज्यव्यवहार कोश' निर्माण केला, तसाच स्वाभिमान आज आपल्याला जपण्याची गरज आहे. 'अभिजात' दर्जा मिळाल्याने या भाषेला राजाश्रय तर मिळालाच आहे, पण आता तिला लोकश्रय मिळवून देणे आपल्या हातात आहे. आपण मराठीचा न्यूनगंड सोडून तिचा ज्ञानभाषा म्हणून अभिमान बाळगला, तरच खऱ्या अर्थाने मराठीचे भवितव्य उज्ज्वल आहे.

**"मराठीची श्रीमंती जपूया,**
**तिचा लौकिक जगभर वाढवूया;**
**कारण मराठी टिकली**
**तरच आपली अस्मिता टिकेल!"**

•••

# मराठी भाषेची प्राचीनता आणि वैशिष्ट्ये

**"अडीच हजार वर्षांची लाभली जिला साथ,**
**इतिहासाच्या पानापानांत जिचा अखंड हात,**
**सातवाहनांच्या काळची ही रांगडी मराठी,**
**अभिजात सौंदर्याने सजली आमची मायमराठी."**

**पूजा गोंधळी**
(बी. एड. प्रथम वर्ष)

मराठी भाषा ही भारतातील एक प्राचीन, समृद्ध आणि अभिमानास्पद भाषा आहे. महाराष्ट्र राज्यातील कोट्यावधी लोकांची ती मातृभाषा असून भारताच्या सांस्कृतिक वारशात तिचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. मराठी भाषा ही इंडो-आर्यन भाषा समूहातील असून तिचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. ज्ञान, साहित्य, कला, धर्म आणि समाजजीवन या सर्व क्षेत्रांमध्ये मराठी भाषेने मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे मराठी भाषेची प्राचीनता आणि वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

मराठी भाषेची उत्पत्ती प्रामुख्याने महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांपासून झालेली मानली जाते. प्राचीन काळात संस्कृत ही प्रमुख भाषा होती. त्यानंतर लोकभाषांमधून प्राकृत भाषांचा विकास झाला आणि त्यापासून पुढे मराठी भाषेची निर्मिती झाली. इ.स. दहाव्या आणि अकराव्या शतकातील शिलालेख व ताम्रपटांमध्ये मराठी भाषेचे लिखित स्वरूप आढळते. यावरून मराठी भाषा त्या काळात व्यवहारात असल्याचे स्पष्ट होते. यादवकालीन शिलालेखांमध्ये मराठीचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचे दिसून येते.

तेराव्या शतकात संतसाहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेला नवे जीवन मिळाले. ज्ञानेश्वर यांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथामुळे मराठी भाषेला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. ज्ञानेश्वरीने भगवद्गीतेचा अर्थ सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवला. त्यामुळे मराठी ही केवळ विद्वानांची भाषा न राहता सामान्य लोकांची भाषा बनली. त्यानंतर नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी अभंग, भारूड आणि ओवी यांसारख्या साहित्यप्रकारांद्वारे मराठी भाषेचा प्रसार केला. त्यांच्या रचनांमुळे मराठी भाषा भक्तीभाव, नैतिकता आणि सामाजिक जाणीवा यांचे प्रभावी माध्यम ठरली.

पुढे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात मराठी भाषेला राज्यकारभाराची भाषा म्हणून मान्यता मिळाली. शिवाजी महाराजांनी प्रशासनात मराठीचा वापर केला आणि राजकारण, लष्कर व न्यायव्यवस्था यामध्ये मराठीला स्थान दिले. त्यामुळे मराठी भाषेचा अधिक विकास झाला. पेशव्यांच्या काळातही मराठी भाषा राज्यकारभारात वापरली जात होती. अशा प्रकारे मराठी भाषेने सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रांत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. आधुनिक काळातही मराठी भाषा शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, चित्रपट, नाटक आणि माध्यमे यांमध्ये व्यापक प्रमाणावर वापरली जाते. महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा म्हणून मराठीला संविधानिक मान्यता आहे. आजही अनेक लेखक, कवी, नाटककार आणि विचारवंत मराठी भाषेला समृद्ध करत आहेत.

मराठी भाषेची अनेक वैशिष्ट्ये आहेत. सर्वप्रथम तिची शब्दसंपत्ती अत्यंत समृद्ध आहे. संस्कृतमधील तत्सम आणि तद्भव शब्द, तसेच फारसी, अरबी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमधील शब्द मराठीत आढळतात. त्यामुळे मराठी भाषेचा शब्दकोश व्यापक आणि विविधतेने परिपूर्ण आहे. दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी भाषेचा गोडवा आणि साधेपणा. मराठी भाषेतील शब्दरचना लयबद्ध असून तिचा उच्चार स्पष्ट आणि मधुर आहे. त्यामुळे मराठी भाषा बोलणे आणि ऐकणे सुखद अनुभव ठरतो.

तिसरे वैशिष्ट्य म्हणजे मराठीचे शिस्तबद्ध व्याकरण. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, काळ, विभक्ती, लिंग, वचन इत्यादी घटकांची रचना स्पष्ट आणि नियमबद्ध आहे. त्यामुळे भाषेची बांधणी सुसंगत आणि अर्थपूर्ण होते. चौथे वैशिष्ट्य म्हणजे देवनागरी लिपीचा वापर. मराठी भाषा देवनागरी लिपीत लिहिली जाते. ही लिपी वैज्ञानिक आणि उच्चाराधिष्ठित असल्यामुळे लेखन व वाचन सुलभ होते. पाचवे वैशिष्ट्य म्हणजे मराठीतील समृद्ध साहित्यपरंपरा. संतसाहित्य, अभंग, ओवी, भारूड, कीर्तन, पोवाडा, लावणी, कथा, कादंबरी, नाटक आणि कविता यांसारख्या विविध साहित्यप्रकारांमुळे मराठी भाषा समृद्ध झाली आहे. लोकजीवन, संस्कृती, परंपरा आणि इतिहास यांचे जिवंत चित्रण मराठी साहित्यात आढळते. सहावे वैशिष्ट्य म्हणजे मराठीतील बोलीभाषांचे वैविध्य. कोकणी, मालवणी, खानदेशी, वऱ्हाडी, अहिराणी अशा अनेक बोलीभाषा मराठी भाषेची शोभा वाढवतात. या बोलीभाषांमुळे मराठी भाषेत प्रादेशिक रंग आणि वैशिष्ट्ये दिसून येतात. सातवे वैशिष्ट्य म्हणजे मराठी भाषेची लोकजीवनाशी असलेली जवळीक. सण, उत्सव, परंपरा, लोककला आणि लोकसंस्कृती यांमध्ये मराठी भाषेचा प्रभाव स्पष्ट दिसतो. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत मराठी भाषा संवादाचे प्रमुख साधन आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी आणि इतर परकीय भाषांचा प्रभाव वाढत असला तरी मराठी भाषा आपले अस्तित्व टिकवून आहे. तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सोशल मीडियावरही मराठी भाषेचा वापर वाढत आहे. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत मराठी भाषेचे महत्त्व कायम आहे. अशा प्रकारे मराठी भाषा ही प्राचीन परंपरा, समृद्ध साहित्य आणि विविध वैशिष्ट्यांनी नटलेली आहे. ती महाराष्ट्राची ओळख आणि अभिमान आहे. मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि प्रसार करणे हे प्रत्येक मराठी भाषिकाचे कर्तव्य आहे. आपण आपल्या दैनंदिन जीवनात मराठीचा सन्मानपूर्वक वापर करून तिची परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. मराठी भाषा ही आपल्या संस्कृतीचे प्रतिबिंब असून ती सदैव प्रगतीपथावर राहो, हीच अपेक्षा.

•••

# शिवकालीन मराठीचे महत्व

**सहा. प्रा.**
**आस्मा शेख**



भारत हा विविध भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. या भाषिक वैविध्यात मराठी भाषा एक समृद्ध, प्रभावी आणि ऐतिहासिक परंपरा असलेली भाषा म्हणून ओळखली जाते. इतिहासात मराठी भाषेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रांत मराठी भाषेने मोठे योगदान दिले आहे. भारताच्या इतिहासातील अनेक महत्त्वाच्या घटनांमध्ये आणि चळवळींमध्ये मराठी भाषेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे .भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अतिशय महत्वाचे स्थान आहे .

त्यांनी स्थापलेले स्वराज्य, त्यांचे शौर्य, लोकाभिमुख शासनपद्धती आणि दूरदृष्टी यांच्या आधारे ते भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांनी १७व्या शतकात हिंदवी स्वराज्याची स्थापना करून महाराष्ट्र आणि भारताला स्वतंत्र राजकीय ओळख दिली. त्यांची दूरदृष्टी , शौर्यकथा, धाडसी मोहिमा आणि लोकाभिमुख राज्यकारभारामुळे ते एक उत्तम राज्यकर्ता म्हणून ओळखले जातात.परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक योगदान हे फक्त राजकीय क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक सर्वच क्षेत्रात व्यापलेले आहे . छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम हा इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरलेला आहे व यामध्ये मराठी भाषेची भूमिका अत्यंत महत्वाची आहे . शिवकालीन मराठी ही स्वराज्याची अधिकृत भाषा, प्रशासनाचे साधन, सांस्कृतिक अजस्रतेचे प्रतीक आणि ऐतिहासिक ज्ञानाचे माध्यम होती. शिवकालीन मराठीचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## १.स्वराज्य व मराठी

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली हे स्वराज्य केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरते मर्यादित नसून त्यामध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक स्वातंत्र्यही समाविष्ट होते. त्या काळात दक्षिण भारतात आदिलशाही, निजामशाही आणि मुघल सत्ता प्रबळ होती. प्रशासनात फारसी आणि उर्दू भाषेचा मोठ्या प्रमाणात वापर होत होता. कागदपत्रे, आदेश, महसूल नोंदी आणि न्यायनिवाडे फारसी भाषेत लिहिले जात. सामान्य जनतेला ही भाषा समजत नसल्यामुळे शासन आणि प्रजा यांच्यात दुरावा निर्माण होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हा दुरावा दूर करण्यासाठी स्वराज्य स्थापनेच्या काळात मराठी भाषेला प्राधान्य दिले. शासनाचे हुकुमनामे, आज्ञापत्रे, महसूल नोंदी, किल्ल्यांवरील आदेश आणि पत्रव्यवहार मराठीत लिहिले जात. मराठी भाषेमुळे प्रशासन लोकाभिमुख झाले. सामान्य शेतकरी, व्यापारी आणि सैनिकांना आदेश समजणे सोपे झाले. परिणामी शासन पारदर्शक, कार्यक्षम आणि लोकाभिमुख बनले. ही भाषा केवळ व्यवहाराची सोय नव्हती, तर जनतेसाठी सहज समजण्याजोगी आणि संस्कृतसंपन्न माध्यमही होती. मराठी ही जनतेची भाषा असल्यामुळे प्रशासन आणि जनता यांच्यात विश्वासार्ह संबंध निर्माण झाला.

## २.राजमुद्रा आणि स्वाभिमान

छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा स्वराज्याच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक होती. या मुद्रेतून आत्मविश्वास, धैर्य आणि धार्मिक सहिष्णुता व्यक्त होत असे. राजमुद्रेमधील भाषा संस्कृत-मराठी परंपरेशी जोडलेली होती. त्यामुळे स्वराज्याला भारतीय सांस्कृतिक परंपरेशी जोडण्याचे काम झाले. मराठी भाषेमुळे स्वराज्याची ओळख लोकांना सहज झाली. प्रजेच्या मनात स्वराज्याबद्दल अभिमान आणि स्वाभिमान निर्माण झाला. “आपले राज्य, आपली भाषा” ही भावना दृढ झाली. भाषिक स्वाभिमान हा राजकीय स्वातंत्र्याइतकाच महत्त्वाचा आहे, हे महाराजांनी कृतीतून दाखवून दिले.

## ३.न्यायव्यवस्थेत मराठीचे स्थान

शिवकालीन न्यायव्यवस्था सुबक आणि शिस्तबद्ध होती. न्यायालयीन नोंदी, साक्षी, हुकुमनामे आणि निर्णय मराठीत लिहिले जाऊ लागले. यामुळे सर्वसामान्य लोकांना न्यायप्रक्रिया समजणे सोपे झाले. न्याय हा लोकांच्या भाषेत मिळाल्यामुळे शासनाबद्दल विश्वास आणि आदर वाढला. भाषेच्या या वापरामुळे स्वराज्याची पायाभरणी अधिक मजबूत झाली.

## ४.लष्करी प्रशासन व मराठी

छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्कर शिस्तबद्ध आणि संघटित होते. मोहिमा, सैन्याची आखणी ,सैनिकांशी संवाद, आज्ञा आणि सूचना मराठीत दिल्या जात. त्यामुळे आदेश स्पष्टपणे समजत आणि कार्यवाही तत्परतेने होत असे. मराठी भाषेमुळे सैनिकांमध्ये आत्मविश्वास वाढला आणि आदेश स्पष्ट समजले. त्यामुळे लष्करी कार्यवाही यशस्वी झाली. मराठी ही स्वराज्याच्या सैन्यासाठी प्रेरणादायी भाषा ठरली. जनसंपर्काच्या बाबतीतही मराठीचा वापर करण्यात आला. महाराज प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होत आणि त्यांच्याशी त्यांच्या भाषेत संवाद साधत. यामुळे राजा आणि प्रजा यांच्यात आत्मीयतेचे नाते निर्माण झाले.

## ५. शिवसाहित्य व मराठी

शिवसाहित्य आणि मराठी भाषा यांचे नाते अतूट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित साहित्य मराठी भाषेमुळेच जतन झाले आणि जनमानसात रुजले.

बखरी, पोवाडे, काव्य, नाटके आणि संशोधनग्रंथ या सर्व माध्यमांतून मराठीने शिवचरित्राचा गौरव केला आहे. 'सभासद बखर' ही एक महत्त्वाची बखर आहे, ज्यात महाराजांच्या जीवनातील प्रमुख घटनांची नोंद आहे. बखरींमुळे महाराजांचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचले. मराठी भाषेमुळे हे ऐतिहासिक दस्तऐवज लोकाभिमुख आणि समजण्याजोगे झाले. मराठी ही केवळ अभिव्यक्तीचे साधन नसून ती शिवसाहित्याचा आत्मा आहे. छत्रपती  शिवाजी महाराज यांचे कार्य आणि पराक्रम यांचे वर्णन करणारे पोवाडे मराठीत रचले गेले. महाराजांच्या पराक्रमाचे अनेक प्रसंग या पोवाड्यांमध्ये जिवंतपणे नोंदवले आहेत. शाहिरांनी गावोगावी जाऊन हे पोवाडे सादर केले, त्यामुळे शिवचरित्र जनमानसात जिवंत राहिले. मराठी भाषेमुळे या गाथा लोकांच्या कायम स्मरणात राहिल्या. मराठी ही केवळ अभिव्यक्तीची भाषा न राहता सांस्कृतिक ओळखीचे साधन बनली. मध्ययुगीन भारतात ज्याप्रकारे फारसीने मुघल दरबारात स्थान मिळवले, त्याचप्रमाणे मराठीने मराठा प्रशासनात सन्मानाचे स्थान मिळवले.

## ६. भविष्यातील दूरदृष्टी

शिवाजी महाराजांनी मराठीला दिलेले स्थान पुढील काळातही टिकून राहिले. मराठा साम्राज्य विस्तारताना मराठीचा वापर विविध प्रांतांत झाला. त्यामुळे मराठीची व्याप्ती वाढली. पुढील शतकांत मराठी साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक चळवळींना या परंपरेचा आधार मिळाला. भाषेच्या सशक्त पायावर समाजाची उभारणी होऊ शकते, हे शिवकालीन अनुभवाने सिद्ध झाले. अशा प्रकारे मराठी भाषेला राजकीय प्रतिष्ठा मिळवून देण्याचे मोठे श्रेय छत्रपती शिवाजी महाराज यांना जाते. त्यांनी स्वराज्य स्थापनेदरम्यान मराठी भाषेला प्रशासनात महत्त्वाचे स्थान दिले. राज्यकारभार, कागदपत्रे आणि न्यायव्यवहार यामध्ये मराठीचा वापर वाढविण्यात आला. त्यामुळे मराठी भाषा केवळ लोकभाषा न राहता राज्यकारभाराची भाषा बनली. शिवकालीन बखरी, आज्ञापत्रे आणि पत्रव्यवहार यांमधून त्या काळातील मराठीची समृद्धता दिसून येते. एकूणच, १७व्या शतकातील शिवकालीन मराठी भाषा ही स्वराज्याचा  अविभाज्य भाग होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीला केवळ सन्मान दिला नाही, तर तिला राज्यकारभाराचे माध्यम बनवून तिचे सामर्थ्य सिद्ध केले. त्यामुळे मराठी भाषा केवळ संवादाचे साधन न राहता स्वराज्याच्या विचारधारेचे प्रतीक बनली. शिवकालीन मराठीचे महत्त्व हे आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचे अधिष्ठान आहे. मराठी ही स्वराज्याची आत्मा व शिवइतिहासाची रक्षकही आहे. हा इतिहास जिवंत ठेवण्यासाठी मराठी भाषेचे संवर्धन व जतन करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भसूची**


कुलकर्णी, अ. रा. (१९९३). शिवकालीन महाराष्ट्र. राजहंस प्रकाशन.

कुलकर्णी, अ. रा. (२०१०). मध्ययुगीन भारताचा इतिहास. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.

सरदेसाई, गो. स. (२०१२). मराठ्यांचा इतिहास (खंड १). मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.

Sarkar, J. (1919). Shivaji and his times. Longmans, Green and Co.

संकेतस्थळ

https://www.thinkmarathi.com/shivkalin-marathi-bhag-8/

https://www.esakal.com/maharashtra/chhatrapati-shivaji-maharajs-efforts-in-preserving-marathi-language-amp17

https://rashipra.weebly.com/23502352236623362368-234923662359237523302366231123402367236123662360.html

https://iyemarathichiyenagari.com/shivaji-marathi-language-reform-history-prakash-pawar-article/


•••




# मराठी साहित्यातील महान साहित्यिकांचे योगदान

**अंकिता साळुंखे**
प्रथम वर्ष बी.एड. विद्यार्थिनी

मराठी साहित्याची परंपरा अत्यंत समृद्ध, वैविध्यपूर्ण आणि प्रभावी आहे. संतसाहित्यापासून लोकसाहित्य, ग्रामीण साहित्य, अर्वाचीन आणि आधुनिक साहित्यापर्यंतचा त्याचा प्रवास हा केवळ साहित्यिक विकासाचा इतिहास नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक परिवर्तनाचा प्रवास आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब मानले जाते; त्यामुळे प्रत्येक कालखंडातील महान साहित्यिकांनी आपल्या लेखनातून त्या त्या काळातील समाजमन व्यक्त केले आणि त्याला दिशा दिली. मराठी साहित्यातील महान साहित्यिकांचे योगदान हे केवळ शब्दरचनेपुरते मर्यादित नसून समाजप्रबोधन, संस्कृतीसंवर्धन आणि मानवी मूल्यांच्या जपणुकीपर्यंत विस्तारित आहे.

संतकालीन साहित्य हा मराठी साहित्यातील सुवर्णकाळ मानला जातो. संत ज्ञानेश्वर यांनी 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाद्वारे भगवद्गीतेचे सुलभ आणि ओघवत्या मराठीत भाषांतर करून अध्यात्म सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवले. त्यांनी मराठी भाषेला तत्त्वज्ञानाची गहनता दिली. त्याचप्रमाणे संत तुकाराम यांनी आपल्या अभंगांमधून समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि

विषमता यांवर प्रहार केला. त्यांच्या लेखनात भक्तीभावाबरोबरच सामाजिक समतेचा संदेश आढळतो. संतांनी मराठी भाषेला लोकभाषेचा दर्जा देत ती सर्वसामान्यांच्या जीवनाशी जोडली.

मराठी साहित्यात लोकसाहित्याचाही महत्त्वाचा वाटा आहे. लोकगीते, ओव्या, पोवाडे, भारुडे, म्हणी आणि लोककथा यांच्या माध्यमातून समाजाचे जीवन, परंपरा आणि संस्कृती पिढ्यान्‌पिढ्या जतन झाली. अण्णाभाऊ साठे यांनी लोकशाहीर म्हणून पोवाड्यांतून सामाजिक जाणीवा जागृत केल्या. बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या ओव्यांमधून ग्रामीण जीवनातील साधेपणा आणि अनुभव व्यक्त केले. लोकसाहित्यामुळे मराठी संस्कृतीची मुळे अधिक दृढ झाली आणि सामूहिक भावविश्वाला अभिव्यक्ती मिळाली.

पुढील काळात सामाजिक सुधारणेच्या चळवळींमध्ये साहित्याने महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा ज्योतिराव फुले यांनी ‘गुलामगिरी’सारख्या ग्रंथातून जातिव्यवस्थेवर कठोर टीका केली आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला. तसेच लोकमान्य टिळक यांनी ‘केसरी’ आणि ‘मराठा’ या वर्तमानपत्रांद्वारे राष्ट्रीय चळवळीला बळ दिले. त्यांच्या लेखनाने स्वातंत्र्याची जाणीव आणि राष्ट्राभिमान जागृत केला. या साहित्यिकांनी लेखनाला समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले.

अर्वाचीन काळात मराठी साहित्यात नवीन विचारप्रवाह उदयास आले. केशवसुत यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक मानले जाते. त्यांच्या कवितेत स्वातंत्र्य, नवचेतना आणि वैयक्तिक भावविश्वाचे दर्शन घडते. राम गणेश गडकरी यांनी नाटक आणि काव्यातून समाजजीवनाचे विविध पैलू प्रभावीपणे मांडले. या अर्वाचीन साहित्यिकांनी परंपरेतून आधुनिकतेकडे जाणारा पूल उभारला.

ग्रामीण साहित्यानेही मराठी साहित्य समृद्ध केले. खेड्यातील जीवन, शेतकरी, निसर्ग आणि संघर्ष यांचे वास्तववादी चित्रण या साहित्य प्रवाहात आढळते. व्यंकटेश माडगूळकर यांनी ‘बनगरवाडी’सारख्या कादंबरीतून ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्रण केले. शंकर पाटील यांनी खेड्यातील संस्कृती आणि विनोद प्रभावीपणे मांडला. ग्रामीण साहित्यामुळे मराठी साहित्य अधिक जीवनस्पर्शी आणि वास्तववादी बनले.

आधुनिक मराठी साहित्यात विविध प्रवाह दिसून येतात. कुसुमाग्रज यांनी आपल्या काव्यातून स्वातंत्र्य, मानवता आणि सामाजिक न्याय यांचे प्रभावी चित्रण केले. वि. स. खांडेकर यांनी ‘ययाति’ या कादंबरीतून मानवी मनाचे सूक्ष्म विश्लेषण केले. पु. ल. देशपांडे यांनी विनोदी लेखनातून समाजातील विसंगतींवर भाष्य केले. त्यांच्या साहित्यातून मराठी भाषेतील सहजता आणि जिव्हाळा प्रकर्षाने जाणवतो.

मराठी साहित्यात दलित आणि स्त्री साहित्य या प्रवाहांनी नवे आयाम निर्माण केले. बाबुराव बागुल यांनी दलित जीवनातील वास्तव आणि संघर्ष प्रभावीपणे मांडले. शांता शेळके यांनी स्त्रीमनातील भावना काव्यरूपात व्यक्त केल्या. या साहित्यप्रवाहामुळे साहित्य अधिक व्यापक आणि समावेशक बनले.

मराठी साहित्यातील महान साहित्यिकांचे योगदान केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित नाही. त्यांनी मराठी भाषेची समृद्धी वाढवली, शब्दसंपत्ती विस्तारित केली आणि भाषेला अभिजात दर्जा प्राप्त करून दिला. त्यांच्या लेखनातून समाजातील दोषांवर प्रहार झाला, नैतिक मूल्यांची जपणूक झाली आणि राष्ट्रीय भावना दृढ झाली. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी सिद्ध केले.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. महान साहित्यिकांनी निर्माण केलेला साहित्यसाठा हा आपला सांस्कृतिक ठेवा आहे. नव्या पिढीने त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यातील मूल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. कारण भाषा आणि साहित्य हेच समाजाच्या प्रगतीचे खरे अधिष्ठान आहे. एकूणच, संत, लोककवी, अर्वाचीन लेखक, ग्रामीण साहित्यिक आणि आधुनिक विचारवंत यांनी आपल्या लेखनातून समाजमन घडवले, विचारप्रवर्तन केले आणि संस्कृतीची मशाल प्रज्वलित ठेवली. त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे. त्यांच्या साहित्यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध, सक्षम आणि अभिमानास्पद बनली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येक मराठी भाषिकाची जबाबदारी आहे.

●●●




# मराठी बोलीभाषा आणि मराठीचे विविध रूपे

सहा. प्रा.
सौ.हेमा देशमुख

मराठी ही वैविध्यपूर्ण बोलीभाषांनी नटलेली, समृद्ध वारसा असलेली प्राचीन भाषा आहे. मराठी भाषा ही भारतीय आर्यभाषा समूहातील एक समृद्ध आणि प्राचीन भाषा आहे. तिची निर्मिती प्राकृत आणि अपभ्रंश भाषांपासून झालेली मानली जाते. महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरेशी मराठी भाषा घट्ट जोडलेली आहे. विविध प्रदेश, हवामान, लोकजीवन, परंपरा आणि इतर भाषांशी झालेला संपर्क यांमुळे मराठी भाषेत अनेक बोलीभाषा आणि विविध रूपे विकसित झाली आहेत. या वैविध्यामुळे मराठी भाषा अधिक समृद्ध, जिवंत आणि अभिव्यक्तीक्षम बनली आहे. मराठी भाषेची मुळे महाराष्ट्र प्राकृत या प्राचीन भाषेत आढळतात. इ.स.च्या ११व्या–१२व्या शतकात मराठीचा लिखित स्वरूपात विकास झाला. संत परंपरेतील संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ यांच्या रचनांमुळे मराठी भाषा लोकभाषा म्हणून दृढ झाली. पुढे शिवकालीन काळात प्रशासन आणि व्यवहारात मराठीचा वापर वाढला. आधुनिक काळात शिक्षण, मुद्रणयंत्र आणि वृत्तपत्रांमुळे प्रमाण मराठीचा प्रसार झाला.

जगातील बहुतेक प्रमुख भाषांप्रमाणेच, मराठी भाषाही एकाहून अधिक पद्धतींनी बोलली जाते. महाराष्ट्र राज्यासह गोवा, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि गुजरात या भागांत मराठी बोलली जाते. प्रदेशानुसार उच्चार, शब्दसंग्रह आणि बोलण्याची पद्धत बदलत असल्यामुळे मराठीमध्ये अनेक बोलीभाषा आढळतात. जिची वऱ्हाडी, अहिराणी, मालवणी, कोल्हापुरी, कोकणी आणि नागपुरी यांसारखी विविध प्रादेशिक रूपे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आरसा आहेत. साधारणतः दर बारा कोसांवर मराठीचे रूप बदलते, ज्यामुळे प्रमाण भाषेव्यतिरिक्त या बोलीभाषा भाषेला अधिक जिवंत आणि प्रवाही

ठेवतात. मुख्य भाषेशी नाते कायम ठेवलेली, तिची पोटभाषा दर १२ कोसांगणिक उच्चारांत, शब्दसंग्रहांत, आघातांत व वाक्प्रचारांत बदलत रहाते. असे असले तरी लिखित भाषेत फारसा फरक नसतो. पिढ्या न् पिढ्या विशिष्ट राज्यात स्थायिक झाल्यामुळे मराठी भाषकांच्या मूळ मराठी बोलीवर त्या राज्याच्या स्थानिक भाषेचा ठसा सुस्पष्टपणे उमटलेला दिसतो. त्यामुळे 'मी मराठी बोलतो' असे कुणी विधान केले तर 'कुठली मराठी बोलता?' असा प्रश्न आपोआपच उपस्थित होतो. कारण मूळ मराठी भाषेचे व्याकरण जरी एकच असले तरी स्थानमाहात्म्यानुसार मराठी बोलीचे कोंकणी मराठी, कोल्हापुरी मराठी, कारवारी मराठी, अहिराणी, मराठवाडी, नागपुरी, असे अनेकविध प्रकार कानांवर पडत. भौगोलिक परिसरा नुसार कोल्हापुरी, चंदगडी, नागपुरी, मराठवाडी, कोकणी, संगमेश्र्वरी, वऱ्हाडी, बेळगावी, मालवणी, मोरस मराठी, झाडीबोली, तंजावर, बागलाणी, नंदुरबारी, खालल्यांगी, वरल्यांगी, ताप्तांगी, डोंगरांगी, जामनेरी, खानदेशी असे बोलींचे आणखी उपप्रकार होतात.

## मराठीची प्रमुख बोलीरूपे:

वऱ्हाडी (विदर्भ): यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा भागात बोलली जाणारी, जी तिची विशिष्ट लय आणि शब्दांसाठी प्रसिद्ध आहे. वऱ्हाडी बोलीत उच्चारात सौम्यता आणि विशिष्ट लहेजा आढळतो. उदाहरणार्थ, "तू कुठं जातोयस?" ऐवजी "तू कुठं जातोस?" असा प्रयोग होतो. वऱ्हाडी बोलीत शेती, ग्रामीण जीवन आणि स्थानिक संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते. अहिराणी (खानदेश): धुळे, जळगाव, नाशिक या भागात बोलली जाणारी, जी मराठीची अत्यंत गोड बोली मानली जाते. अहिराणीवर गुजराती आणि हिंदी भाषेचा प्रभाव आहे. "काय करतोस?" ऐवजी "काय करताय?" असा वेगळा प्रयोग आढळतो. ही बोली स्थानिक लोकगीतांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाते.

**मालवणी (कोकण):**

सिंधुदुर्ग व रत्नागिरीचा काही भाग, 'या', 'हाय' अशी वैशिष्ट्यपूर्ण शब्दावली.मालवणी बोलीत कोकणीचा प्रभाव दिसतो. "तूं कितें करता?" असे शब्दप्रयोग ऐकायला मिळतात. मालवणी भाषेत विनोद, नाटक आणि लोककलेत विशेष स्थान आहे.

**कोल्हापुरी (पश्चिम महाराष्ट्र):** ठसकेबाज आणि रांगडी भाषा, जी कोल्हापूर परिसरातील वैशिष्ट्यपूर्ण संवाद शैली आहे.

**नागपुरी/झाडीबोली:** नागपूर व पूर्व विदर्भातील बोली, ज्यावर गोंडी व हिंदीचा प्रभाव दिसतो.

**मराठवाडी:** औरंगाबाद, बीड, नांदेड भागात बोलली जाणारी, जिच्यावर फारसी भाषेचा प्रभाव आहे.

**कोकणी/मालवणी:** किनारपट्टीवरील बोली, जिची स्वतंत्र लय आहे.या बोलीवर अरबी, पोर्तुगीज आणि कन्नड भाषेचा प्रभाव दिसतो. उदाहरणार्थ, "किदें करता?" (काय करता?) अशा स्वरूपाचे शब्दप्रयोग आढळतात. कोकणी बोलीत समुद्र, मासेमारी आणि किनारी जीवनाशी संबंधित शब्द मोठ्या प्रमाणावर आढळतात. प्रत्येक बोलीची शब्दरचना, लहेजा आणि वाक्यरचना वेगळी असली तरी त्यांचा मूळ आधार मराठीच आहे. बोलीभाषा लोकजीवन, संस्कृती, परंपरा आणि इतिहास यांचे जतन करतात.

**मराठीचे विविध रूपे :**

प्रमाण मराठी –प्रमाण मराठी ही शुद्ध, व्याकरणबद्ध आणि शालेय शिक्षणात वापरली जाणारी भाषा आहे. शाळा, महाविद्यालये, वृत्तपत्रे,पाठ्यपुस्तके, शासकीय कामकाज आणि प्रसारमाध्यमांमध्ये प्रमाण मराठीचा वापर केला जातो. ही भाषा सर्व मराठीभाषिकांना समजेल अशा पद्धतीने रचलेली असते.

**साहित्यिक मराठी -** कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र अशा साहित्यप्रकारांमध्ये वापरली जाणारी शैली म्हणजे साहित्यिक मराठी. संत साहित्यापासून आधुनिक कादंबऱ्यांपर्यंत मराठी साहित्याची परंपरा अत्यंत समृद्ध आहे. साहित्यिक मराठीत अलंकारिक भाषा, भावनात्मक अभिव्यक्ती आणि कल्पनाशक्तीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

**संवादी मराठी** – दैनंदिन जीवनातील संवादासाठी वापरली जाणारी साधी, सोपी आणि नैसर्गिक भाषा म्हणजे बोलचाल मराठी. या रूपात अनेकदा इंग्रजी किंवा हिंदी शब्दांचा वापर केला जातो. उदाहरणार्थ, "मी ऑफिसला जातो", "तू मेसेज पाठव" इत्यादी.

**प्रशासकीय मराठी** – कार्यालयीन कामकाज, सरकारी पत्रव्यवहार, तांत्रिक क्षेत्र आणि न्यायालयीन व्यवहारात वापरली जाणारी मराठी ही अधिक औपचारिक असते. यात विशिष्ट शब्दसंग्रह आणि अचूक शब्दप्रयोग आढळतात.

**माध्यमांची मराठी** – दूरदर्शन, रेडिओ, चित्रपट, सामाजिक माध्यमे आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात वापरली जाणारी आधुनिक मराठी ही सतत बदलत आहे. इंग्रजी शब्दांचे मिश्रण वाढले आहे. डिजिटल युगामुळे मराठी लेखनशैलीतही बदल होत आहेत.

मराठीच्या विविध बोलीभाषा आणि रूपांमुळे भाषा अधिक समृद्ध आणि जिवंत राहिली आहे. बोलीभाषा आपल्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहेत, तर प्रमाण मराठी आपल्याला एकत्र बांधून ठेवते. त्यामुळे सर्वांनी मराठीच्या प्रत्येक रूपाचा आदर करून तिचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे.

•••

# मराठी भाषा माझी ओळख माझा अभिमान....

**पल्लवी कांबळे**
(बी. एड. प्रथम वर्ष)

मराठी भाषा ही माझी मातृभाषा आहे. मी लहानपणापासून मराठीतच बोलायला, लिहायला आणि विचार करायला शिकले. आईची माया, बाबांचे मार्गदर्शन, आजीआजोबांच्या गोष्टी आणि शाळेतील पहिले धडे – हे सगळं मला मराठीतूनच समजलं. त्यामुळे मराठी भाषा माझ्या आयुष्याचा खूप महत्त्वाचा भाग आहे. मराठी बोलताना मला आपलेपणा आणि आनंद वाटतो.

मराठी भाषेला मोठी आणि गौरवशाली परंपरा आहे. आपल्या संतांनी मराठीतून चांगले विचार लोकांपर्यंत पोहोचवले. संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरी लिहून सर्वसामान्य लोकांना ज्ञान दिले. संत तुकाराम यांच्या अभंगांमधून भक्ती, प्रामाणिकपणा आणि चांगले आचरण यांचा संदेश मिळतो. संत एकनाथ यांनी समाजात समतेचा विचार मांडला. या संतांमुळे मराठी भाषा अधिक समृद्ध झाली.

इतिहासातही मराठीचे महत्त्व मोठे आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापताना मराठी भाषेला सन्मान दिला. त्यामुळे मराठी ही स्वाभिमानाची आणि सन्मानाची भाषा ठरली.

मराठी साहित्य खूप समृद्ध आहे. मराठीत कथा, कविता, नाटक, कादंबऱ्या, आत्मचरित्रे आणि प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत. वि. स. खांडेकर यांनी उत्कृष्ट कादंबऱ्या लिहिल्या. पु. ल. देशपांडे यांनी आपल्या विनोदी आणि हृदयस्पर्शी लेखनातून वाचकांचे मन जिंकले. अशा साहित्यामुळे मराठी भाषेची गोडी वाढली आहे.

मराठी भाषेची खास गोष्ट म्हणजे तिची साधी आणि सुंदर रचना. मराठीतील म्हणी आणि वाक्प्रचार आपल्याला जीवनाचे धडे देतात. उदाहरणार्थ, "जशी करणी तशी भरणी" ही म्हण आपल्याला चांगले कर्म करण्याची शिकवण देते. मराठी भाषा आपल्या सण-उत्सवांमध्ये, गाण्यांमध्ये आणि परंपरांमध्ये दिसते. लोकगीत, भारूड आणि नाटक यांमधून मराठी संस्कृती जिवंत राहिली आहे.

आज आपण इतर भाषा शिकतो, पण आपली मातृभाषा विसरू




नये. मराठी भाषा जपणे आणि तिचा अभिमान बाळगणे ही आपली जबाबदारी आहे. मुलांनी मराठी वाचावी, लिहावी आणि बोलावी, म्हणजे आपली संस्कृती आणि परंपरा टिकून राहतील. शाळांमध्ये आणि घरी मराठीला प्राधान्य दिले तर भाषा अधिक बळकट होईल. मराठी भाषा मला आत्मविश्वास देते. माझे विचार मी मराठीतून स्पष्टपणे मांडू शकते. त्यामुळे मला मराठी भाषेचा खूप अभिमान आहे. मराठी भाषा माझी ओळख आहे, माझा अभिमान आहे आणि माझ्या जीवनाचा मजबूत पाया आहे.

•••

# मराठी भाषा संवर्धनः आजच्या पिढीपुढील आव्हाने आणि आमचा संकल्प !

## मराठी भाषा टिकवण्यासाठी आजची पिढी काय करू शकते?



**प्रणिता राहुल कोल्हापुरे**
(बी. एड. प्रथम वर्ष)

**"लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी..."**

कविवर्य कुसुमाग्रजांच्या या ओळी वाचल्या की आजही अंगावर रोमांच उभे राहतात. पण कॉलेजमध्ये वावरताना किंवा सोशल मीडिया स्क्रोल करताना मनात एक प्रश्न येतो - आपण खरोखर ही 'धन्यता' जपतोय का? आज आपण २१ व्या शतकात आहोत, जिथे जागतिकीकरणाच्या ओघात भाषांची भेसळ होत आहे. युनेस्कोच्या एका अहवालानुसार, जर आपण प्रयत्न केले नाहीत, तर या शतकाच्या अखेरीस अनेक प्रादेशिक भाषा

नामशेष होऊ शकतात. मराठी ही जगातील १० व्या क्रमांकाची मोठी भाषा असली, तरी ती केवळ घरातील संवादापुरती न ठेवता तिला 'विज्ञानाची आणि करिअरची' भाषा बनवणे, हीच आमच्यासारख्या तरुण पिढीची खरी जबाबदारी आहे.

**मराठीच्या या प्रवासात आपण खालील चार गोष्टी करू शकतो :**

### १. शिक्षणाची भाषा 'मराठी '

आज आपल्या अवतीभवती इंग्रजी माध्यमाचं पेव फुटलंय. पण मित्रांनो, इंग्रजी शिकणं आणि इंग्रजी माध्यमात शिकणं यात फरक आहे. वैज्ञानिक वास्तव हे की 'असर' (ASER) चा अहवाल सांगतो की, ज्या मुलांचं प्राथमिक शिक्षण मातृभाषेत होतं, त्यांची तर्कशक्ती आणि गणिती क्षमता इतरांपेक्षा ३५ ते ४० टक्क्यांनी जास्त असते. आपण ज्यांना 'आदर्श' मानतो, ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. रघुनाथ माशेलकर आणि डॉ. विजय भटकर यांचं शिक्षण मराठीतूनच झालं आहे. त्यामुळे मराठी शाळेत शिकणं म्हणजे मागासलेपण नव्हे, तर तो प्रगत विचारांचा पाया आहे.हे आपण समजून घेतले पाहिजे.

### २. डिजिटल मराठीत तंत्रज्ञानात आपली आघाडी:

आज आपण तासनतास मोबाईलवर असतो. जर इंटरनेटवर मराठी दिसली नाही, तर ती कालबाह्य ठरेल. डिजिटल क्रांती नुसार गुगलच्या मते, ९०% भारतीय युजर्सना स्वतःच्या भाषेत माहिती हवी असते. इथे आपण पुढाकार घेऊन आपल्या मायबोली मराठी मध्ये माहिती प्रस्तुत करायला हवी. आपली मराठी माणसे, अभिमानास्पद नावे: अमित साठे (गुगल मॅप्स मराठीत आणणारे) किंवा राहुल कुलकर्णी (गुगल इनपुट टूल्सचे जनक) यांनी मराठीला तंत्रज्ञानाची जोड दिली. आपण देखील सोशल मीडियावर 'रोमन' ऐवजी 'देवनागरी' लिपीत चॅटिंग करणं, मराठी ब्लॉग्स लिहिणं आणि विकिपीडियावर मराठीत माहिती भरणं, हे आपण आजच सुरू करू शकतो.

### ३. बोलीभाषेचा अभिमान:

मराठी भाषेत अंदाजे ४० ते ६० पेक्षा जास्त प्रमुख बोलीभाषा आणि त्यांच्या सूक्ष्म उपबोली अस्तित्वात आहेत. भाषातज्ज्ञांच्या मते मराठीच्या सुमारे ९४ विविध बोलीभाषा ओळखल्या जातात, भौगोलिक विस्तारानुसार या बोलीभाषांचा उच्चार, शब्दसंग्रह आणि व्याकरणामध्ये थोड्याफार प्रमाणात वेगळ्या असतात. मराठी म्हणजे केवळ पुस्तकी भाषा नाही. ती अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी आणि कोल्हापुरी अशा विविध बोलींनी सजलेली आहे. म्हणूनच तर 'सैराट' किंवा 'पावनखिंड' सारख्या चित्रपटांना आपण डोक्यावर घेतलं, कारण त्यात आपल्या बोलीभाषा, मातीचा वास होता. आपला संकल्प हा नक्की असावा की कॉलेजमध्ये बोलताना आपली बोली बोलायला लाजायचं नाही. तसेच, "वाचाल तर वाचाल" या उक्तीप्रमाणे वर्षाला किमान ५-६ दर्जेदार मराठी पुस्तकं वाचण्याचा छंद आपण लावून घेतला पाहिजे.

### ४. करिअर आणि मराठी :

ज्या भाषेत पैसा मिळतो, ती भाषा कधीच मरत नाही. मराठी आता केवळ साहित्याची भाषा राहिलेली नाही तर ती व्यवहारात मोठ्या प्रमाणात वापरली जाते. आज OTT प्लॅटफॉर्म्स, पॉडकास्ट आणि जाहिरात क्षेत्रात (Copywriting) मराठी टॅलेंटला मोठी मागणी आहे. ती २० ते ३० टक्क्यांनी वाढत आहे, आणखी वाढवण्यासाठी आपण मराठी सृजणशील चित्रपट ,कला, साहित्य निमिर्ती वर मेहनत घेऊ शकतो. उद्योजकता: हनुमंत गायकवाड (BVG Group) असोत किंवा 'येवले अमृततुल्य' सारखे ब्रँड्स, यांनी मराठीच्या जोरावर साम्राज्य उभं केलंय तसेच जर आपलं मराठीवर प्रभुत्व असेल, तर आपण ट्रान्सलेशन, डबिंग किंवा कंटेंट क्रिएशनमध्ये जग जिंकू शकतो. मराठी भाषा ही केवळ आपल्या पूर्वजांचा वारसा नाही, तर ती आपली 'ताकद' आहे. "मराठी पाऊल पडते पुढे" हे ब्रीदवाक्य केवळ आपल्या कॉलेजच्या भिंतीवर न राहता, ते आपल्या प्रत्येक स्वाक्षरीत आणि व्यवहारात असायला हवं. आपण जर आपल्या पुढच्या पिढीला मराठी शाळेत घातलं आणि अभिमानाने आपली भाषा जपली, तरच आपला हा झेंडा सातासमुद्रापार फडकत राहील.

**"माझ्या मराठीची गोडी, मला वाटते अवीट ।**
**तिच्या शब्दांतून पाझरे, ज्ञानाचे अमृत ।।"**

चला तर मग, कॉलेजमधील आपण सर्व मित्र मैत्रिणी मिळून संकल्प करूया – मराठी बोलूया, मराठी वाचूया आणि मराठी समृद्ध करूया!

**संदर्भ:**

१.UNSECO -Endangered Languages: UNESCO Atlas of the World's Languages in Danger (monitors the loss of languages, as one disappears every two weeks).

२.ASER - प्रथम फाऊंडेशन (Pratham Foundation) द्वारे प्रकाशित 'अॅनुअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' (ASER - ASER: वार्षिक शैक्षणिक स्थिती अहवाल)

•••

# अभिजात दर्जा व शिक्षण क्षेत्रातील बदल

**मनोज भीमसेन देशपांडे**
(बी. एड. प्रथम वर्ष)

मराठी भाषेला 'अभिजात भाषे'चा दर्जा मिळणे, ही केवळ एका भाषेची नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि अस्मितेची मोठी विजयगाथा आहे. एका प्रदीर्घ काळानंतर मातृभाषेत व्यक्त होताना मनाला मिळणारा आनंद शब्दातीत आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असताना आणि स्वतः या विषयाचा अभ्यास करताना, मराठी भाषा आणि शिक्षण पद्धतीतील बदल यावर मंथन करणे काळाची गरज बनली आहे.

मराठी भाषेचा इतिहास सुमारे दोन हजार वर्षांहून अधिक प्राचीन आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगवाणीपासून ते कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे आणि बालकवींच्या साहित्यापर्यंत मराठीचा वारसा अत्यंत समृद्ध आहे. संगणक आणि तंत्रज्ञानाच्या युगातही मराठीने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे, हे आपले भाग्यच म्हणावे लागेल. मात्र, आजच्या काळात या भाषेवर इतर भाषांचे, विशेषतः इंग्रजीचे वर्चस्व वाढत असल्याचे दिसून येते.

आज अनेक पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याला प्राधान्य देतात. त्यामागे आर्थिक स्थैर्य, परदेशातील संधी आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्याची ओढ असते. इंग्रजी शिकणे ही काळाची गरज असली, तरी 'केवळ' इंग्रजी माध्यमातूनच प्रगती साधता येते, हा एक मोठा भ्रम आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि इतर व्यावसायिक क्षेत्रांत उच्च यश मिळवता येते, हे अनेक यशस्वी व्यक्तींनी सिद्ध केले आहे. मातृभाषेतून घेतलेले शिक्षण हे सहज, सोपे आणि आकलनशक्ती वाढवणारे असते, हे शिक्षणतज्ज्ञांनीही वारंवार अधोरेखित केले आहे.

जेव्हा एखाद्या भाषेला 'अभिजात' दर्जा मिळतो, तेव्हा सरकार त्या भाषेच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी विशेष पावले उचलते. मात्र, केवळ सरकारी प्रयत्नांनी भाषा समृद्ध होत नाही. मराठी माणसाने आपल्या भाषेचा अभिमान बाळगणे आणि तिचे जतन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. जर आपणच आपल्या भाषेला कमी लेखले, तर ती समृद्ध कशी होणार? मराठी पुस्तकांचे वाचन कमी होणे आणि मराठी शाळा बंद होणे, ही धोक्याची घंटा आहे.




आज महाराष्ट्रावर परकीय भाषा आणि संस्कृतीचे आक्रमण होत आहे. हे थांबवण्यासाठी पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या पाल्यांना मराठी भाषेची गोडी लावणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी अस्मितेसाठी आणि स्वराज्यासाठी जो लढा दिला, तोच वारसा पुढे नेण्यासाठी आपल्याला आपल्या भाषेची किंमत ठेवावी लागेल. शिक्षण ही भाषा समृद्ध करण्याची पहिली पायरी आहे. मराठीतून शिक्षण घेतल्यास आपल्या संस्कृतीचे, साहित्याचे आणि कलेचे जतन आपोआपच होईल.

अभिजात दर्जा मिळणे ही कौतुकाची बाब असली, तरी भाषेचे खरे यश तिच्या वापरामध्ये आहे. आपण स्वतः पासून सुरुवात करूया. मराठी भाषेचा आग्रह धरूया आणि मातृभाषेतील शिक्षणाचा प्रसार करूया. संतांची शिकवण आणि शिवरायांचा इतिहास पुढील पिढीला द्यायचा असेल, तर मराठी टिकवणे अनिवार्य आहे. आपली जमीन, आपली भाषा आणि आपली संस्कृती यांचा सार्थ अभिमान बाळगून आपली ओळख टिकवून ठेवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

•••

# "कृत्रिम बुद्धिमत्ता(AI) युगातील मराठी भाषा: नव्या शक्यता, नवी ओळख"



**सहा. प्रा.**
**सुहासिनी सूर्यवंशी**

डिजिटल युगातील भाषेचे नवे वास्तव - एकविसावे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या प्रवाहाचे शतक आहे. या डिजिटल युगात भाषा केवळ अभिव्यक्तीचे साधन राहिलेली नाही, तर ती तंत्रज्ञानाशी थेट जोडलेली कार्यप्रणाली बनली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) म्हणजे संगणक प्रणालीद्वारे मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण करण्याची क्षमता होय. शिकणे, विश्लेषण करणे, तर्क लावणे आणि निर्णय घेणे या प्रक्रिया यंत्रांमार्फत घडवून आणणे म्हणजे एआयची मूलभूत संकल्पना आहे. आजच्या डिजिटल विश्वात हीच संकल्पना केंद्रस्थानी आहे.

भाषा आणि तंत्रज्ञान यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे नैसर्गिक भाषा प्रक्रिया (NLP). या तंत्रज्ञानामुळे संगणकाला मानवी भाषा समजणे, तिचे विश्लेषण करणे आणि त्यावर आधारित प्रतिसाद देणे शक्य होते. उदाहरणार्थ, एखाद्या व्हॉइस असिस्टंटला मराठीत प्रश्न विचारल्यास तो त्याचा अर्थ समजून मराठीतच उत्तर देतो ही प्रक्रिया मानव आणि संगणक यांच्यातील संवाद अधिक सुलभ करते.

मराठी ही जगातील प्रमुख भाषांपैकी एक असून सुमारे ८ कोटींपेक्षा अधिक लोक तिचा वापर करतात. साहित्य, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांमुळे ती समृद्ध आहे. तरीही डिजिटल क्षेत्रात तिचे अस्तित्व तुलनेने मर्यादित आहे. एआयसाठी आवश्यक असलेला व्यापक आणि दर्जेदार डेटा, संशोधन साधने आणि तांत्रिक पायाभूत सुविधा यांमध्ये मराठी अजूनही इंग्रजीच्या तुलनेत मागे आहे. त्यामुळे एआयच्या युगात मराठीची भूमिका, आव्हाने आणि संभाव्य दिशा यांचा विचार करणे अत्यावश्यक ठरते.

भाषा आणि एआय: संगणकाला मराठी कशी शिकवतात? आपण लहान मुलांना भाषा शिकवतो तसं, संगणकाला भाषा शिकवण्याचं तंत्रज्ञान आता आलं आहे. पण मुलांना आपण बोलून, वाचून, दाखवून शिकवतो, तर संगणकाला शिकवायचं म्हणजे प्रचंड मोठ्या प्रमाणात मराठी मजकूर त्याच्यापुढे ठेवायचा. समजा, एखाद्या मुलाने हजारो पुस्तकं वाचली, लाखो संभाषणं ऐकली, तर तो भाषेतला तरबेज होईल ना? अगदी तसंच संगणकाशी घडतं. आपण त्याला भरपूर मराठी पुस्तकं, बातम्या, लेख, कथा यांचा डेटा देतो. या डेटामधली आवर्तनं, शब्दांचे एकमेकांशी असलेले संबंध तो अभ्यासतो.

या प्रक्रियेला 'मशीन लर्निंग' म्हणतात. थोडक्यात, प्रचंड सरावातून संगणक मराठी समजून घ्यायला शिकतो. पण हा प्रवास सोपा नाही. मराठी भाषा खूप समृद्ध आहे, पण तिच्यामुळे संगणकासमोर काही खास अडचणी येतात.

पहिली अडचण आहे ती म्हणजे मराठी व्याकरणाची गुंतागुंत. इंग्रजीसारख्या सोप्या भाषांच्या तुलनेत मराठीत शब्दांची रूपं बदलतात. 'मुलगा गेला' आणि 'मुलगी गेली' यातला फरक आपल्याला लगेच कळतो, पण संगणकाला हा फरक शिकवण्यासाठी त्याला व्याकरणाचे हे सगळे नियम शिकवावे लागतात. 'करतोय, करत आहे, केलंय' यासारख्या क्रियापदांच्या विविध रूपांमुळे त्याची मदत होते.

दुसरी अडचण म्हणजे लिपी आणि लेखनातली विविधता. आपण एकच शब्द वेगवेगळ्या फाँटमध्ये लिहितो. कधी 'शेवटचे'तर कधी 'शेवटचं'असं लिहितो. युनिकोडमधल्या तांत्रिक गडबडींमुळे संगणक एकाच शब्दाचे वेगवेगळे फाँट किंवा चुकीचे स्पेलिंग पाहून गोंधळून जातो. त्याला समजायला लागतं की हे सारं एकाच शब्दाचे वेगवेगळे चेहरे आहेत, हे शिकवणं कठीण जातं.

तिसरी आणि सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे डेटाची कमतरता. इंग्रजीत जितका डिजिटल मजकूर सहज उपलब्ध आहे, तितक्या प्रमाणात मराठीत नाही. मराठीतली अनेक पुस्तकं, लेख अजूनही डिजिटल स्वरूपात नाहीत. जे आहे ते वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेलं आहे. एका प्रमाणित, स्वच्छ डेटासेट शिवाय संगणकाला प्रभावीपणे प्रशिक्षित करणं अवघड जातं. तरीही, अंधारातली ही चांदणी आहे की, आता परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. अनेक दिशांनी प्रयत्न सुरू आहेत.

भाषांतर सोपं झालंय: गूगल ट्रान्सलेट आणि मायक्रोसॉफ्ट ट्रान्सलेटरसारखी साधनं आता मराठीतून इतर भाषांमध्ये आणि इतर भाषांमधून मराठीत भाषांतर करू लागली आहेत. ती शंभर टक्के अचूक नसली, तरी एखाद्या परदेशी लेखाचा किंवा बातमीचा अर्थ समजून घ्यायला ती नक्कीच उपयोगी पडतात. आवाजातून संवाद शक्य झालाय: तुमचा मोबाईल तुम्हाला मराठीत समजू लागला आहे. गुगलच्या व्हॉइस सर्चपासून ते मोबाईलवर मराठीत संदेश बोलून लिहिण्यापर्यंतची साधनं आता अगदी सहज उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे, 'टेक्स्ट टू स्पीच'मुळे मराठी मजकूर संगणक आपल्यासाठी वाचून ऐकवू शकतो. यामुळे डिजिटल साक्षरतेला खूपच मदत झाली आहे.

निर्मितीक्षमतेला चालना मिळतेय: चॅटजीपीटी(CHATGPT) सारखी निर्मितीक्षम एआय साधनं मराठीतही काम करू लागली आहेत. त्यामुळे नवीन कल्पना सुचवणं, निबंधाचा मसुदा तयार करणं, कवितेची सुरुवात करणं यासाठी आता एआयची मदत घेता येते. विद्यार्थी, लेखक, संशोधक यांच्यासाठी ही एक पर्वणीच ठरतेय. एकंदरीत, संगणकाला मराठी शिकवणं हे एक आव्हान असलं तरी, अशक्य नक्कीच नाही. आपण जसजसं मराठीतलं डिजिटल साहित्य वाढवू, तसतसे ही साधनं अधिक सक्षम होत जातील. आणि एक दिवस असा येईल की एआयशी आपण आपल्या मायबोलीत अगदी सहज संवाद साधू शकू. शिक्षणाच्या वर्गात आता एक नवा शिक्षक प्रवेश करतोय, नाव आहे एआय(AI). पण हा शिक्षक वेगळा आहे. तो पारंपरिक पद्धतीने फळ्यासमोर उभा राहून शिकवत नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या शेजारी बसून त्याच्या गतीने शिकवू शकतो. एखाद्या विद्यार्थ्याला भौमितिक आकृत्या समजण्यात अडचण येत असेल, तर एआय त्याच्यासाठी वेगळी सिम्युलेशन्स (Simulation) तयार करू शकतो. एखाद्या विद्यार्थ्याला मराठी व्याकरणातील क्रियापदे आत्मसात करण्यात अडचण येत असेल, तर चॅटबोटशी संवाद साधता साधता त्याचा सराव होऊ शकतो. गणिताचा एखादा फॉर्म्युला समजण्यात अडचण येत असेल, तर एआय तीच संकल्पना वेगवेगळ्या प्रकारच्या सरावातून पक्की करू शकतो.

ई-लर्निंगच्या माध्यमातून मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान, गणित आणि तंत्रज्ञान यांसारख्या विषयांचे परस्परसंवादी धडे उपलब्ध होऊ शकतात. आज ग्रामीण भागातील मुलांना विज्ञान शिकताना ज्या प्रयोगशाळेची स्वप्नं पडतात, ती स्वप्नं एआय व्हर्च्युअल (AI virtual) प्रयोगशाळेतून साकार करू शकतो. भाषा शिक्षणातही एआयचा सहभाग वाढतोय. चॅटबोट्स विद्यार्थ्यांशी संवाद साधून भाषिक कौशल्य विकसित करू शकतात. विद्यार्थ्यांच्या लेखी उत्तरांचे प्राथमिक मूल्यमापनही आता स्वयंचलित पद्धतीने करता येतं. शिक्षकांसाठीही हे तंत्रज्ञान मोलाचं ठरतंय. इंग्रजीतील दर्जेदार संदर्भसाहित्य मराठीत उपलब्ध करून देणं, धड्याचा आराखडा तयार करणं, शैक्षणिक व्हिडिओ तयार करणं यासाठी एआय शिक्षकांचा विश्वासू सहाय्यक म्हणून काम करू लागलाय. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, दर्जेदार शैक्षणिक साधनांची कमतरता असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत एआय-आधारित प्रणाली गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचवू शकते.

एआयचा प्रभाव मात्र केवळ शिक्षणापुरता मर्यादित नाही. तो मराठी भाषेच्या सामाजिक आयुष्याला नवं वळण देतोय. भाषिक अस्मितेच्या दृष्टिकोनातून विचार करायचा झाला, तर एआय फक्त प्रमाण मराठीपुरता मर्यादित राहणार नाही. कोकणी, वऱ्हाडी, खान्देशी यांसारख्या बोलीभाषांनाही डिजिटल व्यासपीठ मिळू शकतं. मोठ्या प्रमाणावर भाषिक डेटा संकलित करून नैसर्गिक भाषा प्रक्रियेवर आधारित मॉडेल्स विकसित केल्यास या बोलीभाषांचे दस्तऐवजीकरण, जतन आणि प्रसार शक्य होईल. यामुळे भाषिक

विविधता टिकून राहील आणि प्रादेशिक ओळख अधिक दृढ होईल. आपला सांस्कृतिक वारसाही आता डिजिटल स्वरूपात जतन होऊ लागलाय. जुनी पुस्तकं, दुर्मिळ हस्तलिखितं, ग्रंथ यांचं डिजिटल रूपांतर होऊ लागलंय. एआयच्या साहाय्याने या साहित्यातील विशिष्ट संदर्भ, विषय किंवा कीवर्ड शोधणं अधिक सुलभ झालंय. यामुळे संशोधक, विद्यार्थी आणि सामान्य वाचकांसाठी मराठी साहित्य अधिक सुलभ होतंय. सांस्कृतिक वारशाचा हा डिजिटल पुनर्जन्म मराठीच्या नव्या ओळखीचा पाया ठरतोय. आजच्या तरुण पिढीच्या भाषेचाही विचार केला पाहिजे. सोशल मीडियावर मराठी-इंग्रजी मिश्रित भाषा मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. याला ‘कोड-मिक्सिंग’ (CODE-MIXING) म्हणतात. आधुनिक एआय प्रणाली अशा मिश्र भाषेचं विश्लेषण करू शकते आणि संदर्भानुसार योग्य प्रतिसाद देऊ शकते. त्यामुळे तरुण पिढीशी संवाद अधिक प्रभावी होतो. भाषा बदलत असते आणि एआय हा त्या बदलाची नोंद घेणारी प्रणाली ठरतोय. ज्ञानाच्या स्थानिकीकरणाचाही विचार होऊ लागलाय. वैद्यकीय, कृषी, तांत्रिक, शैक्षणिक माहिती प्रामुख्याने इंग्रजीत उपलब्ध असते. मशीन ट्रान्सलेशन प्रणालीमुळे ही माहिती मराठीत सुलभपणे उपलब्ध होऊ लागलीय. याचा सर्वाधिक लाभ शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण समाजाला होईल. ज्ञानाचं स्थानिकीकरण हा केवळ भाषांतराचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक न्यायाचं साधन आहे.

भविष्याची झलकही आता दिसू लागलीय. प्रशासनात एआयचा वापर वाढू लागलाय. सरकारी योजना, अर्ज, फॉर्म, कागदपत्रं यांचं अचूक मराठी भाषांतर उपलब्ध झालं, तर नागरिकांना प्रशासनाशी संवाद साधणं सोपं होईल. मराठीत संवाद साधणारे एआय चॅटबॉट्स नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकतील, तक्रारी नोंदवू शकतील, मार्गदर्शन करू शकतील. रोजगाराच्या नव्या संधीही उभ्या राहतायत. एआय क्षेत्रात मराठी भाषिक तज्ज्ञांची मागणी वाढू लागलीय. मराठी डेटा ॲनालिस्ट(Marathi Data Analyst), एनएलपी इंजिनियर(Marathi NLP Engineer (Natural Language Processing Engineer), एआय प्रॉम्प्ट रायटर(Marathi AI Prompt Writer), मराठी कंटेंट क्रिएटर (Marathi Content Creator) यांसारख्या नव्या भूमिका उदयास येतायत. भाषिक कौशल्य आणि तांत्रिक ज्ञान यांचं संयोजन रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण करतंय. प्रवास आणि व्यवसायातही एआयचा वापर वाढतोय. रिअल-टाइम (REAL-TIME) भाषांतर सॉफ्टवेअरमुळे पर्यटक आणि व्यावसायिकांना मराठीत संवाद साधणं सोपं होईल.

व्यावसायिक करार, व्यवहार, ग्राहक सेवा यांमध्ये मराठीचा वापर वाढल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल. पण या संधींबरोबरच काही आव्हानंही आहेत. सगळ्यात मोठं आव्हान आहे डिजिटल दरीचं (Digital Divide). स्मार्टफोन, संगणक, इंटरनेट सुविधा सर्वांपर्यंत पोहोचल्याशिवाय एआयचा लाभ सार्वत्रिक होणार नाही. ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत तांत्रिक सुविधा पोहोचवणं ही प्राथमिक गरज आहे. गुणवत्ता नियंत्रणाचाही प्रश्न आहे. एआयने तयार केलेलं भाषांतर किंवा मजकूर कधी कधी अर्थभ्रंश निर्माण करू शकतो. विशेषतः कायदेशीर, वैद्यकीय, शैक्षणिक संदर्भात मानवी पडताळणी अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञान आणि मानवी विवेक यांचा समतोल राखणं गरजेचं आहे. भाषेचं मूळ स्वरूप टिकवणंही तितकंच महत्त्वाचं आहे. अतिरेकी स्वयंचलिततेमुळे भाषेचं अतिसरलीकरण होऊ नये. मराठीची समृद्ध शब्दसंपदा, म्हणी, वाक्प्रचार, सांस्कृतिक संदर्भ जपणं आवश्यक आहे. यासाठी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. सरकार, शैक्षणिक संस्था, तंत्रज्ञान कंपन्यांनी एकत्र येऊन गुणवत्तापूर्ण मराठी डेटासेट्स तयार करणं, संशोधनाला प्रोत्साहन देणं, स्थानिक एआय मॉडेल्स विकसित करणं आवश्यक आहे. कारण एआयचा हा प्रवास म्हणजे मराठी भाषेचं भवितव्य ठरवणारा प्रवास आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही मराठी भाषेची प्रतिस्पर्धी नसून तिच्या प्रगतीसाठी एक सक्षम सहकारी ठरू शकते. प्रत्येक नवे तंत्रज्ञान सुरुवातीला अनिश्चिततेची भावना निर्माण करते, परंतु इतिहास साक्ष देतो की मुद्रणकला, रेडिओ, दूरदर्शन आणि इंटरनेट यांनी भाषेच्या अस्तित्वाला धोका निर्माण केला नाही, उलट तिच्या विस्ताराला चालना दिली. आज एआयही त्याच परंपरेतील पुढचे पाऊल आहे. योग्य दृष्टीकोनातून पाहिले, तर हे तंत्रज्ञान मराठीच्या संवर्धनासाठी, ज्ञानप्रसारासाठी आणि नव्या पिढीपर्यंत तिची सशक्त ओळख पोहोचवण्यासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते. तथापि, तंत्रज्ञान स्वतःपुरते पुरेसे नाही. मराठी भाषेच्या एआय युगातील यशासाठी विविध घटकांचा समन्वय आवश्यक आहे. भाषातज्ञांनी भाषेचे व्याकरण, शब्दसंपदा आणि बोली वैविध्य यांचे अचूक दस्तावलीकरण करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञांनी या भाषिक वैशिष्ट्यांचे संगणकीय मॉडेल्समध्ये रूपांतर करताना अचूकता आणि संदर्भसंवेदनशीलता जपली पाहिजे. शासनाने गुणवत्तापूर्ण मराठी डेटासेट्स निर्मितीसाठी आणि संशोधनासाठी भक्कम पाठबळ द्यावे.

शैक्षणिक क्षेत्रात शिक्षकांनी एआय साधनांचा सुजाण वापर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे अत्यावश्यक आहे. या सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच मराठीची डिजिटल वाटचाल सक्षम होईल. शेवटी, समतोल हाच कळीचा मुद्दा आहे अंधानुकरण नव्हे, तर सजग स्वीकार. एआयचा वापर करताना भाषेचे मूळ सौंदर्य, अभिव्यक्तीची खोली आणि सांस्कृतिक गाभा अबाधित राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जर आपण ही जबाबदारी जाणून, नियोजनपूर्वक आणि सकारात्मक दृष्टिकोनातून पुढे गेलो, तर कृत्रिम बुद्धिमत्ता मराठी भाषेला केवळ टिकवून धरणार नाही, तर तिला नव्या युगाची ओळख देईल. मराठीचे डिजिटल भवितव्य केवळ तंत्रज्ञानावर अवलंबून नसून आपल्या सजग सहभागावरही तितकेच अवलंबून आहे आणि हाच खरा समतोलाचा मार्ग आहे. नव्या शक्यता स्वीकारताना परंपरेचा सन्मान हाच मराठीच्या उज्ज्वल भविष्याचा खरा मंत्र आहे.

•••

# आजचा विद्यार्थी, AI आणि मराठी भाषा

**पौर्णिमा अरविंद चौगुले**
बी. एड. प्रथम वर्ष विद्यार्थिनी

आजचा विद्यार्थी खूप बदलला आहे... आणि खरं सांगायचं तर मीही त्यातलीच एक आहे. आज माझ्या हातात पुस्तक असतं, पण त्याचबरोबर मोबाईलही असतो. अभ्यास करताना काही कळलं नाही की लगेच Google किंवा Chat GPT उघडते. निबंध हवा, प्रोजेक्ट हवा, रिपोर्ट हवा – सगळ्यासाठी AI मदतीला असतो. आणि हो... मी ही त्याचा वापर करते.

कधी कधी मनात वाटतं – “वॉव!!! हे सगळं इतकं किती छान सोपं झालं आहे!” पण दुसऱ्या बाजूला एक प्रश्नही पडतो “मी स्वतः किती विचार करते?”

AI म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. आजच्या विद्यार्थ्यांचा तो जवळचा मित्र झाला आहे. तो प्रश्नांची उत्तरे देतो, कल्पना सुचवतो, भाषांतर करतो, लेखन सुधारतो. खरंच सांगायचं तर तो खूप उपयोगी आहे. पण...

मी प्रामाणिकपणे सांगते – मीसुद्धा कधी कधी AI वर खूप जास्त अवलंबून राहते. मला माहीत आहे की प्रत्येक गोष्ट त्याच्याकडून करून घेणं योग्य नाही. स्वतःचा विचार, स्वतःचं लेखन, स्वतःची मेहनत ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तरीही वेळ वाचतो म्हणून, काम पटकन होतं म्हणून मी AI वापरते. म्हणजेच...

मीही थोडीशी AI च्या आहारी गेले आहे. हे मान्य करताना थोडं खटकतं. कारण विद्यार्थी म्हणून आपल्यात विचार करण्याची क्षमता असायला हवी. आपण जर सगळं AI कडूनच करून घेतलं, तर आपली बुद्धीमत्ता कमी होईल का? आपला आत्मविश्वास कमी होईल का? हे प्रश्न मनात येतात. आता इथे मराठी भाषेचाही प्रश्न आहे.

आपण मराठी आहोत. आपली मायबोली मराठी आहे. घरात, मनात, भावना व्यक्त करताना आपण मराठीतच बोलतो. पण अभ्यास, तंत्रज्ञान, सोशल मीडिया यामध्ये मराठी थोडी मागे पडते आहे असं वाटतं.आज अनेक विद्यार्थी इंग्रजी शब्द जास्त वापरतात. “Assignment”,“Project”,“Submit”,“Online” हे शब्द सहज येतात. मराठी शब्द आठवत नाहीत किंवा वापरायची सवय राहत नाही. पण मला वाटतं, AI मुळे मराठीला नुकसानच होईल असं नाही. उलट योग्य वापर केला तर मराठीला नवी ताकद मिळू शकते.


आपल्या संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे यांनी मराठीला इतकं समृद्ध केलं आहे. त्यांनी तंत्रज्ञान नव्हतं तरीही इतकं मोठं साहित्य दिलं. मग आपण तंत्रज्ञान असताना मराठीला पुढे का नेऊ शकत नाही? AI चा वापर करून आपण मराठीत लेख लिहू शकतो, कविता तयार करू शकतो, ब्लॉग लिहू शकतो, व्हिडिओ बनवू शकतो. पण त्यात आपला विचार असायला हवा. फक्त कॉपी-पेस्ट नको.

मला आता जाणवतं की AI हा शत्रू नाही, पण तो पूर्ण आधारही नाही. तो मदतनीस आहे. शिक्षक नाही, लेखक नाही, विचारवंत नाही. जर मी प्रत्येक लेख, प्रत्येक प्रोजेक्ट AI कडूनच करून घेतला, तर माझी स्वतःची ओळख काय राहील? माझं लेखन कुठे आहे? माझे विचार कुठे आहेत?हे प्रश्न मला स्वतःलाच पडतात. म्हणून मला असं वाटतं – AI वापरणं चुकीचं नाही. पण त्याच्या आहारी जाणं चुकीचं आहे. मी आज हे मान्य करते की मीही त्यावर जास्त अवलंबून राहते. पण आता जाणीव झाली आहे. आता प्रयत्न करेन की आधी स्वतः लिहावं, स्वतः विचार करावा. नंतर गरज असेल तर AI ची मदत घ्यावी. आजचा विद्यार्थी म्हणजे फक्त तंत्रज्ञान वापरणारा नाही, तर विचार करणारा असावा. मराठी भाषा म्हणजे फक्त विषय नाही, ती आपली ओळख आहे.

AI मला जगाशी जोडतो...
पण मराठी मला माझ्या मुळांशी जोडते.
म्हणून शेवटी एवढंच म्हणेन –
मी AI वापरते, पण त्याची गुलाम नाही.
मी मराठी बोलते, लिहिते – आणि त्याचा अभिमान बाळगते.
तंत्रज्ञानासोबत चालते, पण स्वतःचा विचार जपते.
हीच माझी, आणि आजच्या विद्यार्थ्यांची खरी ओळख असावी.

•••

# डिजिटल युगातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी अध्यापन



**गणेश सोमवंशी**
(बी. एड. प्रथम वर्ष)

"लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी..." असे अभिमानाने म्हणत असताना आज आपण एका अशा वळणावर उभे आहोत, जिथे परंपरा आणि तंत्रज्ञान यांचा अभूतपूर्व संगम होत आहे. २७ फेब्रुवारी, ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिन आपण 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करतो. हा दिवस केवळ उत्सवाचा नसून भाषेच्या भविष्याचा वेध घेण्याचाही आहे.

आजचे युग 'डिजिटल युग' आहे आणि या युगाचे सर्वात प्रभावी शस्त्र म्हणजे 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (Artificial Intelligence - AI). गती आणि अचूकता या जोरावर AI ने जग व्यापले असताना, मराठी अध्यापन क्षेत्रातही याचे पडसाद उमटू लागले आहेत.

## पारंपारिक अध्यापन आणि बदलती आव्हाने

गेल्या काही दशकांत मराठी अध्यापनाची पद्धत मुख्यत्वे फळा-खडू आणि पाठ्यपुस्तकांपुरती मर्यादित होती. मात्र, आजच्या पिढीचे जग स्मार्टफोन, इंटरनेट आणि सोशल मीडियाभोवती फिरते. अशा वेळी विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी गोडी निर्माण करणे हे शिक्षकांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. व्याकरणातील किचकट नियम, शुद्धलेखनाच्या चुका आणि साहित्याशी तुटत चाललेला संपर्क यामुळे मराठी विषय अनेकदा विद्यार्थ्यांना रुक्ष वाटू लागतो. याच आव्हानांवर मात करण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' एक प्रभावी माध्यम म्हणून समोर येत आहे.
मराठी अध्यापनात AI चा वापर: एक नवी पहाट
कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे केवळ यंत्र नव्हे, तर मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करणारे एक प्रगत तंत्रज्ञान आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी याचा वापर खालीलप्रमाणे करता येईल:

**१. वैयक्तिकृत शिक्षण (Personalized Learning)** प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची क्षमता वेगळी असते. AI आधारित सॉफ्टवेअर विद्यार्थ्याच्या प्रगतीचे विश्लेषण करून त्याला झेपेल अशा पद्धतीने धडे देऊ शकतात. समजा, एका विद्यार्थ्याला 'समास' हा घटक समजत नसेल, तर AI त्याला अधिक सोपी उदाहरणे आणि व्हिडीओ देऊन तो विषय समजावून सांगू शकते.

**२. शुद्धलेखन आणि व्याकरण तपासणी**

मराठीत ऱ्हस्व-दीर्घ आणि अनुस्वाराच्या चुकांचे प्रमाण मोठे आहे. Chat GPT किंवा Google Gemini सारख्या साधनांमुळे शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनाही वाक्यांमधील चुका तत्काळ सुधारता येतात. हे केवळ चुका सुधारत नाही, तर त्या का चुकल्या आहेत, याचे स्पष्टीकरणही देऊ शकते.

**३. सर्जनशील सादरीकरण (Creative Presentation)**

एखादी जुनी कविता किंवा ऐतिहासिक धडा शिकवताना AI च्या मदतीने त्याचे दृश्य स्वरूपात रूपांतर करता येते. उदाहरणार्थ, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवताना AI जनरेटेड इमेजेस किंवा ॲनिमेशनचा वापर केला तर तो धडा विद्यार्थ्यांच्या मनात कायमचा कोरला जातो.

**४. बोलीभाषांचा अभ्यास** मराठी ही केवळ एक भाषा नसून ती बोलीभाषांची खाण आहे. अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी अशा विविध बोलींचा संग्रह आणि त्यांतील फरक समजावून सांगण्यासाठी AI डेटाबेसचा वापर अत्यंत प्रभावी ठरतो.

## शिक्षक आणि तंत्रज्ञानाचा समन्वय

अनेकांना असा प्रश्न पडतो की, AI आल्यामुळे शिक्षकांचे महत्त्व कमी होईल का? याचे उत्तर 'नाही' असे आहे. AI हे शिक्षकांचे स्पर्धक नसून 'साहाय्यक' आहे. शिक्षक हा वर्गातील चैतन्य असतो, तो विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेतो.

AI कडे माहिती असू शकते, पण ज्ञान देण्याची 'कला' आणि 'संवेदना' केवळ शिक्षकाकडेच असते. शिक्षकांनी जर डिजिटल साक्षर होऊन या तंत्रज्ञानाचा वापर केला, तर ते अध्यापनाचे काम अधिक सुलभ आणि रंजक करू शकतील. शिक्षकांचा वेळ पेपर तपासणी किंवा डेटा एन्ट्रीमध्ये जाण्याऐवजी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आणि त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात खर्च होऊ शकेल.

## आव्हाने आणि मर्यादा

कोणतेही तंत्रज्ञान हे निर्दोष नसते. मराठीसाठी AI वापरताना काही मर्यादाही आहेत: डेटाची कमतरता: इंटरनेटवर इंग्रजीच्या तुलनेत दर्जेदार मराठी मजकूर आजही कमी आहे. त्यामुळे AI कधीकधी चुकीचे संदर्भ किंवा अशुद्ध अनुवाद देऊ शकते.




भावनिक ओलावा: साहित्यातील रसग्रहण करताना ज्या मानवी संवेदना लागतात, त्या यंत्राकडे नसतात. बालकवींची निसर्गकविता किंवा साने गुरुजींचे 'श्यामची आई' मधील वात्सल्य समजून घेण्यासाठी मानवी मनाचीच गरज असते. डिजिटल दरी: ग्रामीण भागातील शाळांमध्ये आजही इंटरनेट आणि संगणकाची कमतरता आहे. तंत्रज्ञानाचा हा लाभ सर्वांपर्यंत पोहोचवणे हे सरकार आणि समाजापुढील मोठे आव्हान आहे.

## भविष्यातील वाटचाल

डिजिटल युगातील मराठी ही केवळ 'घरापुरती' मर्यादित न राहता ती 'जागतिक' झाली पाहिजे. यासाठी 'मराठी टायपिंग' पासून ते 'मराठी कोडिंग' पर्यंत आपण झेप घेतली पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक असे साधन आहे, ज्याचा वापर करून आपण मराठी भाषेला आधुनिकतेचे लेणे चढवू शकतो. भविष्यात असे 'व्हर्च्युअल ट्यूटर्स' तयार होतील, जे जगात कुठेही बसलेल्या व्यक्तीला अस्खलित मराठी शिकवू शकतील. "परंपरेच्या पाऊलखुणा जपत आधुनिकतेची क्षितिजे गाठणे" हीच काळाची गरज आहे. मराठी अध्यापनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिरकाव हा भाषेच्या ऱ्हासाचा संकेत नसून तो तिच्या विकासाचा नवा मार्ग आहे. तंत्रज्ञानाच्या या लाटेवर स्वार होऊन आपण आपल्या मातृभाषेला अधिकाधिक समृद्ध, लवचिक आणि सर्वसमावेशक बनवूया. जेव्हा तंत्रज्ञानाची जोड आणि भाषेचा अभिमान एकत्र येईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'मराठी पाऊल पडते पुढे' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरेल.

•••

# मोबाईलमधील मराठी : AI ची कमाल

**मोनिका पालवे**
बी.एड. प्रथम विद्यार्थिनी



आजच्या आधुनिक युगात मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण मोबाईलचा वापर करतात. आजकालच्या पिढीला मोबाईलशिवाय जीवनाची कल्पनाही करता येत नाही. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे मोबाईलमध्ये अनेक नवनवीन सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच AI (Artificial Intelligence) ही अत्यंत महत्त्वाची सुविधा आहे. AI मुळे मोबाईल अधिक स्मार्ट झाला आहे. मराठी भाषेचा वापर आता मोबाईलमध्ये अधिक सोपा आणि प्रभावी झाला आहे. उदा: आवाज ओळखून मराठीत टायपिंग करणे, मराठी भाषांतर करणे, प्रश्न विचारल्यावर मराठीत उत्तरे मिळणे, मराठी मजकूर वाचून दाखवणे (Text to Speech) ,व्याकरण दुरुस्ती आणि शब्दसूचना इ. या सर्व सुविधा AI मुळे शक्य झाल्या आहेत. त्यामुळे मराठी भाषेचा वापर वाढला असून, लोकांना आपल्या मातृभाषेत तंत्रज्ञानाचा उपयोग करता येत आहे. ग्रामीण भागातील लोकांसाठीही हे खूप उपयुक्त ठरले आहे. मराठी भाषेचा वापर सोपा प्रभावी झाल्यामुळे मोबाईल मधील मराठी यायची कमाल हा विषय आजच्या काळात विशेष महत्त्वाचा ठरतो. ए आयच्या सहाय्याने मराठी भाषेची भाषांतर ही सहज शक्य झाले आहे मोबाईल मधील वेगवेगळे ॲप्स इंग्रजी किंवा इतर भाषेतील मजकूर मराठीत अनुवादित करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करताना मोठी मदत होते एखादे इंग्रजी वाक्य किंवा शब्द समजत नसेल तर ते लगेच मोबाईल मधील ए आय त्यांना मराठी अर्थ सांगतो त्यामुळे ज्ञान मिळवणे सोपे झाले आहे. पूर्वी मोबाईल मध्ये इंग्रजी भाषेचे वर्चस्व होते मराठी भाषेत टायपिंग करणे कठीण वाटायचे पण आज ये आयच्या मदतीने मराठीत सहजपणे बोलता येते लिहिता येते आणि वाजता पण येते. मोबाईल मधील व्हॉइस टायपिंग हे आपण मराठीमध्ये बोललो की त्याचे मराठी रूपांतर देखील होते त्यामुळे टायपिंग चा त्रास कमी झालेला आहे. आणि मराठी भाषा वापरणे सुद्धा सोपे झाले आहे हे मोबाईल मधील एआय फक्त भाषण पुरते मर्यादित नसून तर ते शैक्षणिक क्षेत्रातही उपयुक्त ठरत आहे

विद्यार्थी यांच्या मदतीने काहीही करू शकतो. यायच्या मदतीने मराठी भाषेतील चुका दुरुस्त करणे योग्य शब्द सुचवणे वाक्यरचना सुधारणे शक्य झाले आहे. मोबाईल मध्ये असलेले कीबोर्ड एआय च्या साह्याने योग्य शब्द सुचवतात परंतु यायचा वापर करताना काही मर्यादा पण लक्षात घेणे आवश्यक आहे. ए आय वर पूर्णपणे अवलंबून राहणे योग्य नाही विद्यार्थ्यांनी स्वतः विचार केला पाहिजे हे आहे एक साधन आहे त्याचा योग्य वापर केल्यावर फायदा होतो पण हे आपल्या शरीरासाठी चांगले नाही. याचा गरजेपुरताच वापर केला पाहिजे.

आजच्या या युगात मोबाईल मधील एआय मुळे मराठी भाषेला नवीन संधी मिळाल्या सर्वसामान्यांसाठी हे आहे वरदान आहे शेवटी असे म्हणता येईल की मोबाईल मधील ए आय मुळे मराठी भाषेचा विकास होत आहे. आपण सर्वांनी यायचा योग्यच वापर केला पाहिजे चांगले तेवढेच वाईट देखील असते याचा विचार केला पाहिजे आणि मराठी भाषेचे संवर्धन करावे त्यामुळे मोबाईल मधील मराठी आणि ए आय याचीही अद्भुत कमाल आपल्या भविष्यासाठी उज्वल ठरेल.

•••

# डिजिटल युगात मराठी: संधी आणि आव्हाने

**नेहा पोवार**
बीएड प्रथम वर्ष

इंटरनेटच्या क्षेत्रात क्रांती झाल्याने सध्याच्या काळाची ओळख डिजिटल युग म्हणून केली जाते. मोबाईल, इंटरनेट, संगणक आणि सोशल मीडियामुळे जग खूप वेगाने बदलत आहे. या बदलाचा परिणाम मराठी भाषेवरही दिसून येतो. कोट्यावधी नागरिकांची मातृभाषा असलेल्या माय मराठीला देखील या डिजिटल जगात मानाचे स्थान मिळाले आहे. मोबाईल मधील सॉफ्टवेअर, संगणक प्रणाली आणि आता नव्याने जन्मलेल्या एआय मध्ये देखील मराठीचा वापर प्रकर्षाने होत आहे. डिजिटल युगामुळे मराठीसमोर जशा नवीन संधी निर्माण झाल्या तशीच काही आव्हानेही उभी राहिली आहेत.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीसाठी मराठी भाषेची निवड केली. तिथून खऱ्या अर्थाने मराठीच्या समृद्धीला सुरुवात झाली. त्याकाळी मराठी देवनागरी लिपीत लिहिली जायची आणि मुख्यतः धार्मिक ग्रंथ, अभंग आणि कविता यांत वापरली जायची. काळ बदलत गेला ही भाषा पुस्तके, वर्तमानपत्रे आणि दूरदर्शन पर्यंत येऊन पोहोचली. आता इंटरनेटमुळे मराठी जागतिक पातळीवर पोहोचली आहे आणि आपल्याला कोणतीही माहिती काही सेकंदात मिळते.

मराठी ई-पुस्तके, ब्लॉग, वेबसाईट्स, यूट्यूब चॅनेल आणि सोशल मीडिया पोस्ट यांच्या माध्यमातून मराठीचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत आहे. गुगल टायपिंग, भाषांतर साधने आणि व्हॉइस सर्च यामुळे मराठीत लिहिणे आणि वाचणे अधिक सोपे झाले आहे. त्यामुळे नवीन लेखकांना, कलाकारांना आणि निर्मात्यांना आपली कला आणि विचार मांडण्यासाठी चांगले व्यासपीठ मिळाले आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात ऑनलाइन शिक्षणाने शिक्षणव्यवस्था सुरू ठेवण्यास मोठी मदत केली.

डिजिटल युगात मराठी साहित्यही नव्या स्वरूपात उपलब्ध झाले आहे. पीडीएफ, ई-बुक्स आणि ऑडिओ बुक्समुळे वाचकांना कुठेही आणि केव्हाही साहित्य वाचता येते. सोशल मीडियामुळे मराठी कविता, कथा आणि माहितीपर लेख झपाट्याने लोकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे मराठी भाषेची व्याप्ती वाढत आहे. मात्र, या युगात काही आव्हानेही आहेत. सर्वात मोठे आव्हान म्हणजे सायबर सुरक्षा, हॅकिंग, डेटा चोरी, ऑनलाइन फसवणूक यांसारख्या गुन्ह्यांत वाढ झाली आहे. व्यक्तींची वैयक्तिक माहिती इंटरनेटवर सुरक्षित ठेवणे कठीण झाले आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा यांची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे.


इंग्रजी शब्दांचा वाढता वापर, चुकीचे शुद्धलेखन आणि मराठीऐवजी इतर भाषांचा अधिक वापर यामुळे मराठीच्या शुद्धतेवर परिणाम होऊ शकतो. काही वेळा लोक मराठी लिहिताना इंग्रजी अक्षरे वापरतात, त्यामुळे भाषेची ओळख कमी होत चालली आहे. आजकाल लोक इंटरनेट व मोबाईलच्या विळख्यात इतकी अडकत चालली आहे की त्यांना 5 मिनिटे मराठीत बोलण्यास सांगितले तर इंग्रजी शब्दांचा वापर होतोच. म्हणूनच मराठी बोलताना आणि लिहिताना योग्य शब्दांचा आणि शुद्धलेखनाचा वापर करणे गरजेचे आहे.

बीएडची विद्यार्थिनी म्हणून मला वाटते की शिक्षकांनी विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांचा योग्य वापर कशा पद्धतीने करायचा हे शिकवणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून मराठी वाचन, लेखन आणि संभाषण कौशल्ये विकसित करता येतात. पण त्याच वेळी शुद्ध भाषा वापरण्याची सवय लावणेही आवश्यक आहे.

एकूणच, डिजिटल युग हे मराठीसाठी धोकादायक नसून एक मोठी संधी आहे. या युगात अनेक संधी दडलेल्या आहेत, परंतु त्यांचा योग्य लाभ घेण्यासाठी जागरूकता, शिक्षण आणि जबाबदारीची भावना आवश्यक आहे. सायबर सुरक्षा, डिजिटल साक्षरता आणि नैतिक मूल्ये जपली तर डिजिटल युग समाजाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देऊ शकते. आपण सर्वांनी जाणीवपूर्वक मराठीचा अभिमान बाळगला आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला, तर मराठी भाषा अधिक सक्षम आणि समृद्ध बनेल.

# डिजिटल ग्रंथालय: मराठी ज्ञान परंपरेची नवी दिशा

**सहा. प्रा. सोनी मोरे**
(ग्रंथपाल)




**म**राठी भाषा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व बौद्धिक जीवनाची समृद्ध ज्ञानपरंपरा आहे, आणि या परंपरेचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ग्रंथालयांनी पार पाडले आहे. प्राचीन काळातील अभिलेखागार, हस्तलिखिते व पोथ्यांपासून ज्ञानसंग्रहाची परंपरा सुरू झाली. Library of Alexandria आणि नालंदा विद्यापीठ यांसारखी प्राचीन ज्ञानकेंद्रे त्या काळातील समृद्ध ग्रंथसंपदेची साक्ष देतात.

काळानुसार छापील ग्रंथांच्या युगातून ग्रंथालयांचा विस्तार झाला आणि आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल ग्रंथालयांची संकल्पना उदयास आली. आज पारंपरिक वारसा आणि डिजिटल साधनांचा संगम मराठी ज्ञानपरंपरेला अधिक व्यापक, विस्तृत व भविष्याभिमुख दिशा देत आहे. मानवजातीच्या प्रगतीचा पाया ज्ञानावर उभा आहे. काळानुसार ज्ञानसंकलन, जतन आणि प्रसाराच्या पद्धती बदलत गेल्या. हस्तलिखितांपासून छापील ग्रंथांपर्यंत आणि आता डिजिटल माध्यमांपर्यंतचा हा प्रवास अत्यंत महत्त्वपूर्ण होताना दिसत आहे. आज आपण डिजिटल युगात प्रवेश केला असून माहिती तंत्रज्ञानामुळे ज्ञानव्यवस्थेचे स्वरूप पूर्णपणे बदलत असतांना दिसून येत आहे. इंटरनेट, संगणक, मोबाईल तंत्रज्ञान आणि क्लाउड प्रणालीमुळे माहिती काही क्षणांत उपलब्ध होते. ज्ञान आता एका विशिष्ट ठिकाणी मर्यादित न राहता जागतिक स्तरावर सहज उपलब्ध झालेले आपल्याला दिसून येते.

## डिजिटल युगातील ज्ञानव्यवस्थेतील बदल

डिजिटल युगामुळे ज्ञाननिर्मिती, संग्रहण आणि वितरणाची प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ झाली आहे. पूर्वी माहिती मिळवण्यासाठी प्रत्यक्ष वाचनालयात जावे लागत असे; आता ती ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑनलाइन डेटाबेस आणि डिजिटल संग्रहांमुळे संशोधनाची गती वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्मार्ट सर्च प्रणालीमुळे आवश्यक माहिती काही सेकंदांत सापडते. ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण झाल्यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही आता जागतिक दर्जाचे साहित्य सहज उपलब्ध होत आहे.

## पारंपरिक वाचनालय ते डिजिटल ग्रंथालय

पारंपरिक वाचनालये ही पुस्तकांचे संग्रहण आणि वाचनासाठीची शांत जागा म्हणून ओळखली जात होती. त्यांची सेवा प्रामुख्याने पुस्तक देवाणघेवाण, संदर्भग्रंथ वाचन आणि वर्तमानपत्रे उपलब्ध करून देण्यापुरती मर्यादित होती. मात्र तंत्रज्ञानाच्या विकासामुळे वाचनालयांनी डिजिटल साधनांचा स्वीकार केला. ग्रंथांचे डिजिटायझेशन, ऑनलाइन कॅटलॉग (OPAC), ई-संसाधने आणि क्लाउड-आधारित प्रणाली यामुळे वाचनालयांचे रूपांतर डिजिटल ग्रंथालयात झाले. पारंपरिक पद्धतींचा आधार घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून वाचनालयांनी

ज्ञानपरंपरेला नवी दिशा दिली आहे.

## संतसाहित्य, लोकसाहित्य आणि सामाजिक सुधारणा

मराठी संतसाहित्य हे ज्ञानपरंपरेचे भक्कम पायाभूत स्तंभ आहे. संत ज्ञानेश्वर यांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) च्या माध्यमातून भगवद्गीतेचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले. संत तुकाराम यांच्या अभंगांनी समाजातील नैतिकता, समता आणि भक्तीचा संदेश दिला. संत नामदेव आणि संत एकनाथ यांनीही भक्ती, समता आणि सामाजिक जागृतीचा विचार मांडला. लोकसाहित्यामध्ये ओव्या, पोवाडे, भारुडे, लावण्या आणि लोककथा यांद्वारे समाजाचे जीवन, परंपरा आणि संस्कृती प्रतिबिंबित झाली. १९व्या शतकात सामाजिक सुधारणा चळवळींनी मराठी ज्ञानपरंपरेला नवे वैचारिक वळण दिले. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणप्रसार आणि स्त्री-शिक्षणासाठी कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, न्याय आणि मानवाधिकारांचा विचार मांडून ज्ञानाला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले.

## आधुनिक मराठी साहित्य व संशोधन परंपरा

आधुनिक काळात मराठी साहित्याने विविध प्रवाह अनुभवले— कादंबरी, कथा, कविता, नाटक, समीक्षा आणि दलित साहित्य यांचा विकास झाला. विष्णु सखाराम खांडेकर, कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) आणि पु. ल. देशपांडे यांसारख्या साहित्यिकांनी मराठी साहित्य समृद्ध केले. संशोधन परंपरेत विद्यापीठे, संशोधन संस्था आणि ग्रंथालयांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मराठी भाषा, साहित्य, इतिहास, समाजशास्त्र आणि लोकसंस्कृती या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संशोधन झाले. आज डिजिटल साधनांच्या मदतीने ही परंपरा अधिक व्यापक झाली असून मराठी ज्ञानपरंपरा जागतिक स्तरावर पोहोचत असल्याचे चित्र दिसून येते.

## डिजिटल ग्रंथालयाची संकल्पना आणि वैशिष्ट्ये

डिजिटल ग्रंथालय म्हणजे विविध प्रकारच्या ज्ञानस्रोतांचे (पुस्तके, संशोधन लेख, प्रबंध, अहवाल, चित्र-ध्वनी संग्रह इ.) डिजिटल स्वरूपात संग्रहण, व्यवस्थापन आणि ऑनलाइन वितरण करणारी आधुनिक माहितीप्रणाली होय. पारंपरिक वाचनालयात साहित्य प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन वापरावे लागत असे; परंतु डिजिटल ग्रंथालयामुळे ही संसाधने इंटरनेटच्या माध्यमातून 24x7 म्हणजेच कुठेही आणि कधीही उपलब्ध होतात. डिजिटल ग्रंथालयाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे वेग, सुलभता आणि व्यापकता यामुळे माहिती शोधण्यासाठी वेळेची व श्रमाची बचत होते. कीवर्डच्या सहाय्याने आपल्याला काही सेकंदांत आवश्यक संदर्भ मिळण्यास मदत होते.

## ई-बुक्स, ई-जर्नल्स, डेटाबेस, OPAC

**ई-बुक्स (E-Books):** छापील पुस्तकांचे डिजिटल स्वरूप. संगणक, टॅबलेट किंवा मोबाईलवर वाचता येतात. अनेक ई-बुक्समध्ये शोध, हायलाइट, नोट्स यांसारख्या सुविधा असतात.

**ई-जर्नल्स (E-Journals):** संशोधन लेख आणि शैक्षणिक लेखनाचे ऑनलाइन नियतकालिक. अद्ययावत आणि प्रमाणित माहिती संशोधकांना सहज उपलब्ध होते.

**डेटाबेस (Databases):** विशिष्ट विषयांवरील संशोधन लेख, प्रबंध, अहवाल आणि आकडेवारी यांचा व्यवस्थित डिजिटल संग्रह. विषयानुसार वर्गीकरण असल्याने माहिती शोधणे सुलभ होते.

**OPAC (Online Public Access Catalogue):** ही एक ऑनलाइन सूची प्रणाली आहे, ज्याद्वारे वाचकांना ग्रंथालयातील पुस्तके किंवा इतर साहित्य शोधता येते. पुस्तकाची उपलब्धता, लेखक, विषय इ. माहिती त्वरित पाहता येते.

**क्लाउड तंत्रज्ञान आणि ऑनलाइन प्रवेश:** क्लाउड तंत्रज्ञानामुळे डिजिटल ग्रंथालयातील माहिती सुरक्षित सर्व्हरवर साठवली जाते आणि इंटरनेटद्वारे वापरकर्त्यांना उपलब्ध केली जाते. यामुळे मोठ्या प्रमाणातील डेटा सुरक्षित ठेवणे, अद्ययावत करणे आणि शेअर करणे सोपे होते. ऑनलाइन प्रवेशामुळे वापरकर्त्यांना घरी बसून, कोणत्याही वेळेस आणि कोणत्याही ठिकाणाहून साहित्य वापरता येते.

**मराठी साहित्याचे डिजिटायझेशन:** मराठी साहित्याची परंपरा अनेक शतकांपर्यंत पसरलेली आहे. या परंपरेतील अनेक ग्रंथ, हस्तलिखिते, जुनी मासिके आणि अभिलेख कालांतराने नष्ट होण्याच्या शक्यता होती. कागदाची झीज, वातावरणातील बदल, अयोग्य जतन पद्धती आणि मर्यादित प्रती यांमुळे मौल्यवान साहित्य हरवण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर डिजिटायझेशन ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरली. डिजिटायझेशन म्हणजे छापील किंवा हस्तलिखित स्वरूपातील साहित्य स्कॅन करून त्याचे डिजिटल रूपांतर करणे व ते सुरक्षित डिजिटल संग्रहात साठवणे. यामुळे साहित्य दीर्घकाळ टिकते आणि ते जगभरातील वाचकांसाठी उपलब्ध होते. उदा- संत ज्ञानेश्वरांनी इ.स. १३व्या शतकात रचलेले ग्रंथ आजही मराठी साहित्याचा अमूल्य ठेवा दिसून येते. भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी), अमृतानुभव.

**दुर्मिळ ग्रंथांचे जतन:** अनेक जुने मराठी ग्रंथ मर्यादित प्रतींमध्ये उपलब्ध होते. त्यांचे डिजिटल रूपांतर केल्याने ते नष्ट होण्यापासून वाचले. उदाहरणार्थ, Internet Archive या संकेतस्थळावर अनेक जुनी मराठी पुस्तके आणि दुर्मिळ आवृत्त्या उपलब्ध आहेत. तसेच Digital Library of India या उपक्रमांतर्गत विविध भारतीय भाषांतील, त्यात मराठीतीलही, दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटल जतन करण्यात आले आहे.

## हस्तलिखिते, जुनी मासिके आणि अभिलेखांचे डिजिटल संग्रहण

मराठी संतसाहित्याची अनेक हस्तलिखिते, सामाजिक चळवळींची

कागदपत्रे, तसेच जुनी मासिके व वर्तमानपत्रे ही ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहेत. या साहित्याचे स्कॅनिंग करून डिजिटल संग्रह तयार करण्यात येत आहेत. उदाहरणार्थ, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी विविध संदर्भसाहित्य आणि विश्वकोशीय माहिती ऑनलाइन उपलब्ध करून दिली आहे. तसेच 'शोधगंगा' या राष्ट्रीय प्रबंध-संग्रहात मराठी विषयांवरील संशोधन प्रबंध डिजिटल स्वरूपात जतन केले आहेत. जुन्या मासिकांचे डिजिटायझेशन केल्यामुळे त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे सोपे झाले आहे. उदाहरणार्थ, १९व्या शतकातील मराठी नियतकालिकांमधील लेख आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध असल्याने संशोधकांना ऐतिहासिक संदर्भ सहज मिळतात.

**संशोधन व नवोपक्रमातील डिजिटल ग्रंथालयाची भूमिका:** डिजिटल ग्रंथालये ही आधुनिक संशोधन प्रक्रियेची कणा बनली आहेत. ज्ञाननिर्मिती आणि नवोपक्रमासाठी विश्वसनीय, अद्ययावत आणि सुलभ माहिती अत्यावश्यक असते. डिजिटल ग्रंथालये ही गरज प्रभावीपणे पूर्ण करतात. संशोधकांना आवश्यक संदर्भ, आकडेवारी, प्रबंध आणि शास्त्रीय लेख काही क्षणांत उपलब्ध होतात, त्यामुळे संशोधनाची गती आणि गुणवत्ता दोन्ही वाढतात.

**संदर्भसाहित्याची सहज उपलब्धता:** पूर्वी एखाद्या विषयावरील संदर्भ शोधण्यासाठी विविध ग्रंथालयांत जावे लागे. आज डिजिटल ग्रंथालयांमुळे ई-बुक्स, ई-जर्नल्स आणि ऑनलाइन डेटाबेस घरबसल्या उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, शोधगंगा' या पोर्टलवर भारतातील विविध विद्यापीठांचे संशोधन प्रबंध उपलब्ध आहेत. तसेच INFLIBNET Centre यांच्या माध्यमातून शैक्षणिक ई-संसाधनांचा मोठा संग्रह उपलब्ध होतो. यामुळे संशोधकांना पूर्वसाहित्याचा सखोल अभ्यास करून नवीन संशोधनासाठी दिशा मिळते.

**संशोधन साधने (Reference Tools, Plagiarism Check)**

डिजिटल ग्रंथालये केवळ माहितीपुरती मर्यादित नसून संशोधन प्रक्रियेसाठी उपयुक्त साधनेही उपलब्ध करून देतात.

**Reference Tools:** Zotero, Mendeley यांसारखी संदर्भव्यवस्थापन साधने संशोधकांना उद्धरणे (citations) व्यवस्थित साठवणे आणि ग्रंथसूची तयार करणे सुलभ करतात.

**Plagiarism Check Tools:** Turnitin किंवा इतर प्लॅजिअरिझम तपासणी प्रणालीमुळे संशोधनातील नाविन्यता तपासता येते. त्यामुळे संशोधन अधिक प्रामाणिक आणि शास्त्रीय बनते.

**जागतिक संशोधनाशी जोडणारा दुवा:** डिजिटल ग्रंथालये संशोधकांना जागतिक स्तरावरील ज्ञानविश्वाशी जोडतात. आंतरराष्ट्रीय ई-जर्नल्स, वेबिनार्स आणि ऑनलाइन परिषदांद्वारे संशोधकांना नवीन संशोधनप्रवाहांची माहिती मिळते. उदाहरणार्थ, Internet Archive सारख्या जागतिक प्लॅटफॉर्मवर विविध देशांतील संशोधन साहित्य उपलब्ध आहे.यामुळे मराठी संशोधकांना जागतिक संशोधनाशी तुलना करता येते, सहकार्य प्रकल्पांमध्ये सहभागी होता येते आणि आपले निष्कर्ष व्यापक पातळीवर मांडता येतात.

**शिक्षण क्षेत्रातील योगदान:** डिजिटल ग्रंथालयांनी शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. पारंपरिक शिक्षण पद्धतीत विद्यार्थी वर्गखोली आणि पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित असत; परंतु डिजिटल माध्यमांमुळे शिक्षण अधिक व्यापक, लवचिक आणि विद्यार्थी-केंद्रित झाले आहे. डिजिटल ग्रंथालये विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती, विविध अभ्याससाहित्य आणि स्व-अभ्यासाच्या संधी उपलब्ध करून देतात.

**ई-लर्निंग आणि ऑनलाइन अभ्यासक्रम:** डिजिटल ग्रंथालयांच्या माध्यमातून ई-बुक्स, व्हिडिओ लेक्चर्स, वेबिनार्स आणि ऑनलाइन अभ्यासक्रम सहज उपलब्ध होतात. अनेक शैक्षणिक प्लॅटफॉर्मवर प्रमाणित कोर्सेस उपलब्ध असून विद्यार्थी आपल्या सोयीच्या वेळेनुसार शिक्षण घेऊ शकतात. उदाहरणार्थ, SWAYAM या भारत सरकारच्या उपक्रमावर विविध विषयांवरील ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच INFLIBNET Centre शैक्षणिक ई-संसाधने उपलब्ध करून उच्च शिक्षणाला बळकटी देते. ई-लर्निंगमुळे विद्यार्थी स्वयंपूर्ण अभ्यास करू शकतात, पुनरावृत्ती करू शकतात आणि आवश्यक तेव्हा साहित्याचा पुन्हा वापर करू शकतात.

**ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी संधी:** डिजिटल ग्रंथालयांमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळत आहे. पूर्वी मोठ्या शहरांतील वाचनालये किंवा विद्यापीठांमध्येच उपलब्ध असलेले संदर्भसाहित्य आता इंटरनेटच्या माध्यमातून सर्वांसाठी खुले झाले आहे. मोबाईल फोन आणि इंटरनेटच्या साहाय्याने विद्यार्थी घरबसल्या जागतिक दर्जाचे साहित्य वापरू शकतात. यामुळे शैक्षणिक विषमता कमी होते आणि ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण घडते. डिजिटल ग्रंथालये ही ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी एक प्रभावी साधन ठरली आहेत.

**माहिती तंत्रज्ञानाचा वापर**: डिजिटल ग्रंथालये फक्त ई-बुक्स किंवा ऑनलाइन साहित्य पुरवण्यापुरती मर्यादित नाहीत; ती माहिती तंत्रज्ञानाचा पूर्ण वापर करून संशोधन, शिक्षण आणि ज्ञानप्राप्ती अधिक प्रभावी करतात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे माहिती शोधणे सोपे झाले आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI):** कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून डिजिटल ग्रंथालये वापरकर्त्यांच्या गरजेनुसार सामग्री सुचवतात. AI आधारित प्रणाली उदाहरणार्थ वाचकांच्या शोध इतिहासावरून संदर्भ साहित्य, ई-बुक्स किंवा जर्नल्स सुचवतात. यामुळे शोध प्रक्रियेत वेळ वाचतो आणि संशोधन अधिक कार्यक्षम होते. उदाहरणार्थ, AI प्रणाली स्मार्ट सर्च किंवा विषयानुसार सामग्री फिल्टर करण्याची सुविधा देते, ज्यामुळे आवश्यक माहिती काही सेकंदांत मिळते.

**बिग डेटा आणि स्मार्ट सर्च:** डिजिटल ग्रंथालयांमध्ये विविध स्रोतांचे मोठ्या प्रमाणातील डेटा संग्रहित असतो. बिग डेटा तंत्रज्ञान वापरून या डेटावर जलद विश्लेषण करता येते, संबंधित माहिती शोधली जाते आणि संशोधकांसाठी आवश्यक संदर्भ पटकन उपलब्ध होतो.

स्मार्ट सर्च प्रणाली वापरकर्त्यांच्या कीवर्ड, विषय किंवा संदर्भानुसार अचूक शोध निकाल देतात. उदाहरणार्थ, OPAC प्रणाली आणि ऑनलाइन डेटाबेस यामध्ये स्मार्ट सर्चमुळे जुनी पुस्तके, प्रबंध किंवा जर्नल्स काही सेकंदांत मिळतात.

**मोबाईल ॲप्स आणि डिजिटल पोर्टल्स:** मोबाईल ॲप्स आणि डिजिटल पोर्टल्समुळे डिजिटल ग्रंथालयाचा अनुभव सुलभ आणि प्रवेशयोग्य झाला आहे. वापरकर्ते आपल्या स्मार्टफोन किंवा टॅबलेटवरून ई-बुक्स वाचू शकतात, नोट्स तयार करू शकतात, संदर्भ जतन करू शकतात आणि संशोधन साहित्य डाउनलोड करू शकतात.

**उदाहरणार्थ**:

**NFLIBNET e-ShodhSindhu -** विद्यापीठांना ई-जर्नल्स आणि डेटाबेस उपलब्ध करून देते.

**Shodhganga-**प्रबंधांचेडिजिटलसंग्रहऑनलाइनउपलब्धकरतो. माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने डिजिटल ग्रंथालये वेगवान शोध, वैयक्तिकृत सुविधा, स्मार्ट डेटा ॲनालिटिक्स आणि सर्वत्र प्रवेशयोग्यता यांचा संगम घडवतात. यामुळे संशोधन, शिक्षण आणि नवोपक्रमाची प्रक्रिया अधिक परिणामकारक होते.

## ज्ञानाचे लोकशाहीकरण

डिजिटल ग्रंथालयांनी ज्ञानप्राप्तीची संपूर्ण दृष्टिकोनातून लोकशाहीकरण केले आहे. पूर्वी माहिती आणि संदर्भ साहित्य प्रामुख्याने शहरांतील मोठ्या ग्रंथालयांमध्ये किंवा विशिष्ट शैक्षणिक संस्थांमध्ये उपलब्ध होते. त्यामुळे ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थी, संशोधक किंवा सामान्य वाचक यांच्यासाठी ज्ञान मिळवणे आव्हानात्मक होते. डिजिटल ग्रंथालयांच्या माध्यमातून हे अंतर मिटवले आहे.

**सर्वांसाठी समान ज्ञानप्रवेश :** डिजिटल ग्रंथालये ई-बुक्स, ई -जर्नल्स, प्रबंध, मासिके, अभिलेख आणि डेटाबेस इंटरनेटच्या माध्यमातून सर्वांसाठी खुले करतात. ग्रामीण भागातील विद्यार्थीही उच्च दर्जाचे शिक्षण साहित्य वापरू शकतात. संशोधक घरबसल्या जागतिक स्तरावरील संदर्भ साहित्य मिळवू शकतात. भाषिक, सामाजिक किंवा आर्थिक स्थितीच्या अडचणीने ज्ञानापासून वंचित राहण्याची समस्या कमी होते. उदाहरणार्थ, Digital Library of India यांनी दुर्मिळ ग्रंथ डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून ज्ञानाचा व्यापक प्रसार केला आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम: ज्ञानाचे लोकशाहीकरण सामाजिक व सांस्कृतिक पातळीवरही परिणामकारक ठरले आहे. जुनी मासिके, संतसाहित्य, हस्तलिखिते आणि अभिलेख ऑनलाइन उपलब्ध झाल्यामुळे मराठी सांस्कृतिक वारसा सुरक्षित राहतो.

**समान संधी:** प्रत्येक नागरिकाला शिक्षण, संशोधन आणि स्वतःच्या ज्ञानविकासासाठी समान संधी मिळते दुर्लक्षित गटांना शिक्षण आणि संशोधनाच्या साधनांपर्यंत पोहोच मिळते. थोडक्यात, डिजिटल ग्रंथालयांनी ज्ञानाची देवाणघेवाण, सामाजिक समावेश आणि सांस्कृतिक संवर्धन सुनिश्चित करून आधुनिक समाजातील माहितीच्या लोकतंत्रीय दृष्टिकोनाला बळकटी दिली आहे. **डिजिटल ग्रंथालयातील आव्हाने:** डिजिटल ग्रंथालयांनी ज्ञानप्राप्ती आणि संशोधन प्रक्रियेत क्रांतिकारी बदल घडवले असले तरी काही आव्हाने आणि मर्यादा आजही टिकून आहेत. हे आव्हाने मुख्यतः तांत्रिक, कौशल्य व आर्थिक बाबींशी संबंधित आहेत. **इंटरनेट सुविधा:** डिजिटल ग्रंथालये मुख्यतः ऑनलाइन उपलब्ध असतात.त्यामुळेसततआणिवेगवानइंटरनेटकनेक्शनआवश्यकअसते.

## सर्वसमावेशक डिजिटल धोरण

भविष्यातील डिजिटल ग्रंथालये सर्वसमावेशक आणि समावेशक असावी लागतील. यासाठी: ग्रामीण व दुर्गम भागातील वापरकर्त्यांसाठी इंटरनेट सुविधा सुधारावी. डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी कार्यशाळा, ऑनलाइन मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे. दुर्मिळ ग्रंथांचे जतन व डिजिटायझेशन वेगाने सुरू ठेवावे. ओपन एक्सेस धोरणाला प्रोत्साहन देऊन ई-बुक्स, ई-जर्नल्स व संशोधन साहित्य मोफत उपलब्ध करावे. हे धोरण डिजिटल ज्ञानाचा समान प्रसार, सामाजिक समावेश आणि सांस्कृतिक जतन सुनिश्चित करेल.

## शासन व शैक्षणिक संस्थांची भूमिका शासनाची भूमिका:

राज्य आणि केंद्र सरकार डिजिटल ग्रंथालयांसाठी आर्थिक सहाय्य, राष्ट्रीय डिजिटल धोरणे आणि इंटरनेट सुविधा सुनिश्चित करावी.

**शैक्षणिक संस्थांची भूमिका:** विद्यापीठे, कॉलेजे आणि संशोधन संस्था डिजिटल साधनांचा वापर प्रशिक्षणात समाविष्ट कराव्यात, संदर्भ व्यवस्थापन साधने (Zotero, Mendeley), Plagiarism Check आणि ई-रिसोर्सेसचा प्रभावी वापर शिकवावा. **सामाजिक सहभाग :** समुदाय आणि स्वयंसेवी संस्थांनी डिजिटल साक्षरता मोहिमा राबवून स्थानिक स्तरावर ज्ञानाचा प्रसार सुनिश्चित करावा. यामुळे डिजिटल ग्रंथालय सर्वांसाठी लवचिक, परिणामकारक आणि समावेशक ठरेल, जे संशोधन, शिक्षण आणि सांस्कृतिक संवर्धनाला बळकटी देईल.

**डिजिटल ग्रंथालयांनी:**

संपूर्ण मराठी साहित्य, हस्तलिखिते, जुनी मासिके आणि अभिलेख सुरक्षित ठेवले आणि जगभरातून उपलब्ध करून दिले. संशोधन आणि नवोपक्रमाला सुलभ संदर्भ, ई-बुक्स, ई-जर्नल्स, डेटाबेस आणि डिजिटल साधने उपलब्ध करून दिली. शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी समान संधी निर्माण केली.

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शोध प्रक्रिया जलद, प्रभावी आणि वैयक्तिकृत केली. ज्ञानाचे लोकशाहीकरण साधून सामाजिक समावेश आणि सांस्कृतिक संवर्धन सुनिश्चित केले.

थोडक्यात, डिजिटल ग्रंथालये मराठी ज्ञानपरंपरेच्या संवर्धनासाठी केवळ साधन नव्हेत, तर प्रेरक केंद्र बनली आहेत. या नव्या तंत्रज्ञानामुळे ज्ञानसमृद्ध समाज घडविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि परिणामकारक बनली आहे. भविष्यातील धोरणात्मक उपाययोजना, डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण आणि सर्व स्तरांवरील समन्वय यामुळे डिजिटल ग्रंथालये मराठी समाजासाठी ज्ञानाचा स्थायी, सर्वत्र पोहोचणारा आणि समृद्ध स्त्रोत ठरतील.

●●●

# डिजिटल ग्रंथालय आणि मराठी भाषेचे बदलते स्वरूप



**कागदाची पाने आता स्क्रीनवर आली,**
**मराठी साहित्याची नवी पहाट झाली.**
**ई-बुक आणि ऑडिओत शब्द गुंफले,**
**मराठीचे वैभव सातासमुद्रापार पोहचले!**

**अंकिता भरत चोपडे**
(बी. एड. प्रथम वर्ष)

मानवी संस्कृतीचा इतिहास हा प्रामुख्याने ज्ञानाच्या संचयनाचा आणि त्याच्या हस्तांतरणाचा इतिहास आहे. मानवाने जेव्हापासून विचार करायला आणि ते विचार नोंदवायला सुरुवात केली, तेव्हापासून 'ग्रंथालय' या संकल्पनेचा जन्म झाला. प्राचीन काळी मातीच्या विटा, भूर्जपत्रे आणि चामड्याच्या गुंडाळ्यांवर सुरू झालेला हा प्रवास आज 'क्लाउड स्टोरेज' आणि 'डिजिटल रिपॉझिटरीज'पर्यंत येऊन पोहोचला आहे. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात ज्ञानाच्या कक्षा केवळ रुंदावल्या नाहीत, तर त्या मुक्त झाल्या आहेत. या बदलाचा केंद्रबिंदू म्हणजे 'डिजिटल ग्रंथालय'. मराठी भाषेच्या संदर्भात बोलायचे झाले तर, डिजिटल ग्रंथालये ही केवळ साहित्याचा साठा नसून ती मराठी संस्कृतीला सातासमुद्रापार नेणारी आधुनिक ज्ञानवाहिनी ठरली आहेत.

ग्रंथालयांची सुरुवात ही मानवाच्या 'जतन' करण्याच्या वृत्तीतून झाली. मेसोपोटेमियातील सुमेरियन संस्कृतीत पाच हजार वर्षांपूर्वी मातीच्या विटांवर लिहिलेली ग्रंथालये अस्तित्वात होती. भारतात प्राचीन काळी मौखिक परंपरा श्रेष्ठ होती, तरीही तक्षशिला, नालंदा आणि विक्रमशीला यांसारख्या विद्यापीठांनी ज्ञानाचे प्रचंड साठे जतन केले होते. नालंदा विद्यापीठाचे 'धर्मगंज' नावाचे ग्रंथालय नऊ मजली होते, यावरून आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरेची कल्पना येते. मध्ययुगीन काळात हस्तलिखितांच्या रूपाने ज्ञान मोजक्या लोकांपर्यंत मर्यादित होते. मात्र, १५ व्या शतकात जोहान्स गुटेनबर्गने मुद्रणकलेचा शोध लावला आणि ज्ञानाचे स्वरूप बदलले. पुस्तके छापली जाऊ लागली आणि ती सर्वसामान्यांच्या हाती पडली. महाराष्ट्रात सार्वजनिक वाचनालयांची चळवळ १९ व्या शतकात सुरू झाली. १८४८ मध्ये पुण्यात 'पुणे नगर वाचन मंदिर' स्थापन झाले आणि मराठी माणसाच्या वाचन संस्कृतीला एक निश्चित दिशा मिळाली.

अनेक दशके ग्रंथालय म्हणजे एक शांत जागा, लाकडी कपाटे आणि पुस्तकांचा विशिष्ट सुवास, असे समीकरण होते. ही ग्रंथालये समाज प्रबोधनाचे केंद्र राहिली आहेत. सार्वजनिक वाचनालयांनी स्वातंत्र्यलढ्यात आणि सामाजिक चळवळींमध्ये मोठी भूमिका बजावली. मात्र, काळाच्या ओघात पारंपरिक ग्रंथालयांच्या काही

मर्यादा स्पष्ट होत गेल्या. वाचकाला पुस्तकासाठी प्रत्यक्ष ग्रंथालयात जावे लागते. ग्रामीण किंवा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी हे कठीण असते. कागद हा नैसर्गिक घटक असल्याने तो काळानुसार खराब होतो. वाळवी, ओलावा आणि हाताळणीमुळे अनेक दुर्मिळ मराठी ग्रंथ नष्ट होण्याच्या मार्गावर होते. नवीन पुस्तकांसाठी जागा अपुरी पडणे ही अनेक ग्रंथालयांची मोठी समस्या आहे. एखाद्या महत्त्वाच्या पुस्तकाची एकच प्रत असेल, तर एका वेळी एकच वाचक त्याचा लाभ घेऊ शकतो.

१९९० नंतरच्या इंटरनेट क्रांतीने ग्रंथालयांच्या भिंती पाडून टाकल्या. डिजिटल ग्रंथालय म्हणजे डिजिटल स्वरूपातील मजकूर, प्रतिमा, ऑडिओ आणि व्हिडिओ यांचा संग्रह, जो संगणकीय जाळ्याद्वारे जगभरात कोठेही उपलब्ध होऊ शकतो. मराठी साहित्यासाठी हे परिवर्तन क्रांतिकारी ठरले. 'राज्य मराठी विकास संस्था', 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था' आणि अनेक खासगी संस्थांनी मराठी साहित्याचे 'डिजिटायझेशन' सुरू केले. आज 'ई-साहित्य प्रतिष्ठान', 'नेटभेट' आणि 'बुकगंगा' यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे हजारो पुस्तके 'पीडीएफ' किंवा 'ई-पब' स्वरूपात उपलब्ध आहेत.

डिजिटल ग्रंथालयांनी केवळ वाचण्याची पद्धत बदलली नाही, तर भाषेचे स्वरूपच बदलले आहे. आता वाचक हजारो पुस्तके आपल्या खिशात म्हणजेच मोबाईलमध्ये घेऊन फिरू शकतो. प्रवासात असताना किंवा विश्रांतीच्या वेळी सहज वाचन करणे शक्य झाले आहे. 'स्टोरीटेल' सारख्या ॲप्समुळे मराठी साहित्य आता 'ऐकले' जात आहे. ज्यांना वाचायला वेळ मिळत नाही किंवा ज्यांची दृष्टी कमकुवत आहे, अशांसाठी ही एक मोठी क्रांती आहे. यामुळे साहित्याचा रसास्वाद घेणाऱ्यांचा एक नवीन वर्ग तयार झाला आहे. अमेरिकेतील एखादा तरुण आपल्या मोबाईलवर 'ज्ञानेश्वरी' वाचू शकतो किंवा लंडनमध्ये बसून कोणी 'मृत्युंजय' अनुभवू शकतो. भौगोलिक सीमा ओलांडून मराठी भाषा खऱ्या अर्थाने 'वैश्विक' करण्यात डिजिटल ग्रंथालयांची भूमिका फार महत्वाची ठरली आहे.

'वाचाल तर वाचाल' हा मंत्र आधुनिक काळात डिजिटल ग्रंथालयांनी सार्थ ठरवला आहे. पूर्वी संदर्भ ग्रंथ केवळ मोठ्या विद्यापीठांमध्ये उपलब्ध असत. आज डिजिटल ग्रंथालयामुळे खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यालाही जागतिक दर्जाचे संशोधन साहित्य उपलब्ध झाले आहे. ही ज्ञानाची समान वाटणी आहे. डिजिटल ग्रंथालयांमध्ये 'सर्च' करण्याची सुविधा असल्याने संशोधकांचा वेळ वाचतो. विशिष्ट शब्द, संदर्भ किंवा तारीख शोधणे आता सेकंदांचे काम झाले आहे.

कोणत्याही तांत्रिक प्रगतीप्रमाणे डिजिटल ग्रंथालयाचेही दोन पैलू आहेत. डिजिटल ग्रंथालये २४X७ उपलब्ध असतात. ग्रंथालय कधीही बंद नसते. मध्यरात्रीही तुम्ही पुस्तक डाऊनलोड करून वाचू शकता. फिजिकल स्टोरेजची गरज नसल्याने लाखो पुस्तके एका सर्व्हरवर साठवता येतात. ज्ञानेश्वरांच्या काळातील हस्तलिखिते आता डिजिटल स्वरूपात जतन झाल्यामुळे ती कायमस्वरूपी सुरक्षित झाली आहेत. पुस्तकासोबत त्या विषयावरील व्हिडिओ किंवा ऑडिओ क्लिप्स जोडणे आता शक्य आहे, हे याचे फायदे आहेत. याचे जसे फायदे आहेत तसेच तोटे देखील आहेत. ज्यांच्याकडे इंटरनेट किंवा स्मार्टफोन नाही, असा वर्ग या सुविधेपासून वंचित राहतो. लेखकांच्या परवानगीशिवाय पुस्तके पीडीएफ स्वरूपात वितरीत केल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होते. सतत मोबाईल किंवा कॉम्प्युटरकडे पाहिल्याने डोळ्यांवर ताण येतो. पुस्तकाचा वास आणि पाने उलटण्याचा जो आनंद असतो, तो डिजिटल माध्यमात मिळत नाही.

पारंपरिक ग्रंथालयांची व्याप्ती त्यांच्या सभासद संख्येवर अवलंबून असते, तर डिजिटल ग्रंथालयांची व्याप्ती 'अनंत' आहे. मात्र, त्यांची मर्यादा 'तंत्रज्ञानावर' अवलंबून असणे ही आहे. जर सर्व्हर डाऊन झाला किंवा वीज नसेल, तर हे ज्ञानभांडार बंद होते. परंतु, याची व्याप्ती इतकी मोठी आहे की, आज आपण 'वेब ३.०' आणि 'मेटाव्हर्स' कडे जात आहोत, जिथे व्हर्च्युअल ग्रंथालयात प्रत्यक्ष बसून वाचण्याचा अनुभव घेता येईल. मराठी भाषा आता केवळ कपाटातील पुस्तकांमध्ये उरलेली नाही. ती आता ब्लॉग्स, पॉडकास्ट, विकिपीडिया आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सतत प्रवाही आहे. डिजिटल ग्रंथालय हे या प्रवाहाचे मुख्य केंद्र आहे. साने गुरुजी, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज यांच्या साहित्याला डिजिटल स्वरूप मिळाल्याने ते पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे सोपे झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मराठीचा संकोच न होता तिचा विस्तार होत आहे, ही सकारात्मक बाब आहे.

"ग्रंथ हेच गुरू" ही संकल्पना भारतीय संस्कृतीत पूर्वापार चालत आली आहे. आधुनिक काळात "ग्रंथ हेच सोबती" या स्वरूपात ते आपल्या मोबाईलमध्ये स्थिरावले आहेत. डिजिटल ग्रंथालये ही काळाची गरज आहेत. यामुळे केवळ मराठी साहित्याचे जतन होत नाहीये, तर भाषेला नवीन चैतन्य मिळत आहे. तंत्रज्ञान आणि परंपरा यांचा संगम झाल्यामुळे मराठी भाषेचे भविष्य उज्ज्वल आहे. आपण जितक्या प्रभावीपणे या डिजिटल साधनांचा वापर करू, तितकीच आपली मराठी भाषा समृद्ध आणि सामर्थ्यवान होईल.

ग्रंथालयांचे स्वरूप बदलले असले तरी त्यातील 'ज्ञान' मात्र तसेच आहे. हे ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचवणे आणि वाचन संस्कृती जिवंत ठेवणे, हेच आपल्या पिढीचे कर्तव्य आहे. कागदावरून स्क्रीनवर आलेले हे शब्द मराठीच्या वैभवाची नवी गाथा लिहीत आहेत.

●●●

# विभाग- II
# शिक्षकाभिमुख लेख

# भावी शिक्षकांची भाषिक जबाबदारी



**डॉ. पल्लवी वर्तक**
प्राचार्य, एस.एम.एस.अँड इ.टी.
बी.एड.कॉलेज, तळेगाव दाभाडे.

विद्यार्थी, शिक्षक आणि अभ्यासक्रम हे शिक्षण प्रक्रियेचे महत्त्वाचे तीन घटक आहेत. अभ्यासक्रमाचा विषय विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावी पद्धतीने पोहोचविण्यासाठी भाषा हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये मातृभाषेतून शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. कारण मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांची आकलन शक्ती वाढते व विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी होते. हे धोरण संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येय (Sustainable Development Goals) शी सुसंगत आहे.

परंतु आज खरच शिक्षणात मातृभाषेचा वापर किती केला जातो? आजच्या जागतिकीकरण आधुनिकीकरणाच्या काळात जिथे परकीय भाषा शिक्षणात येऊ घातल्या आहेत व त्यांचेच महत्त्व वाढताना दिसते आहे, तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव वाढत आहे तिथे भाषेचे संवर्धन करणे हे अत्यंत आव्हानात्मक आहे. शिक्षण म्हणजे केवळ माहितीचे आदान-प्रदान नसून त्याद्वारे विद्यार्थ्यांवर संस्कार होऊन त्यांच्या वर्तनात बदल अपेक्षित असतो. शालेय शिक्षणात ही जबाबदारी सहाजिकच शिक्षकांवर येते. हे संस्कार शिक्षक त्यांच्या भाषा शिक्षणातील चारही उद्दिष्टांच्या (Listening, Speaking, Reading Writing ) मार्फत रोजच्या अध्यापनातून, स्वतःच्या वर्तनातून विद्यार्थ्यांवर करू शकतो.

ह्यातील पहिली पायरी म्हणजे स्वतःच्या मातृभाषेबद्दलचा

अभिमान. शिक्षकानेच जर आपल्या भाषेला दुय्यम स्थान दिले, तर विद्यार्थी देखील तसेच शिकतात. शिवाय शिक्षक जेव्हा वर्गात शिकवीत असतो तेव्हा तो नुसतीच भाषा वापरत नसतो. तर ते विचार विद्यार्थ्यांच्या मनात पेरत असतो. हे करीत असताना त्याचे स्वतःचे भाषेबद्दलचे ज्ञान, शुद्ध उच्चारण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांपर्यंत शुद्ध भाषा पोहोचेल. शिक्षकाने विद्यार्थ्यांसमोर स्वतःच्या वर्तनातून आदर्श निर्माण केला पाहिजे.

विद्यार्थी शिक्षकाचे अनुकरण करीत असतात. शिक्षकांचे उच्चार, शब्दसंग्रह, वाक्यांची ठेवण, बोलण्यातील सुस्पष्टता यांचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासावर होतो. शिक्षकाचे स्वतःचे बोलणे हे व्याकरण दृष्ट्या अचूक असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या मनोविकासाच्या दृष्टीने देखील भाषेचा योग्य वापर महत्त्वाचा ठरतो. चुकीची भाषा किंवा कठोर शब्द हे विद्यार्थ्याच्या मनावर नकारात्मक परिणाम करू शकतात. शिक्षकाने भाषेचा वापर करताना अत्यंत जागरूक असणे आवश्यक आहे. भाषा हे फक्त संप्रेषणाचे साधन नसून त्यातून विद्यार्थ्यांची विचार पद्धती विकसित होते.

विद्यार्थी जेव्हा बोलतो तेव्हा त्यातून त्याचे विचार कळतात. कारण आपण मुख्य भाषेतून म्हणजेच मातृभाषेतून विचार करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे विचार समृद्ध करावयाचे असतील तर त्यांची भाषा देखील तेवढीच समृद्ध असली पाहिजे. त्याकरिता विद्यार्थ्यांना भाषेचे वेगवेगळे आयाम जसे कविता, लेख, निबंध, कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णने इत्यादी परिचित करून दिले पाहिजे. विद्यार्थ्यांना विविध साहित्य संमेलनात उपस्थित राहण्याकरिता संधी दिली पाहिजे.

भाषा समृद्ध करण्यासाठी वाचन संस्कृती रुजवली पाहिजे. त्याकरिता वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील लेखक, कवी, कवयित्री त्यांचे साहित्य यांची ओळख विद्यार्थ्याला करून दिली पाहिजे. सध्या व्हिडिओ व रील च्या जमान्यात नष्ट होण्याच्या मार्गावर असलेले वाचन वाढीस लागून चांगले छंद जोपासता येतील.

डिजिटल युगातील ॲप्स जसे किंडल येथे मराठी भाषेतील पुस्तके वाचनाकरता उपलब्ध असतात त्यांचा वापर करता येईल. भाषा एकच असली तरी बोलीभाषा अनेक असतात. अशा परिस्थितीत शिक्षकाने एकाच भाषेचा बडेजाव न करता इतरही भाषांना तेवढेच महत्त्व देऊन त्यांचा सन्मान राखला पाहिजे व त्यांना मुख्य व शुद्ध भाषेशी जोडण्याचे काम केले पाहिजे. NEP 2020 मध्ये बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यात आले आहे. अशा रीतीने भाषिक शिक्षण हे सर्वसामावेशक होऊ शकेल. शिक्षकाने स्वतः रोजच्या व्यवहारात मातृभाषा बोलली पाहिजे जेणेकरून विद्यार्थ्यांनाही तशीच सवय लागेल. आजकाल विद्यार्थी इंग्लिश किंवा MINGLISH (Marathi + English) चा वापर करताना दिसतात. त्यांना मातृभाषेतून बोलण्याकरता प्रोत्साहित केले पाहिजे.

रोजच्या व्यवहारात मातृभाषेचा वापर केल्याने विचार, भावभावना इतरांपर्यंत पोहोचविणे सोपे जाते. शिक्षकाने विद्यार्थ्यांना त्यांच्या शब्दांमध्ये व्यक्त होण्याची संधी दिली पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल. तंत्रज्ञानाचा वापर व भाषेचं संवर्धन या दोन्ही बाजू एकत्रितपणे बघताना असे लक्षात येते की विद्यार्थ्यांना निबंधलेखन, पत्रलेखन, गृहपाठ करणे जरी सोयीचे व सोपे झाले असले तरी त्यामुळे विद्यार्थ्यांची विचार प्रक्रिया आणि भाषेची अभिव्यक्ती खुंटणार नाही याची काळजी शिक्षकाला घ्यावी लागेल. विद्यार्थी विकासामध्ये भाषा हा अडसर न राहता ती ताकद बनली पाहिजे. याकरता विविध उपाय शिक्षकाने निर्माण केले पाहिजेत. विद्यार्थ्यांचा त्यामध्ये सहभाग घेतला पाहिजे. जसे तंत्रज्ञानाच्या युगात विविध कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विविध एआय टूल्स मराठी भाषेमध्ये निर्माण करून ते सर्वांपर्यंत पोहोचविले पाहिजेत.

भाषेच्या माध्यमातून मूल्य शिक्षण, नैतिक शिक्षण देता येऊ शकते. मूल्यशिक्षण हे आपल्या भारतीय प्राचीन संस्कृतीचा आधार आहे. मराठी भाषेतील अभंग, ओव्या भारुडे यातून ते देता येऊ शकते. NEP 2020 मुळे शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणाली च्या अंतर्भावामुळे वेद, उपनिषदे यातील तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरी, दासबोध व इतर संत ग्रंथांच्या माध्यमातून मराठीतून सर्वांना उपलब्ध झाले आहे. त्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा संक्रमित होईल व त्याचे संवर्धन होईल. शिक्षक हा फक्त विषयाचे ज्ञान देणारा नसून तो भाषेचा वारसा पुढे नेणारा एक सांस्कृतिक दूत आहे असे म्हणण्यास संधी आहे.

गार्डनर हॉवर्ड यांच्या बहुविध बुद्धिमत्ता उपागमातील भाषिक बुद्धिमत्ता वाढविण्यासाठी वरील सर्व उपाय केवळ भाषा शिक्षकानेच नाही तर इतरही विषयाच्या शिक्षकांनी त्याकरिता प्रयत्न केले पाहिजेत.

NEP 2020 मुळे मातृभाषेला शिक्षणात पुन्हा एकदा प्रतिष्ठा मिळाली आहे. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने आपली जबाबदारी ओळखून एक सुसंस्कृत आणि वैचारिक दृष्ट्या प्रकल्प पिढी निर्माण करण्याच्या कामी योगदान दिले पाहिजे.

•••

# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि शिक्षक शिक्षण




**सहा. प्रा.**
**अलका प्रदीप नारखेडे**

भारत नेहमीच जगभरातील विद्यार्थ्यांसाठी एक गंतव्यस्थान राहिले आहे. प्राचीन विज्ञानांपासून ते कला, तत्वज्ञान आणि साहित्यापर्यंत, या देशाने शतकानुशतके विविध पर्याय दिले आहेत. म्हणूनच ते शिक्षणाचे भूमी म्हणून ओळखले जाते. काळाच्या ओघात, भारतातील शिक्षण व्यवस्थेत बाह्य जगाशी जुळवून घेण्यासाठी फारसे बदल झालेले नाहीत. १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यापासून, भारतातील सर्व नागरिकांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षक शिक्षणाचा "गुणवत्तापूर्ण" पैलू सुधारण्यासाठी अनेक धोरणात्मक हस्तक्षेप करण्यात आले आहेत. यामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ (NPE, १९६८) आणि त्यानंतर १९८६ मध्ये झालेल्या सुधारणांचा समावेश आहे

(NPE, १९८६) आणि १९९२. दीर्घ काळानंतर सुमारे सत्तावीस वर्षांनी भारत सरकारने २९ जुलै २०२० रोजी तिसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण सुरू केले. हे नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NPE २०२०) भारताच्या शिक्षण प्रणालीची (पूर्व-प्राथमिक ते उच्च शिक्षण) रूपरेषा आणि व्यापक दृष्टिकोन देते. भारत सरकारने २०३० पर्यंत या धोरणाच्या शिफारसी पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन धोरणाची गुरुकिल्ली म्हणजे विद्यार्थ्यांना तसेच संपूर्ण देशाला दर्जेदार शिक्षण देणे आणि जागतिक दर्जाच्या संदर्भात भारताचे शिक्षण अधोरेखित करणे. NEP-२०२० दस्तऐवजात दोन प्रमुख विषयांवर चर्चा केली आहे: २०३० पर्यंत सर्व TEI चे एकात्मिक TE (ITE) कार्यक्रमांमध्ये रूपांतर करणे आणि शिक्षक तरतूद आणि प्रशिक्षण शिक्षणासाठी संपूर्ण नियोजन प्रकल्प हाती घेणे, ज्यावर ITE विद्यापीठे आणि महाविद्यालयांची संख्या दृढ असेल. शिक्षक हे खरोखरच आपल्या समाजाचा

कणा आहेत. शाळेत अध्यापन हे बंधनकारक नसलेले काम आहे पण शाळेबाहेरही ते आपल्या समाजात बदल घडवून आणतात आणि सुधारणा घडवून आणतात. शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकावर, विशेषतः शिक्षक शिकवण्यावर अवलंबून असते आणि शिक्षकांचे अध्यापन शिक्षकांच्या शिक्षण कार्यक्रमावर अवलंबून असते. शिक्षकांसाठी गुण जन्माला येऊ शकतात किंवा ज्ञान, वृत्ती, नैतिकता आणि क्षमता विकसित करून शिक्षण आणि प्रशिक्षणाद्वारे योग्य मार्गाने शोधता येतात. या कारणास्तव, शिक्षक शिक्षणाकडे सरकारच्या सहकार्याने विविध आयोग आणि समित्यांकडे वेगवेगळ्या सादरीकरण धोरणे, शिफारसी आणि मसुदे तयार करण्यासाठी बारकाईने पाहिले जाते. पूर्वी ते शिक्षक प्रशिक्षण म्हणून ओळखले जात असे परंतु आता ते शिक्षक शिक्षण म्हणून ओळखले जाते. "प्रशिक्षण" हा शब्द म्हणजे एक छोटीशी संकल्पना आणि "शिक्षण" हा शब्द म्हणजे शिक्षकांची संकल्पना यात मोठा फरक आहे. सध्याच्या संदर्भात जगभरात शिक्षकांच्या शिक्षण कार्यक्रमांवर भर दिला जात आहे. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये एक अशी चौकट आहे जिथे केंद्र आणि राज्य सरकारे शिक्षक शिक्षणात गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि सुधारणा आणण्यासाठी एकत्र येऊ शकतात आणि त्यानंतरच शिक्षक शिक्षणाचे उज्ज्वल भविष्य शक्य होईल.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत एक ऐतिहासिक बदल आहे. शिक्षकांना परिवर्तनाच्या केंद्रस्थानी ठेवून संपूर्ण शैक्षणिक चौकटीचे पुनरुज्जीवन करण्याचे उद्दिष्ट आहे. तरुणांच्या मनांना घडवण्यात शिक्षकांची महत्त्वाची भूमिका ओळखून, NEP २०२० दर्जेदार शिक्षक शिक्षणाची गरज यावर भर देते. या धोरणात महत्त्वपूर्ण सुधारणांची रूपरेषा दिली आहे ज्यामुळे शिक्षकांना त्यांच्या कारकिर्दीत कसे प्रशिक्षित केले जाते, पाठिंबा दिला जातो आणि विकसित केले जाते .

हा लेख NEP २०२० शिक्षक शिक्षणाची पुनर्कल्पना कशी करतो याचा शोध घेतो, त्यात प्रस्तावित केलेल्या बदलांवर आणि या सुधारणांमुळे अध्यापन व्यवसाय कसा उंचावता येतो यावर लक्ष केंद्रित करतो.

शिक्षक शिक्षणावरील NEP २०२० च्या शिफारसी: शिक्षकांना NEP २०२० च्या दृष्टिकोनाचा आधारस्तंभ म्हणून पाहिले जाते, धोरण विद्यार्थ्यांना समग्र, बहुविद्याशाखीय आणि दर्जेदार शिक्षण मिळावे याची खात्री करण्याच्या त्यांच्या भूमिकेवर खूप महत्त्व देते. शिक्षक शिक्षणाचे आधारस्तंभ: NEP २०२० हे ओळखते की कोणत्याही शैक्षणिक सुधारणांच्या यशात शिक्षकांची अपूरणीय भूमिका असते. जर शिक्षणाचा दर्जा सुधारायचा असेल, तर शिक्षकांना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत चांगली तयारी, चांगले पाठबळ आणि सतत विकसित केले पाहिजे.

## NEP २०२० नुसार शिक्षक शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे:

1.सध्याच्या शैक्षणिक गरजांशी सुसंगत राहण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सुधारणा करणे.

2. शिक्षकांना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत स्वतःला कौशल्यवान आणि पुनर्कौशल्यवान करण्यासाठी सतत शिक्षणाचे वातावरण निर्माण करणे.

3. मार्गदर्शन, व्यावसायिक नेटवर्क आणि नेतृत्व समर्थन यासारख्या पुरेशा समर्थन प्रणाली प्रदान करणे.

समग्र आणि बहुविद्याशाखीय शिक्षणात शिक्षकांची भूमिका:

NEP रोट मेमोरायझेशनपासून संकल्पनात्मक समजुतीकडे बदल करण्यास प्रोत्साहन देते. शिक्षकांनी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारावा अशी अपेक्षा आहे, विद्यार्थ्यांना टीकात्मकपणे विचार कसे करावे, समस्या सर्जनशीलपणे सोडवायच्या आणि प्रभावीपणे सहकार्य कसे करावे हे शिकवावे. शिक्षकाची भूमिका आता विषय ज्ञान देण्यापुरती मर्यादित राहणार नाही, तर विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक आणि नैतिक विकासाचे संगोपन करणे असेल. शिक्षक प्रशिक्षण आणि शिक्षणात कोणते बदल प्रस्तावित आहेत? NEP शिक्षकांना कसे प्रशिक्षित केले जाते, अधिक व्यावहारिक आणि संबंधित प्रशिक्षण मॉडेलकडे वाटचाल कशी करावी यामध्ये अनेक महत्त्वाचे बदल सादर करते.

**एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम:**

सर्वात महत्त्वाचे बदल म्हणजे ४ वर्षांच्या एकात्मिक बी.एड. कार्यक्रमाची सुरुवात. २०३० पर्यंत, शालेय शिक्षकांसाठी ही किमान पात्रता असेल. या एकात्मिक कार्यक्रमामुळे भावी शिक्षकांना विषय-विशिष्ट प्रशिक्षण आणि अध्यापनशास्त्राची सखोल समज दोन्ही मिळतील याची खात्री होते.

**उदाहरण:** विज्ञानात तज्ज्ञ असलेला शिक्षक प्रशिक्षणार्थी केवळ विषय शिकणार नाही तर चौकशी-आधारित शिक्षणासारख्या आधुनिक शिक्षण पद्धतींचा वापर करून विज्ञान प्रभावीपणे कसे शिकवायचे याचे प्रशिक्षण देखील देईल.

**प्रॅक्टिकल आणि अनुभवात्मक शिक्षण:**

धोरण सिद्धांत-जड शिक्षक प्रशिक्षणापासून दूर जात आहे, त्याऐवजी व्यावहारिक आणि अनुभवात्मक शिक्षणावर लक्ष केंद्रित करत आहे. शिक्षकांना इंटर्नशिप आणि त्यांच्या प्रशिक्षणात अंतर्भूत असलेल्या व्यावहारिक शिक्षण अनुभवांद्वारे वास्तविक वर्ग वातावरणाची ओळख करून दिली जाईल.

**उदाहरण:**

पदवीधर होण्यापूर्वी, एक विद्यार्थी शिक्षक अनुभवी शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली भागीदार शाळेत सहा महिने शिकवू शकतो, वास्तविक जीवनातील परिस्थितीत सिद्धांत लागू करू

शकतो.

**मूलभूत साक्षरता, संख्याशास्त्र आणि तंत्रज्ञान-चालित अध्यापनशास्त्रावर भर:**

इयत्ता तिसरीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र प्राप्त व्हावे यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल. शिवाय, डिजिटल वर्गखोल्या, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन मूल्यांकन यासारख्या साधनांचा वापर करून त्यांना तंत्रज्ञान-वर्धित शिक्षण पद्धतींची ओळख करून दिली जाईल.

**निरंतर व्यावसायिक विकास (CPD) आणि कौशल्य विकासाच्या संधी:** NEP २०२० सतत व्यावसायिक विकासाच्या गरजेवर भर देते. नवीन अध्यापन धोरणे, डिजिटल साधने आणि विषय ज्ञानासह अद्ययावत राहण्यासाठी शिक्षकांना CPD कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित केले जाईल. शिक्षकांसाठी सतत व्यावसायिक विकास का महत्त्वाचा आहे

याबद्दल येथे अधिक वाचा! अंतर भरून काढण्यासाठी उपाय: सिद्धांताला सरावाशी जोडणे. पारंपारिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रमुख टीकांपैकी एक म्हणजे सिद्धांत आणि सराव यांच्यातील दुवा. NEP २०२० शिक्षक शिक्षण कार्यक्रमांमध्ये व्यावहारिक अनुभव एकत्रित करून हे संबोधित करते. आधुनिक अध्यापनशास्त्र आणि विषय-विशिष्ट ज्ञान: शिक्षक शिक्षण आता शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींनी सुसज्ज करण्यावर लक्ष केंद्रित करेल, जसे की प्रकल्प-आधारित शिक्षण, मिश्रित शिक्षण (व्यक्तिगत आणि ऑनलाइन सूचना एकत्र करणे), आणि भिन्न सूचना (विविध विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार धडे तयार करणे).

**उदाहरण:** गणित शिक्षक केवळ सूत्रे कशी शिकवायची हे शिकणार नाही तर विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी वास्तविक-जगातील उदाहरणे आणि समस्या सोडवण्याच्या क्रियाकलापांचा वापर कसा करायचा हे देखील शिकेल. शिक्षक शिक्षण संस्था (टीईआय) आणि शाळांमधील संबंध मजबूत करणे: शिक्षक शिक्षण संस्था (टीईआय) विद्यार्थ्यांना वर्गात नियमित, प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी शाळांशी मजबूत भागीदारी निर्माण करतील. हे सुनिश्चित करते की नवीन शिक्षक वास्तविक-जगातील अध्यापन वातावरणातील आव्हानांना तोंड देण्यासाठी पूर्णपणे तयार आहेत.

**२०२० च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात शिक्षक शिक्षणातील आव्हाने आहेत:**

**1.अध्यापनातील बदल स्वीकारणे - शिकण्याच्या शैली:** नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात पूर्व-प्राथमिक टप्प्यापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विविध वयोगटातील मुलांशी व्यवहार करण्याच्या अनेक नवीन पद्धती सुचवल्या आहेत. शिक्षकांसाठी अशा समग्र विकासाचा अवलंब करण्यासाठी प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात अशा व्यवस्था करणे हा अडथळा ठरू शकतो कारण ते व्याख्याने देण्याच्या जुन्या पद्धती वापरत होते. म्हणून, जुन्या पद्धतींपासून आधुनिक परिस्थितीकडे होणारे हे स्थलांतर विद्यार्थी आणि शिक्षक दोघांसाठीही समस्या ठरू शकते. आपल्या देशातील विद्यार्थी अशा आकलनशील ज्ञानाला परवडत नाहीत आणि संसाधनांचा अभाव त्यांच्यावर आणि त्यांच्या पालकांवर भार टाकेल.

**2. प्रशिक्षित शिक्षक:** या बहुविद्याशाखीय संस्थांना आवश्यकतेनुसार विशिष्ट विषय प्राध्यापक आणि शिक्षक नियुक्त करावे लागतील. शिक्षक शिक्षकांना विशिष्ट वयोगटातील (इयत्ता १२ उत्तीर्ण किशोरवयीन मुले) शिकवावे लागतील. प्रवेश-स्तरीय पात्रता (पदव्युत्तर पातळी ते इयत्ता १२ वी) कमी करण्याचा विचार करणे आवश्यक आहे आणि त्यानुसार शिक्षक शिक्षकांना प्रशिक्षण दिले पाहिजे.

**3. पारंपारिक आणि सैद्धांतिक अभ्यासक्रम:** नवीन शिक्षण धोरणात शिक्षक शिक्षणात सुधारणा करण्यासाठी विविध शिफारशी करण्यात आल्या आहेत परंतु त्यामध्ये कोणताही नवीन अभ्यासक्रम विकसित करण्यात आलेला नाही. शिक्षक शिक्षणाचा सध्याचा अभ्यासक्रम पारंपारिक आहे आणि सैद्धांतिक अभ्यासक्रमात व्यावहारिक संभाव्यतेचा अभाव आहे.

**4. अभ्यासक्रमाचा कालावधी:** नवीन शिक्षण धोरणात शिक्षक शिक्षणाच्या एका वर्षाची विशेषतः टीका केली जात आहे. या एका वर्षात, शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलू कमी होतील आणि विद्यार्थ्यांना इंटर्नशिपबाबत समस्यांना तोंड द्यावे लागेल. राष्ट्रीय अभ्यासक्रम चौकट (१९९८) देखील शिक्षक शिक्षण कार्यक्रमांच्या दोन वर्षांच्या कालावधीची शिफारस करते परंतु त्यांची अंमलबजावणी करू शकली नाही. म्हणून, सध्याच्या शिक्षक शिक्षण कार्यक्रमाचा कालावधी वाढवण्याची गरज आहे.

**5. शिक्षक शिक्षण संस्थांवर नियंत्रणाचा अभाव:** एनसीटीई ही एक पर्यवेक्षी संस्था आहे जी शिक्षक शिक्षण संस्थांच्या संचालकांना पॅनेल करते आणि तेथील शिक्षणाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवते. ती या संस्थांमध्ये शिक्षणाच्या मानकांना चालू ठेवते. परंतु गेल्या काही वर्षांत शिक्षक शिक्षण संस्थांची संख्या इतकी वाढली आहे की सर्व संस्थांवर लक्ष ठेवणे कठीण झाले आहे. यापैकी काही संस्था केवळ आर्थिक फायद्यासाठी गुणवत्ता आणि मानकांशी तडजोड करत आहेत.

**6. नवोपक्रम आणि सर्जनशीलतेचा अभाव:** कोणतेही कार्य करताना सर्जनशीलता महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु आज शिक्षक शिक्षण कार्यक्रमांमध्ये ज्ञान प्रदान करताना या घटकाकडे दुर्लक्ष केले जाते. जीवन कौशल्यांचा विकासाचा अभाव: जीवन कौशल्ये ही काही कौशल्ये आहेत जी वैयक्तिक विकास आणि वाढीसाठी आवश्यक आहेत. ही कौशल्ये माणसाला जीवनातील अडचणींना तोंड देण्यास सक्षम करतात. मुख्य मुद्दा असा आहे की शिक्षक शिक्षण हे स्मृती आधारित आहे म्हणजेच विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्यांचा विकास कमी आहे, जे विद्यार्थ्यांच्या चौफेर विकासासाठी आवश्यक आहेत.

**7.गुणवत्तेचे प्रश्न:** शिक्षक शिक्षण आवश्यक मानकांपर्यंत पोहोचलेले नाही. शिक्षकांना टीकात्मक विचार करणे आणि अध्यापन पद्धती, आशय, संघटना इत्यादींशी संबंधित समस्या सोडवणे शक्य नाही.सैद्धांतिक तत्त्वांचे ज्ञान अधिक भर दिला जातो आणि शिक्षकांना वास्तविक वर्ग परिस्थितीत ही तत्त्वे लागू करणे शक्य नाही.

**8.अध्यापन पद्धतीची समस्या**: ही शिक्षक शिक्षणातील मुख्य समस्यांपैकी एक आहे. अध्यापन पद्धती पुरेशा किंवा योग्यरित्या चालविल्या जात नाहीत. विद्यार्थी शिक्षक अध्यापन पद्धतीचे काम गांभीर्याने घेत नाही. तसेच, दुसरीकडे, शाळा आणि शाळा व्यवस्थापन समस्या निर्माण करतात कारण ते अध्यापन पद्धती सत्रांना परवानगी देण्यास सहकार्य करत नाहीत आणि तयार होत नाहीत.ते अध्यापन पद्धतीची योग्य अंमलबजावणी करू देत नाहीत.

**9.योग्य सुविधांचा अभाव:** मोठ्या संख्येने शिक्षण महाविद्यालयांची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. त्यांच्याकडे प्रायोगिक शाळा, प्रयोगशाळा, ग्रंथालये, वसतिगृहे आणि योग्य आणि सुरक्षित इमारती यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. त्यापैकी काही भाड्याच्या इमारतींमध्ये देखील चालत आहेत.

**शिक्षक शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी सूचना**

सरकारने शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवले आहे. त्यांना सर्व शिक्षकांना त्यांच्या विषयांबद्दल चांगले प्रशिक्षित आणि ज्ञानी बनवायचे आहे याची खात्री करायची आहे. याचा अर्थ असा की शिक्षकांना ते शिकवत असलेल्या सामग्रीची तसेच विद्यार्थी सर्वोत्तम कसे शिकतात याची सखोल समज असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम सुधारित आणि अद्ययावत करणे आवश्यक आहे. ही एक लांब प्रक्रिया असू शकते, विशेषतः जेव्हा १९९० पासून ते अद्ययावत केलेले नाही. -शिक्षकांना ते शिकवत असलेल्या विषयांमध्ये चांगले प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. विद्यार्थी सर्वोत्तम कसे शिकतात आणि शिक्षण घडते याची खात्री करण्यासाठी कोणत्या धोरणांचा वापर करता येईल हे त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. सरकार "शिक्षक प्रशिक्षण" मॉडेलपासून शिक्षकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या मॉडेलकडे वळू इच्छित आहे आणि ते कसे डिझाइन केले आहे यासह शिक्षकांना प्रशिक्षित करण्याच्या पद्धतीत बरेच बदल करावे लागतील. अभ्यासक्रमाच्या व्यवहारासाठी नवीन आणि नाविन्यपूर्ण तंत्रे वापरली जाऊ शकतात. शिक्षक शिक्षण कार्यक्रमात अशा प्रकारे बदल केले पाहिजेत की शिक्षक नवीन तंत्रज्ञानाद्वारे लादल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या भूमिका आणि कार्यांसाठी सुसज्ज असतील.

शिक्षकांनी ताण व्यवस्थापन यंत्रणेबद्दल प्रशिक्षण दिले पाहिजे जेणेकरून ते विद्यार्थ्यांना त्यांचा ताण व्यवस्थापित करण्यास आणि सामाजिक अलगाव, पालकांचा दबाव इत्यादी काळात स्वतःला टिकवून ठेवण्यास मदत करू शकतील. शिक्षकांनी टीकात्मक विचार करण्यास, योग्य निर्णय घेण्यास आणि इतरांशी सुसंवादी संबंध राखण्यास सक्षम असले पाहिजे. अध्यापनात वापरल्या जाणाऱ्या तंत्रांमुळे स्वतः शिकण्याची सवय निर्माण झाली पाहिजे आणि शिक्षकांवर अवलंबून राहण्याची सवय कमी झाली पाहिजे. यामुळे त्यांना स्वतःवर चिंतन करण्यास आणि काहीतरी नवीन करण्यास मदत होईल.

खाजगी शिक्षक शिक्षण संस्था आणि पायाभूत सुविधा आणि अध्यापन उपकरणांच्या बाबतीत कमकुवत असलेल्या शिक्षक शैक्षणिक संस्थांच्या सुधारणेसाठी विशिष्ट कालमर्यादेची आवश्यकता आहे.

शिक्षण हे व्यक्ती आणि राष्ट्रालाही एक नवीन आकार देते. शिक्षक हा राष्ट्रनिर्माता असतो ही एक सुप्रसिद्ध म्हण आहे. भारतात शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रमांवर खूप ताण दिला जातो यात शंका नाही. दुर्दैवाने, तरीही, व्यवस्थेत अनेक त्रुटी आहेत. NEP २०२० च्या प्रकाशात, भारतीय शिक्षकांनी संधी मिळवण्याची आणि त्यांचे हेतू निर्माते बनण्याची वेळ आली आहे. त्यांना स्वप्ने पाहण्याची आणि ती साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण शिक्षण व्यवस्थेला एका नवीन स्तरावर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल आणि शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता राखण्यात अत्यंत महत्त्वाचे आहे. ते भारताच्या शिक्षण व्यवस्थेला एका उत्कृष्ट संदर्भात सादर करण्यास मदत करेल. तथापि, नवीन शिक्षण धोरणाची अंमलबजावणी किती लवकर शक्य आहे आणि ते लागू करण्यापूर्वी मागील शिक्षणातील विविध समस्या सोडवून नवीन शिक्षण धोरण कसे अंमलात आणता येईल यावर भर देणे महत्त्वाचे आहे.

•••

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि मातृभाषेचे महत्त्व




**शर्मिला प्रशांत शिंदे**
(बी. एड. प्रथम वर्ष)

**“मातृभाषा ही माणसाच्या अस्तित्वाला विचारांचा प्राणवायू पुरवत असते” - हरी नरके**

दिवंगत विचारवंत हरी नरके यांच्या या विचारातून मातृभाषा व मानवी जीवन यांचा किती खोलवर संबंध आहे हे जाणवते. मातृभाषा म्हणजे मायबोली जे मुल पहिल्यांदा आपल्या आईकडून शिकते. आता ही भाषा मुल अगदी गर्भातूनच शिकायला सुरुवात करते म्हटले तरी वावगे ठरणार नाही, कारण गर्भ संस्कारातूनच मुल व आई यांच्यात संवादाला सुरुवात होते. त्यामुळे मुलांच्या नाळेलाच मायबोली चिकटून येते. मातृभाषेचे महत्त्व सांगताना नेल्सन मंडेला म्हणतात - जर तुम्ही एखाद्या माणसाशी त्याला समजणाऱ्या भाषेत बोललात, तर ते त्याच्या डोक्यात जाते; पण जर तुम्ही त्याच्या मातृभाषेत बोललात, तर ते त्याच्या थेट हृदयाला भिडते. त्यांच्या या विचारातून मातृभाषा मानवी जीवनावर किती प्रभाव पाडू शकते याचा अंदाज येतो.

मातृभाषेचे महत्त्व व तिच्या होणाऱ्या ऱ्हासातून भावी पीढिचे होणारे नुकसान असा दूरवरचा विचार करता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (एन.ई.पी.) मध्ये किमान 8 वी पर्यंत मातृभाषेत शिक्षण दिले जावे असे धोरण मांडले. मुलांची आकलन क्षमता, विचार करण्याची गती तसेच सृजनशीलता ही मातृभाषेतून अधिक वेगवान असते हे एन.ई.पी. मध्ये अधोरेखीत करण्यात आले. त्यामुळे या धोरणात केंद्र सरकारने

एकूण ५२ भारतीय भाषांमध्ये पाठ्य पुस्तके उपलब्ध केली असून त्यात 17 आदिवासी भाषांचा समावेश देखील करण्यात आहे. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात विद्यार्थी आणायचा असेल तर त्याला आत्मविश्वास त्याची मातृभाषाच देऊ शकते. एन.ई.पी. धोरणात मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलांच्या संकल्पना स्पष्ट होतात या गोष्टीला अगदी शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनीही पुष्टी दिली आहे. त्यांच्या मते विज्ञानात अगदी क्लिष्ट वाटणाऱ्या अनेक संकल्पना मुले त्यांच्या मातृभाषेतून अधिक गतीमानतेने शिकू व आत्मसात करू शकतात. याचबरोबर शिक्षण सोपे व रंजक बनवण्यात मातृभाषा अधिक सहाय्यक ठरते हे देखील एन.ई.पी. ने अधोरेखित केले.

मुलाचा भाषेचा विकास वयाच्या दोन वर्षापर्यंत झपाट्याने होतो. या काळात मुल अनेक अर्थ संकल्पना ऐकून शिकत असते. त्याच्या आसपास बोलली जाणारी भाषा म्हणजे मातृभाषा हे त्याचे शिकण्याचे पहिले माध्यम असते. याकाळात त्याचा शिकण्याचा पाया तयार होतो. पुढे तो पाया शाळा या संस्थेतून आकार घेण्यास सुरुवात करतो. मात्र याच काळात आपण इतर भाषा मुलावर लादली तर उच्चार, संकल्पना यांच्यात मुलाचा गोंधळ उडतो तो पुन्हा आपल्या पुर्वज्ञानाशी संबंध जोडण्याचा प्रयत्न करते व येथेच गफलत होते. कारण विचार मातृ भाषेत असतात व बोलणे , शिकणे दुसऱ्या भाषेत होते. यामुळे विद्यार्थ्याचा आत्मविश्वास कमी होण्यास सुरुवात होते. आकलन कमी, आत्मविश्वास कमी यातून न्यूनगंड वाढत जातो जो विद्यार्थ्यांसाठी तणावाचे कारण ठरू शकते.

आठवी पर्यंत विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होणे गरजेचे असते ज्या आपण मातृभाषेतून अधिक सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवू शकतो. उदाहरणार्थ – उष्णता या घटकाची संवेदना आपल्या मेंदूला पोहचण्यासाठी काही सेंकदाचा कालावधी लागतो. या काही सेंकादात हालचाल झाली तर चटका बसणे ही वेदनाच जाणवत नाही ही वैज्ञानिक संकल्पना विज्ञानाचे शिक्षक मराठीतून देत असतील तर ते मुलांना घरातील त्यांच्या आईचे उदाहरण देतील की, घराघरात होणारी ज्वारीची भाकरी जेंव्हा आई करत असते तेंव्हा आई गरम तव्यावर भाकरी टाकून त्याच गरम भाकरीला पाणी लावते किंवा ती हाताने पलटते ही कृती अगदी गतीने करते यावेळी तिला कोणताही चटका बसत नाही किंवा तिला कोणती ईजा होत नाही. ग्रामीण भागात मुले अगदी कल्पनेतूनच ही संकल्पना सहज समजून घेऊ शकातात त्यासाठी कृती किंवा प्रयोगाची गरज शिक्षकाला भासत नाही.

भाषा ही मर्यादा नसून तो दुवा व माध्यम आहे जे मानवाचा संवाद, ज्ञान, भावना यांना जोडते. त्यामुळे राग, आनंद, दुखः हे मातृभाषेतूनच आजही प्रभावीपणे व्यक्त केले जाते. एन.ई.पी. मध्ये मातृभाषेद्वारे चिकित्सक विचार,आकलनशक्ती व स्पष्टता, कार्यक्षम विचार, भावनिक जोड आदी उद्दिष्टे साध्य करणे शक्य असल्याचे अनेक अभ्यास व सर्वेक्षणातून समोर आहे.

महाराष्ट्र राज्याचा विचार करायचा झाला तर मराठी ही येथील मायबोली असल्याने एन. ई. पी. ने मराठीला आपसुकच शिकण्याची प्रमाण भाषा म्हणून दर्जा दिला आहेच पण या बरोबर प्राचीन काळापासूनच आपले अस्तित्व ठळकपणे जपणाऱ्या मराठीने शिक्षण, साहित्य, कला या क्षेत्रात ही मोठे योगदान दिले आहे. संत साहित्य, महाराष्ट्राचा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर मराठी सारखे कोणतेच प्रभावी माध्यम नाही. मराठीची शब्द संपदा देखील इतर भाषांच्या तुलनेने प्रभावी आहे म्हणायला हरकत नाही कारण मराठी अनेक स्थित्यंतरातून आली आहे ज्यामध्ये तिने अनेक इतर भाषेतील शब्द आपल्या नावे करून घेतले आहेत. याचा अर्थ मराठीकडे स्वतःचा शब्दसंग्रह नाही असे मुळीच होत नाही. एकाच अर्थाचे अनेक शब्द मराठी भाषेत पहायला मिळातात. मुल या गोष्टी अगदी घरातूनच शिकते त्यामुळे स्वतंत्र शब्दसंग्रह हाताळण्याची गरज त्याला भासत नाही. शिक्षक शिकवत असताना केवळ ऐकून त्याच्या संकल्पना या स्पष्ट होण्यास सुरुवात होते. विद्यार्थी आपल्या मातृभाषेतून उत्तम रित्या व्यक्त होतात.

इंग्रजी भाषा ही केवळ इतर भाषांप्रमाणे भाषा आहे. तिचे ज्ञान म्हणजेच बुद्धीमत्ता हा भ्रम मुळात काढून टाकणे, त्या बद्दल असणारी भीती संकोच आदी एन.ई.पी. काढून टाकत हसत खेळत शिक्षण या संकल्पनेवर भर देते. द्वि किंवा त्रैभाषिक धोरण एन.ई.पी.मध्ये असले तरी मातृभाषा किंवा एक ते दोन भारतीय भाषेचा अध्ययन पद्धतीत सामावेश असणे गरजेचे आहे असे देखील अधोरेखित करण्यात आले आहे. यासाठी मुळात स्थानिक किंवा मातृभाषेतील शिक्षकांची उपलब्धता देखील एन.ई.पी. करून देणार आहे.

भविष्यातील भारतीय भाषेतील साहित्य, कला टिकवून ठेवायची असेल तर मातृभाषेचा आग्रह धरणे आवश्यक आहे. यासाठी मातृभाषेत उच्च शिक्षण, व्यावसायिक संधीची उपलब्धता करून देणे गरजेचे आहे. महात्मा गांधी हे देखील शिक्षण तज्ज्ञ होते. त्यांनी देखील इंग्रजी भाषेचा विरोध करत शिक्षण मोफत, सक्तीचे व मातृभाषेत करावे, अशी शिक्षणाची भूमिका मांडली होती. मातृभाषेतून शिक्षण केवळ अभिमान नाही तर गुणवत्तेचा हा एक प्रवास आहे. मुळात गुणवत्ता, मुल्य, संकल्पना या गोष्टींच्या आपण मुळाशी जात नाही तोवर विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास साध्य होणार नाही. पुस्तकातील मजकूर पाठांतरापेक्षा तो विद्यार्थ्यांनी उपयोजनेत आणने अपेक्षित आहे ज्याला मातृभाषा मोठा आधार ठरू शकते.

इंग्रजी भाषा विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी मिळवून देते, मात्र भाषेच्या सक्ती मधून शिक्षणाचा मूळ हेतू दूर लोटला जात आहे. त्यामुळे एन.ई.पी.मध्ये द्वी किंवा त्रैभाषिक शिक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. ज्यामध्ये इंग्रजी सोबतच प्रादेशिक किंवा मातृभाषेतून शिक्षण अशी भूमिका मांडली आहे.

●●●

# एनईपी 2020 नुसार शिक्षक शिक्षणातील बदल




**हर्षा थारवानी**
बीएड प्रथम वर्ष

२१व्या शतकाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणारे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' (एनईपी 2020) हे एक पथदर्शक पाऊल ठरले आहे. कोणत्याही शिक्षण पद्धतीचा कणा हा 'शिक्षक' असतो. त्यामुळे, जर आपल्याला जागतिक दर्जाचे विद्यार्थी घडवायचे असतील, तर आधी शिक्षकांना आधुनिक, तंत्रस्नेही आणि मूल्यनिष्ठ बनवणे अनिवार्य आहे. दशकानुशतके चालत आलेल्या जुन्या चौकटी मोडून, शिक्षकांना केवळ 'माहिती देणारे' न ठेवता त्यांना 'ज्ञानरचनावादी मार्गदर्शक' बनवण्याच्या उद्देशाने या धोरणात शिक्षक शिक्षणाचे संपूर्ण स्वरूपच बदलून टाकले आहे. ५+३+३+४ या नवीन शैक्षणिक रचनेपासून ते ४ वर्षांच्या एकात्मिक बीएड प्रोग्रामपर्यंत आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापरापासून ते भारतीय ज्ञान प्रणालीच्या (आयकेएस) जोपासनेपर्यंत, शिक्षक आता एका नवीन आणि सक्षम रूपात आपल्यासमोर येणार आहे. या लेखाच्या माध्यमातून आपण राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे शिक्षक प्रशिक्षण, त्यांची स्वायत्तता आणि व्यावसायिक विकासात होणाऱ्या क्रांतिकारी बदलांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

**शैक्षणिक संरचनेत बदल: ५+३+३+४ मॉडेल**

एनईपी २०२० ने जुन्या १०+२ साच्याऐवजी एक नवीन श्रेणीवार शैक्षणिक रचना आणली आहे, ज्याचा थेट परिणाम शिक्षकांच्या

अध्यापन पद्धतीवर होणार आहे:

**फाउंडेशनल स्टेज (५ वर्षे):**
३ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी (अंगणवाडी/बालवाडी ते दुसरी). येथे खेळावर आधारित शिक्षणावर भर असेल.

**प्रिपरेटरी स्टेज (३ वर्षे):**
८ ते ११ वर्षे वयोगटातील मुलांसाठी (तिसरी ते पाचवी). येथे शोध आणि परस्पर संवादातून शिक्षणाचे महत्त्व आहे.

**मिडल स्टेज (३ वर्षे):**
११ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी (सहावी ते आठवी). येथे विषयनिहाय अमूर्त संकल्पनांची ओळख करून दिली जाईल.

**सेकंडरी स्टेज (४ वर्षे):**
१४ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी (नववी ते बारावी). येथे बहुविद्याशाखीय अभ्यास आणि सखोल विचारांना प्राधान्य दिले जाईल.

**शिक्षक प्रशिक्षणाचे नवीन स्वरूप**
शिक्षकांना केवळ पदवी देणे पुरेसे नाही, तर त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज करणे आवश्यक आहे.

**४ वर्षांचा एकात्मिक बीएड (Integrated B.Ed.) प्रोग्राम:**
शिक्षक बनू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२ वी नंतर थेट चार वर्षांचा एकात्मिक बीएड कोर्स सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अध्यापनात खऱ्या अर्थाने रस असलेले तरुण या क्षेत्राकडे वळतील.

**डिजिटल आणि AI प्रशिक्षण:**
बदलत्या काळानुसार शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डिजिटल टूल्स आणि आधुनिक सॉफ्टवेअर वापरण्याचे विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. भारत सरकारने या संदर्भात अनेक क्षमता विकास कार्यक्रम आयोजित केले आहेत.

**व्यावसायिक विकास आणि सतत शिक्षण**
शिक्षक होणे ही केवळ एक पदवी नसून ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षकांना त्यांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी आणि नवीन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सतत शिक्षण संकल्पनेतून प्रोत्साहित केले जाणार आहे. शिक्षकांच्या कार्यक्षमतेचे केवळ अनुभवावर आधारित नव्हे, तर त्यांच्या प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेवर आधारित नियमित मूल्यांकन केले जाईल. यामुळे पारदर्शकता वाढून शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल, असा विश्वास आहे.

**स्वायत्तता आणि निर्णय प्रक्रिया**
नईपी 2020 शिक्षकांना वर्गात अधिक स्वायत्तता प्रदान करते. शिक्षक आता केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारे घटक नसून, ते अभ्यासक्रमाच्या रचनेत आणि अध्यापन पद्धती निवडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढल्यामुळे वर्गातील वातावरणात सकारात्मक बदल घडून येईल.

**बहु-विषयक संस्थांची पुनर्रचना**
शिक्षक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची (उदा. प्रादेशिक शिक्षण संस्था) पुनर्रचना करण्यात येणार आहे. या संस्थांना आता केवळ बीएडचे शिक्षण देणाऱ्या संस्था न ठेवता, त्यांना 'बहु-विषयक उच्च शैक्षणिक संस्था' (Multidisciplinary Institutions) बनवले जाईल, जेणेकरून शिक्षकांना कलेपासून विज्ञानापर्यंत सर्व विषयांचे सर्वांगीण ज्ञान मिळेल.

**नैतिकता, मूल्ये आणि भारतीय ज्ञान प्रणाली (आयकेएस)**
केवळ तंत्रज्ञान महत्त्वाचे नाही, तर शिक्षकांमध्ये नैतिकता आणि सामाजिक मूल्यांची जाणीव असणे आवश्यक आहे. शिक्षकांना समाजसेवा आणि नैतिक जबाबदारीबाबत जागरूक केले जात आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये कोलकाता येथील लोरेटो कॉलेजने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेमिनारमध्ये 'भारतीय ज्ञान प्रणाली'वर विशेष भर देण्यात आला.

यावरून स्पष्ट होते की, आधुनिक शिक्षणासोबतच भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे हे देखील शिक्षकांचे कर्तव्य असेल. शिक्षकांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणि केवळ गुणवत्तेवर आधारित भरती करण्यावर या धोरणात जोर देण्यात आला आहे. यामुळे सक्षम आणि पात्र शिक्षकच शिक्षण व्यवस्थेत येतील याची खात्री मिळेल.

थोडक्यात सांगायचे तर, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे केवळ कागदोपत्री बदल नसून ती भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाची एक दूरगामी मोहीम आहे. शिक्षकांना केवळ माहिती देणारे माध्यम न ठेवता, त्यांना 'ज्ञानरचनावादी' आणि 'तंत्रस्नेही' मार्गदर्शक बनवणे, हा या धोरणाचा मुख्य गाभा आहे. ४ वर्षांचा एकात्मिक बीएड प्रोग्राम, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (CPD), आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या (AI) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे शिक्षकांचा दर्जा जागतिक स्तरावर उंचावण्यास मदत होईल. त्याचबरोबर, भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) आणि नैतिक मूल्यांची जोड दिल्यामुळे शिक्षकांमध्ये केवळ कौशल्येच नव्हे, तर संवेदनशीलता आणि राष्ट्रनिष्ठा देखील वृद्धिंगत होईल.

जेव्हा शिक्षक स्वतः स्वायत्त, प्रशिक्षित आणि मूल्यनिष्ठ असतो, तेव्हाच तो विद्यार्थ्यांमध्ये चौकस बुद्धी आणि चारित्र्य घडवू शकतो. त्यामुळे, NEP 2020 अंतर्गत होणारे हे बदल आगामी काळात भारताला पुन्हा एकदा 'विश्वगुरू' बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक खंबीर पाऊल ठरेल, यात शंका नाही.

●●●

# मराठी भाषेचा शालेय जीवनावर होणार प्रभाव

**रोहित सुनिल नरवाडे**
बी. एड. द्वितीय वर्ष विद्यार्थी

जागतिकीकरणाच्या युगात ज्ञान, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या संधी यांचा ओघ मोठ्या प्रमाणात इंग्रजी भाषेकडे वळलेला दिसतो. त्यामुळे इंग्रजी ही जागतिक संपर्कभाषा म्हणून स्वीकारली गेली असली, तरी स्थानिक भाषांच्या अस्तित्वावर त्याचा परिणाम होत असल्याचेही जाणवते. मराठीसारख्या समृद्ध भाषेकडे तितक्याच गांभीर्याने पाहिले जात नाही, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. जेव्हा इंग्रजी भाषेची व्यापकता शालेय अभ्यासक्रमात आणि अध्यापनपद्धतीत प्रमुख स्थान मिळवते, तेव्हा मराठी विषयाची स्थिती दुय्यम ठरत असल्याची खंत व्यक्त होते. मात्र, याचा अर्थ मराठी भाषेचे महत्त्व कमी झाले आहे, असा अजिबात नाही. उलट मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा आत्मा आहे.

मराठी ही फक्त महाराष्ट्र राज्याची संभाषण भाषा नसून ती एक समृद्ध संस्कृतीचे रूप आहे. या भाषेत बहिणाबाईंच्या ओव्या आहेत, लोकजीवनातील साधेपणाचा सुगंध आहे, मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास आहे आणि मराठी साहित्याचा मधुर गोडवा आहे. संतपरंपरेतून आलेले अध्यात्म, लोकसाहित्यातील जीवनज्ञान, तसेच आधुनिक साहित्यिकांच्या लेखणीतून व्यक्त झालेले सामाजिक भान – या सर्वांचा संगम मराठीत दिसतो. त्यामुळे मराठी विषयाचा प्रभाव हा केवळ मराठी शिक्षक, विद्यार्थी किंवा साहित्यिकांपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण समाजाच्या जीवनमूल्यांवर परिणाम करणारा ठरतो.

शालेय जीवनात मराठी विषय विद्यार्थ्यांच्या शिकण्याला सहजता प्रदान करतो. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास संकल्पना अधिक स्पष्टपणे समजतात, विचारशक्ती विकसित होते आणि आत्मविश्वास वाढतो. मराठी माध्यमातून अध्ययन केल्यास विद्यार्थी ज्ञान आत्मसात करताना कमी दडपण अनुभवतो. त्यामुळे मराठी ही शालेय जीवनात प्रभावी शस्त्राप्रमाणे कार्य करते. या 'मराठी रूपी शस्त्राचा' योग्य वापर केल्यास विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धा व आव्हाने समर्थपणे पेलू शकतो. व्यक्ती आपल्या आयुष्यात अनेक गोष्टी विसरू शकते, परंतु मातृत्वाचा स्पर्श कधीच विसरत नाही. मराठी भाषा ही त्या मातृत्वाच्या गंधाने नटलेली आहे. आई जशी मुलाला पहिली ओळख, पहिले शब्द आणि पहिले संस्कार देते, तसेच मातृभाषा मुलांच्या बौद्धिक व भावनिक विकासाचा पाया मजबूत करते. मातृभाषेतून मिळालेले शिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला संवेदनशीलता, सहानुभूती आणि मूल्यांची जाण देते.

प्रत्येक संस्कृती आपल्या विशिष्ट मूल्यांची जपणूक भाषेच्या माध्यमातून करत असते. जपानी भाषेतील 'ओमोतेनाशी' ही संकल्पना अतिथ्यशीलता आणि आदर व्यक्त करते. त्याचप्रमाणे मराठी भाषेत कर्तव्य, आदर, सामूहिकता, सहकार्य आणि परोपकार यांसारखी मूल्ये खोलवर रुजलेली आहेत. मराठीतील साहित्य विद्यार्थ्यांच्या मनात ही मूल्ये रुजवण्याचे कार्य करते. एखाद्या भाषेचे मूल्यमापन करताना तिचे साहित्य किती समृद्ध आहे, हे पाहिले जाते. या दृष्टीने मराठी साहित्य अत्यंत प्रगल्भ आहे. यात संतसाहित्य, लोकसाहित्य, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील शौर्यगाथा आणि विनायक दामोदर सावरकर यांच्या कवितांमधील स्वातंत्र्याचा ज्वलंत संदेश आढळतो. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाच्या कथा विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, धैर्य आणि राष्ट्राभिमान जागृत करतात. इतकी समृद्ध साहित्यपरंपरा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला आणि नेतृत्वक्षमतेला चालना देते.

मराठीचा शालेय जीवनातील वापर वाढवण्यासाठी काही ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. प्रथम, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणात मराठीचा वापर वाढवला पाहिजे. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय व व्यवस्थापन या क्षेत्रांतील दर्जेदार साहित्य मराठीत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यासाठी सक्षम भाषांतर, नवीन तांत्रिक शब्दनिर्मिती आणि संशोधनपर लेखनाची गरज आहे. दुसरे म्हणजे, मराठी भाषेचा व्यवहारिक, वाणिज्य आणि आर्थिक क्षेत्रात वापर वाढवणे आवश्यक आहे. बँकिंग, उद्योग, शासनव्यवहार आणि डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा प्रभावी वापर झाला तर भाषेचा आत्मविश्वास वाढेल. शाळांमध्ये वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी मराठी पुस्तकांचे वाचन, कथा-कविता स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि नाट्यप्रयोग यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. डिजिटल युगात मराठी संकेतस्थळे, शैक्षणिक ॲप्स आणि ई-पुस्तके तयार करून विद्यार्थ्यांना आधुनिक साधनांच्या माध्यमातून मराठीशी जोडता येईल. पालक आणि शिक्षक यांनीही दैनंदिन संवादात मराठीचा अभिमानाने वापर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे मराठी भाषेला दुय्यम दर्जा न देता तिचा शालेय जीवनात प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे. मराठी ही केवळ भाषा नाही, तर ती संस्कारांची, संस्कृतीची आणि स्वाभिमानाची वाहक आहे. ती भवानी तलवारीप्रमाणे सामर्थ्यवान आहे, जी विद्यार्थ्यांच्या ज्ञानसाम्राज्याची उभारणी करण्यास साहाय्यभूत ठरू शकते. मराठीचा सन्मान आणि संवर्धन हेच उज्ज्वल भवितव्याचे खरे पाऊल ठरेल.

●●●

# विभाग-3
# साहित्यिक विभाग

# प्रेरणादायी शिक्षक व्यक्तिमत्व साने गुरुजी

**नीलम अडागळे**
(बी. एड. प्रथम वर्ष)



पांडुरंग सदाशिव साने, ज्यांना आपण सर्व 'साने गुरुजी' या नावाने ओळखतो, हे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व, थोर स्वातंत्र्यसेनानी, संवेनशील लेखक आणि आदर्श शिक्षक होते. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड येथे झाला. "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे" हा संदेश देणाऱ्या गुरुजींनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवा आणि विद्यार्थी घडवण्यासाठी अर्पण केले.

## १. साने गुरुजींचे शिक्षण (खडतर प्रवास)

साने गुरुजींचा शैक्षणिक प्रवास अत्यंत गरिबीत आणि संघर्षात पार पडला: प्राथमिक व माध्यमिक शिक्षण: त्यांचे प्राथमिक शिक्षण पालगड येथे झाले. पुढील शिक्षणासाठी ते दापोली, औंध आणि पुणे येथे गेले. घरची परिस्थिती बेताची असल्याने अनेकदा त्यांना अर्धपोटी राहून शिक्षण पूर्ण करावे लागले. उच्च शिक्षण: त्यांनी पुण्यातील न्यू पूना कॉलेजमधून (S.P. College) बी.ए. (B.A.) पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी तत्वज्ञान (Philosophy) विषयात एम.ए. (M.A.) ची पदवी संपादन केली.

## आदर्श शिक्षक म्हणून कार्य (अमळनेर येथील काळ)

अमळनेर हे गाव साने गुरुजी यांची 'कर्मभूमी' म्हणून ओळखले जाते. हे महान साहित्यिक, शिक्षक आणि समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ अमळनेर येथे घालवला. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील प्रताप हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणून (१९२४ ते १९३०) हे सहा वर्ष कार्य केले. तेथे त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ विषय ज्ञान न देता नैतिक मूल्ये, देशभक्ती आणि मानवतेचे धडे दिले. विद्यार्थ्यांशी त्यांचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. ते विद्यार्थ्यांना आपल्या मुलांसारखे प्रेम देत. अमळनेरमध्ये साने गुरुजींच्या स्मरणार्थ "साने गुरुजी वाचनालय" स्थापन करण्यात आले आहे.


## वाचनालयाची वैशिष्ट्ये:

साने गुरुजींच्या साहित्याचा समृद्ध संग्रह त्या वाचनालयात आहे. बालसाहित्य, चरित्रग्रंथ, समाजसुधारक साहित्य विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुविधा विविध वाचनप्रेरणा कार्यक्रम व व्याख्याने सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन हे वाचनालय केवळ पुस्तके वाचण्याचे ठिकाण नसून, ते साने गुरुजींच्या विचारांचे आणि मूल्यांचे जतन करणारे प्रेरणास्थान आहे.

## ऐतिहासिक महत्त्व

**अमळनेर हे गाव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक नकाशावर विशेष स्थान मिळवते कारण:** येथे साने गुरुजींनी राष्ट्रसेवा आणि शिक्षणसेवेचा पाया रचला.त्यांच्या विचारांनी अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडवले. आजही त्यांच्या स्मृती जपणारी ठिकाणे प्रेरणादायी ठरतात.

**विद्यार्थीप्रिय शिक्षक:** ते केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावून त्यांच्या अडीअडचणी सोडवत. त्यांनी शिक्षण हे जीवनाशी जोडलेले असावे हा विचार प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. वर्गात कथा, उदाहरणे, गाणी, आणि प्रेरणादायी प्रसंग यांचा उपयोग करून ते अध्यापन करत. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जाणीव निर्माण केली. वसतिगृहातील मुलांचे कपडे शिवणे, त्यांना अंघोळ घालणे, त्यांची घाण स्वतः साफ करणे यातून त्यांनी 'श्रमाची प्रतिष्ठा' शिकवली. साने गुरुजी एक संवेदनशील शिक्षक होते एखादी भावना, कथा, देशभक्ती, गरिबी, दुःख व विशेषता आई विषयी बोलताना त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत असे. यावरून साने गुरुजींच्या संवेदनशील मनाची कल्पना आपल्याला करता येते, तसेच आताच्या




शिक्षणातील भावनिकता कमी झाली आहे त्यासाठी आपण साने गुरुजींcha आदर्श ठेवून पुन्हा ती शिक्षणात आणायला हवी. शिक्षणात पुन्हा संवेदनशीलता, सहानुभूती आणि मूल्यांचा प्रकाश आणला, तरच खऱ्या अर्थाने समाज घडवणारे विद्यार्थी तयार होतील. साने गुरुजींच्या आदर्शातून आपण ही भावनिकता पुन्हा शिक्षणात रुजवू शकतो, आणि तेव्हाच शिक्षण खऱ्या अर्थाने “मनाला स्पर्श करणारे” ठरेल. **संस्कारांची शिदोरी:** रात्री मुलांना गोष्टी सांगणे, त्यांच्याकडून प्रार्थना करून घेणे आणि त्यांच्यात देशभक्तीची बीजे रोवणे हे त्यांचे मुख्य कार्य होते.

## साने गुरुजींचे साहित्य आणि 'श्यामची आई'

साने गुरुजींनी ७० हून अधिक पुस्तके लिहिली. त्यांचे साहित्य हे समाजाला आणि लहान मुलांना दिशा देणारे आहे. श्यामची आई: हे त्यांचे सर्वात लोकप्रिय पुस्तक. आईने मुलावर केलेले संस्कार आणि त्यातून घडलेला 'श्याम' त्यांनी या पुस्तकात मांडला आहे. त्यांच्या साहित्यकृतींमधूनही शिक्षकाचे आदर्श व्यक्तिमत्त्व दिसते. विशेषतः श्यामची आई या पुस्तकातून त्यांनी संस्कारमूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या कथा आणि लेखनातून विद्यार्थ्यांना नैतिकतेचा व प्रेमाचा संदेश मिळाला. इतर साहित्य: 'धडपडणारी मुले', 'गोष्टीरूप इतिहास', 'भारतीय संस्कृती' आणि 'साधना' साप्ताहिक ही त्यांची महत्त्वाची देणगी आहे.

## सामाजिक सुधारणा आणि सत्याग्रह

साने गुरुजी केवळ शिक्षक नव्हते, तर ते प्रखर समाजसुधारकही होते. पंढरपूर मंदिर सत्याग्रह (१९४७): दलितांना विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी त्यांनी ११ दिवस आमरण उपोषण केले. त्यांच्या या त्यागामुळे मंदिराची दारे सर्वांसाठी खुली झाली. आंतरभारती: भारतामधील विविध भाषा आणि प्रांतांमधील भिंती पाडून 'एकता' निर्माण करण्यासाठी त्यांनी 'आंतरभारती' ही संकल्पना मांडली.

## साने गुरुजींचे जीवनमंत्र

गुरुजींनी आयुष्यभर काही तत्त्वांचे पालन केले: प्रेम: द्वेषापेक्षा प्रेमाने जग जिंकता येते, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

अहिंसा:
**गांधीवादी विचारांचे पालन करत त्यांनी शांततेच्या मार्गाने लढे दिले.**
सेवा:
**"दुबळ्यांचा कैवारी" होऊन त्यांनी दिन-दलितांची सेवा केली.**

साने गुरुजी म्हणजे माणुसकीचा जिवंत झरा होते. ११ जून १९५० रोजी त्यांचे निधन झाले, तरी त्यांचे विचार आजही करोडो भारतीयांना प्रेरणा देतात. आजच्या शिक्षकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी साने गुरुजींचे जीवन हे एक उत्तम दिशादर्शक दीपस्तंभ आहे.

•••

# रीत जीवनाची


**सुवर्णा वीर**
बी. एड प्रथम वर्ष

जीवन जगत असताना
प्रत्येक व्यक्तीला खेळावाच लागतो खेळ,
परंतु माहीत नसतो तो
खेळायचा आहे किती वेळ ||१||

संकटाची वेळ असते कोण
आपला हे पाहण्याची,
नाहीतर लोकांना सवयच असते
श्रीमंतांकडे धावण्याची ||२||

प्रतिज्ञेत मात्र सर्वच म्हणतात
आम्ही भारतीय बांधव,
मात्र प्रत्येकाच्या घरात असतो
कौरव आणि पांडव ||३||

सरड्यानेही बदलली नसतील
एवढी रूपे माणूस बदलतो आहे,
सरडा देखील माणसांकडून
रंग बदलण्याची शिकतो आहे ||४|




# भविष्यवेध घेणारी शिक्षिका

**कल्याणी शिंदे**
बी. एड प्रथम वर्ष

**प्रस्तावना:** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त स्नेहवर्धक मंडळ अँड एज्युकेशनल ट्रस्ट बी.एड. महाविद्यालया च्या मासिकासाठी सौ. सीमा राजेंद्र शिंदे (मॅडम) यांची मुलाखत घेण्यात आली. जांबे गावच्या या अभ्यासू व कर्तृत्ववान व्यक्तिमत्व असलेल्या शिक्षिका यांचे शिक्षण (डी.एड., बी.एड., एम.ए. व एम.एड.) पदव्या संपादन करून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची सतत नवनवीन उपक्रम राबविण्याची धडपड असते.त्या म्हणतात कि

विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देणे हेच त्यांचे ध्येय आहे. त्यांच्या कार्या ची दखल घेऊन त्यांना 'आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

२०१४ मुळशी तालुकास्तर गुणवंत शिक्षक पुरस्कार पंचायत समिती मुळशी२०१६ सरपंच महापरिषद आदर्श शिक्षक पुरस्कार २०१८ जिल्हाधिकारी सौरभ राव यांच्यावतीने उत्कृष्ट मतदान अधिकारी पुरस्कार २०२५ मुळशी भूषण पुरस्कार २०२५ सक्सेस अबॅकस अँड एज्युकेशन इंडियाच्या वतीने उपक्रमशील शिक्षिका पुरस्कारदेखील बहाल करण्यात आला आहे. त्यांना मिळालेले विविध पुरस्कार त्यांच्या कार्याची महती स्पष्टपणे दर्शवितात. जांबेगाव परिसरातील शैक्षणिक प्रगतीत त्यांचा मोलाचा वाटा असून मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी त्या सदैव कार्यरत असतात. अशा या बहुआयामी व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देताना आनंद व अभिमान वाटतो. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त त्यांचे कार्य सर्वांसमोर यावे या उद्देशाने त्यांच्याशी साधलेला संवाद पुढीलप्रमाणे आहे.

**प्रश्न १:** शिंदे मॅडम, कृपया आपल्या जीवनप्रवास व शैक्षणिक कार्याचा थोडक्यात परिचय करून द्याल का?

**उत्तर:** नमस्कार, मी सीमा राजेंद्र शिंदे. माझे बालपण व शालेय शिक्षण मुंबईत झाले. लग्नानंतर संसाराची जबाबदारी सांभाळत मी माझ्या शिक्षणाचा पुढील प्रवास सुरू ठेवला. चिंचवड येथील आबासाहेब चिंचवडे न्यू इंग्लिश स्कूलमधून ११ वी व १२ वी पर्यंत चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या भास्करराव कर्वे अध्यापक विद्यालयातून डी.एड.संपादन केले. त्यानंतर बी.ए., एम.ए., बी.एड.व एम.एड.पर्यंतचे उच्च शिक्षण जिद्दीने पूर्ण केले. आज मी जांबेगाव येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. माझ्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन मला 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संसार आणि शिक्षण यांचा समतोल साधत केलेली ही वाटचाल माझ्यासाठी अभिमानाची आहे.

**प्रश्न २:** आपण शिक्षण क्षेत्रात येण्यामागील प्रेरणा काय होती?
**उत्तर:** शिक्षण क्षेत्रात येण्याची प्रेरणा मला माझ्या शालेय जीवनातूनच मिळाली. लहानपणापासूनच विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग, नेतृत्वगुण (Leadership) आणि मित्र-मैत्रिणींना अवघड विषय सोप्या भाषेत समजावून सांगण्याची आवड यामुळे शिक्षक होण्याची इच्छा निर्माण झाली. माझ्या शिक्षकांनीही माझ्यातील शिक्षिका ओळखून मला प्रोत्साहन दिले. लग्नानंतर माझे पती श्री. राजेंद्र शिंदे यांनी संसाराच्या जबाबदाऱ्यांसोबत शिक्षण पूर्ण करण्यासाठी खंबीर पाठिंबा दिला. त्यांच्या सहकार्यामुळे मी अकरावी-बारावीपासून एम.ए., बी.एड.पर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकले. शिक्षकांनी दिलेली प्रेरणा आणि पतींची साथ यामुळेच मी आज 'आदर्श शिक्षक' पुरस्कारापर्यंतचा प्रवास पूर्ण करू शकले.

**प्रश्न ३:** आपल्या जीवनप्रवासात व शिक्षणकार्यामध्ये आपले प्रेरणास्थान कोण आहे?

**उत्तर**: माझ्या जीवनात प्रेरणास्थानांचे दोन महत्त्वाचे टप्पे आहेत. शालेय जीवनात म्हात्रे मॅडम आणि राऊत गुरुजी यांच्या शिकवणीमुळे माझ्या मनात शिक्षकी पेशाबद्दल आदर निर्माण झाला, ते माझे पहिले आदर्श आहेत. मात्र, माझ्या आयुष्याला खऱ्या अर्थाने दिशा देणारे प्रेरणास्थान म्हणजे माझे पती श्री.राजेंद्र शिंदे लग्नानंतर त्यांनी माझ्या शिक्षणाची ओढ ओळखून मला सातत्याने प्रोत्साहन व खंबीर पाठिंबा दिला. संसार आणि शिक्षण यांचा समतोल साधताना ते माझा आधारस्तंभ ठरले. त्यांच्या विश्वासामुळेच मी आज एक यशस्वी शिक्षिका म्हणून कार्य करत आहे.

**प्रश्न ४:** भिन्न क्षमतांचे विद्यार्थी शिकवताना कोणत्या अडचणींना व आव्हानांना सामोरे जावे लागते?
**उत्तर:** माझ्या वर्गातील विविध शिकण्याच्या शैली असलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून मी त्रिसूत्री अध्यापन पद्धतीचा अवलंब करते. प्रथम विषयाशी संबंधित व्हिडिओ दाखवून मुलांना दृश्य आकलन करून देते, त्यानंतर सविस्तर स्पष्टीकरणाद्वारे संकल्पना स्पष्ट करते. मात्र, खरी शिकण्याची प्रक्रिया कृतीतून घडते, या विश्वासाने मी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देते उदा. झाडांविषयीच्या पाठासाठी प्रत्यक्ष निरीक्षण, व्याकरणासाठी शब्दखेळ, इतिहासासाठी नाट्यरूपांतर आणि विज्ञानासाठी प्रयोग. अशा कृतीयुक्त शिक्षणामुळे प्रत्येक विद्यार्थी सक्रिय सहभागी होतो. परिणामी विषयाची भीती कमी होऊन निकालातही लक्षणीय प्रगती दिसून येते.

**प्रश्न ५:** आधुनिक आणि पारंपारिक अध्यापन पद्धतींबाबत आपले मत काय आहे?
**उत्तर:** शिक्षण क्षेत्रातील बदल लक्षात घेऊन मी 'जुनं ते सोनं आणि नवं ते हवं' हा सुवर्णमध्य स्वीकारते. माझ्या मते पारंपारिक आणि आधुनिक या दोन्ही अध्यापन पद्धती एकमेकींना पूरक आहेत. पारंपारिक पद्धतीतून शिस्त, संस्कार आणि गुरु-शिष्य नात्यातील आदर जोपासला जातो, तर आधुनिक तंत्रज्ञानामुळे कठीण संकल्पना अधिक सोप्या आणि प्रभावीपणे समजतात. उदाहरणार्थ, ऐतिहासिक धडा शिकवताना मी गोष्टीरूपाने मूल्ये सांगते आणि त्याचवेळी प्रोजेक्टरद्वारे दृश्य माध्यमांचा वापर करते. अशा प्रकारे दोन्ही पद्धतींच्या संगमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो, असे माझे मत आहे.

**प्रश्न ६:** शिक्षक म्हणून कार्य करताना कोणता प्रसंग आपल्यासाठी विशेष आणि अविस्मरणीय ठरला?

**उत्तर:** माझ्या अध्यापन कार्यात सर्वात विस्मरणीय

क्षण म्हणजे माझ्या विद्यार्थ्यांचे यशस्वी आयुष्य पाहण्याचा आनंद. आज माझे काही विद्यार्थी खाकी वर्दीत पोलीस म्हणून देशसेवा करताना दिसतात, तर काहींनी स्वतःचे व्यवसाय (Business) सुरू करून समाजात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. काही विद्यार्थी प्रशासकीय क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत, हे पाहून माझा ऊर अभिमानाने भरून येतो. विशेष म्हणजे, हे विद्यार्थी आवर्जून भेटायला येतात आणि वर्गात घेतलेल्या कृती, दिलेले मार्गदर्शन व प्रोत्साहन यामुळेच त्यांना दिशा मिळाली, असे सांगतात. त्या क्षणी शिक्षक म्हणून मिळणारे समाधान कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे असते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख आणि त्यांच्या डोळ्यातील कृतज्ञता हाच माझ्या शिक्षकी जीवनातील सर्वात मोठा आणि अविस्मरणीय ठेवा आहे.

**प्रश्न ७ :** तुमचे आवडते मराठी साहित्यिक कोण आहेत? त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये काय आहेत, आणि ते तुम्हाला का आवडतात ?

**उत्तर:** साहित्याच्या बाबतीत पु. ल. देशपांडे आणि व. पु. काळे हे माझे अत्यंत आवडते साहित्यिक आहेत. माझा स्वभाव विनोदी आणि आनंदी असल्याने पु.ल.देशपांडे च्या साहित्यातील निखळ विनोद व जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मला नेहमी प्रेरणा देतो. त्यांच्या लेखनातून माणसांमधील विसंगतीवर केलेले मार्मिक भाष्य मन प्रसन्न करते. व.पु. काळे यांच्या लेखनातील साधेपणा आणि भावस्पर्शी विचार मला अंतर्मुख करतात. 'माणसं जोडणं' ही त्यांची कला मला विशेष भावते. शिक्षक म्हणून कार्य करताना पु.ल. देशपांडे चा विनोद वर्गात चैतन्य निर्माण करतो, तर व. पु. काळे यांचे विचार विद्यार्थ्यांशी भावनिक नाते दृढ करण्यास मदत करतात.

**प्रश्न ८ :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कोणते उपक्रम राबवता किंवा कोणत्या अध्यापन पद्धतींचा अवलंब करता ?

**उत्तर:** विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक नव्हे, तर सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे आहे, असे मी मानते. म्हणूनच अध्यापन करताना मी पुस्तकी ज्ञानासोबत नैतिक मूल्यांची जाणीवपूर्वक पेरणी करते. 'मैत्री' सारखा विषय शिकवताना मी कृष्ण आणि सुदामा यांच्या मैत्रीचे उदाहरण देऊन निस्वार्थ प्रेम व विश्वासाची शिकवण देते. पौराणिक व ऐतिहासिक कथांमधून मुलांना नाती जपण्याचे आणि मूल्यांशी तडजोड न करण्याचे धडे मिळतात. कृतियुक्त शिक्षणासोबत संस्कारांना सर्वोच्च स्थान देत मी प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करते. जेव्हा विद्यार्थी एकमेकांना मदत करतात व माणुसकी जपतात, तेव्हाच मला त्यांच्या खऱ्या सर्वांगीण विकासाची जाणीव होते.

**प्रश्न ९ :** आजचा भावी शिक्षक कसा असावा आणि त्याच्यामध्ये कोणती कौशल्ये आवश्यक आहेत? तसेच, अशा शिक्षकांसाठी आपण काय संदेश द्याल ?

**उत्तर:** आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या काळात शिक्षकांकडे केवळ पदव्या नव्हे, तर बदल स्वीकारण्याची वृत्ती असणे अत्यावश्यक आहे. माझ्या मते भावी शिक्षक डिजिटल साक्षर असावा; तंत्रज्ञानाचा वापर करतानाच संस्कृती व साहित्याची नाळ जपावी. त्याचबरोबर भावनिक बुद्धिमत्ता आवश्यक आहे, कारण प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची पद्धत वेगळी असते. शिक्षकाने आयुष्यभर विद्यार्थी वृत्ती जपून सातत्याने नवे ज्ञान आत्मसात केले पाहिजे. नवीन शिक्षकांना माझा संदेश असा की, हे क्षेत्र केवळ नोकरी म्हणून नव्हे तर पिढी घडवण्याचे पवित्र कार्य म्हणून स्वीकारा. विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत नैतिक मूल्ये व माणुसकीची शिकवण द्या आणि जबाबदारीने, आनंदाने आपली भूमिका पार पाडा.

**प्रश्न १० :** मुलांच्या शैक्षणिक प्रगतीतील अडचणींबद्दल पालकांशी चर्चा करताना आपण कोणती पद्धत अवलंबता ?

**उत्तर :** पालकांशी संवाद साधताना माझा मंत्र असतो- मुलाच्या दोषांपेक्षा त्याच्या सुप्त गुणांवर आधी प्रकाश टाकणे. विद्यार्थ्याच्या उणिवा थेट सांगण्याऐवजी मी त्या 'सुधारणेची संधी' म्हणून मांडते, ज्यामुळे पालक निराश न होता सकारात्मक दृष्टी ठेवतात. मुलाची शिकण्याची पद्धत ओळखून, त्याच्या ताकदीच्या बाजू अधोरेखित करत सुधारण्याचे मार्ग सुचवते. मी कृष्ण–सुदामा यांच्या विश्वासपूर्ण मैत्रीचे उदाहरण देऊन पालकांना मुलावर विश्वास ठेवण्याचा संदेश देते. 'तू करू शकतोस' हा सकारात्मक दृष्टिकोन मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण करतो. पालक आणि शिक्षक एकत्र येऊन पाठिंबा दिल्यास मुलाचा सर्वांगीण विकास नक्की साध्य होतो.

आभार: आजचा हा संवाद केवळ मुलाखत नसून शिक्षण आणि संस्कारांचा प्रेरणादायी प्रवास ठरला. सौ. सीमा राजेंद्र शिंदे (मॅडम) आपण मांडलेला 'जुनं ते सोनं आणि नवं ते हवं' हा सुवर्णमध्य प्रत्येक शिक्षक व पालकांसाठी मार्गदर्शक आहे. पती श्री. राजेंद्र शिंदे यांच्या पाठिंब्याने आणि आपल्या जिद्दीने केलेला 'आदर्श शिक्षक' पर्यंतचा प्रवास खरोखर प्रेरणादायी आहे. 'पहा, ऐका आणि करा' या अध्यापन पद्धतीतून तसेच कृष्ण–सुदामा यांच्या उदाहरणांतून दिलेली मूल्यशिक्षणाची शिकवण आम्हाला नक्कीच मार्गदर्शक ठरेल. आपण दिलेल्या अमूल्य वेळ व मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक आभार आणि आपल्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद....!

●●●

# लाडकी लेक

**शितल पाटील**
बीएड द्वितीय वर्ष

लेक म्हणजे मनाचा हळवा कोपरा
लेक म्हणजे आनंदाचा अखंड झरा

लेक म्हणजे घरची शान
लेक म्हणजे आई बापाचा मान

लेक म्हणजे कुणाची पत्नी
तर कुणाची सून असती ती

पण याआधी आई-वडिलांची
लेक असते ती

आमच्या जीवनाचा सुखाचा सागर घेऊन
आली आहे एक छोटीशी  परी

स्वर्गातील एक लहानसा तुकडा
देवाने पाठवला आहे माझ्या घरी

लेक म्हणजे अमृताचे बोल
तिच्या अस्तित्वाने होती सगळे क्षण अनमोल

लेकीच्या अस्तित्वाने आयुष्य बदलले
तिच्या जन्माने जीवनाचे सार्थक झाले

लेक ही नसते कोणाच्या डोक्याचा भार
तर असते कोणाच्या तरी जीवनाचा आधार

लेक म्हणजे असते आनंदाचा झरा
ती असते कडकडीत उन्हातला गार वारा

नेहमीच असते ती घरची भाग्याची लक्ष्मी
तिच्यामुळेच नांदते सुख-समृद्धी तुमच्या सदनी

# शिक्षण धोरण (NEP 2020) – भविष्य घडवण्याचा नवा मार्ग




**नमिता रमेश अपसिंगेकर**
(बी. एड. प्रथम वर्ष)

तंत्रज्ञान, ज्ञान आणि भाषा यांचा सेतू

**पात्रे :** आजोबा, आजी, शालेय विद्यार्थी: १. राघव २. जानकी , महाविद्यालयीन विद्यार्थी :१.केदार, २.राधिका

(मुले शाळेतून आली आणि आजी-आजोबांना भेटण्यासाठी त्यांच्याकडे धावली)

**जानकी:** आजी-आजोबा, आम्ही शाळेतून आलो आहोत. आज शाळेत खूप उत्साहवर्धक दिवस होता.

आजी : अरे वा! असं आज काही खास घडलं का?

**जानकी :** आज आमच्या शाळेत इलेक्ट्रॉनिक प्रकल्प आणि एआय इंटरफेस यावर एक सत्र होते.

राघव: आज आम्ही सर्जनशील कार बनवण्याचा उपक्रम केला. तसेच आम्हाला नवीन शिक्षण धोरणाबद्दल माहिती देण्यात आली.

**आजोबा :** छान! नवीन शिक्षण पद्धतीमुळे मुलांच्या कौशल्यांचा विकास होतोय असं दिसतं.

**जानकी :** हो आजोबा. आता केवळ पाठांतर नाही, तर प्रत्यक्ष जीवनातील कौशल्यांवर भर दिला जातो.

**आजी :** तंत्रज्ञानामुळे शिक्षण धिक प्रभावी होत आहे.

**राघव :** हो, शाळेत डिजिटल साधने, ऑनलाइन शिक्षण आणि प्रकल्प आधारित अभ्यास सुरू आहे.

**आजी :** फारच छान! भविष्यात ते तुमच्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.

**जानकी:** या बदलांमुळे आम्ही खूप आनंदी आहोत. आमच्या आवडीप्रमाणे विषय निवडण्याची संधी मिळते.

**आजोबा:** हा काळ खूप चांगल्या बदलांचा आहे. यामुळे तुम्ही चांगल्या प्रकारे भविष्यासाठी सज्ज होऊ शकता
आणि वास्तविक जीवनात येणाऱ्या आव्हानांसाठीही तयार असाल.

**राधिका :** (आत येत ) नमस्कार आजी- आजोबा ... अरे, इथे कोणत्या बदलावर चर्चा चालू आहे ? मुलांनो, काय विशेष? तुमचे सत्र कसे होते?

**जानकी:** ताई, आमचे सत्र खूप छान होते आणि आम्हाला खूप नवीन माहितीही मिळाली.. आम्ही आजी-आजोबांना आमच्या शाळेतील वेगवेगळ्या बदलांबद्दल सांगत आहोत.

**राघव:** हो, आता तुमच्या कॉलेजप्रमाणे आमच्या शाळेतही नवी

तंत्रज्ञान (टेक्नॉलॉजी) आले आहे. शाळेतही इंटरॲक्टिव्ह डिजिटल उपकरणे बसवली आहेत.

**जानकी:** केदार दादा, आम्हालाही ही उपकरणे आणि ऑनलाइन साधनांचा वापर करण्याची संधी मिळते आहे.

**आजी:** खूप छान! तंत्रज्ञानामुळे अभ्यास अधिक रंजक आणि प्रभावी होऊ शकतो. बघा, शिक्षण किती वेगाने बदलत आहे.

**केदार:** फक्त तेवढंच नाही आजी, आता शिक्षणात मुलांच्या मानसिक आरोग्य आणि भल्याकडेही लक्ष दिले जात आहे. शाळांमध्ये काउन्सेलर्स आणि सपोर्ट सिस्टीम (समुपदेशन आणि सहाय्य प्रणाली) असतात, ज्या तणावाशी सामना करण्यास मदत करतात.

**राधिका:** हो, त्यामुळे अभ्यासाचा ताण कमी होतो आणि मन शांत राहतं. आम्हाला शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठीही सहाय्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

**आजोबा:** हे खूप गरजेचे आहे. ऐकून खूप आनंद झाला की शिक्षणासोबतच मानसिक आणि भावनिक पैलूंनाही महत्त्व दिले जात आहे.

**राघव:** भविष्यात योग्य मार्ग निवडण्यासाठी शाळांमध्ये कौशल्य आणि करिअर वर्ग सुरू करण्यात आले आहेत. आमच्या आवडी आणि क्षमतेनुसार आम्ही त्यांची निवड करू शकतो.

**जानकी:** वास्तविक जीवनाशी संबंधित ज्ञान मिळाल्यामुळे आम्हाला हे वर्ग खूप आवडतात. या वर्गांमध्ये काहीतरी नवीन शिकण्याची उत्सुकता आणि कौशल्य विकसित होते.

**राधिका :** हो , तसेच मातृभाषेत अध्यापन शिक्षण प्रक्रियेच्या वापराला देखील प्रोत्साहन देत आहेत.

**आजी :** हे ऐकून खूप समाधान वाटत आहे.

**जानकी (उत्सुकतेने) :**म्हणजे काय? आम्ही तर शाळेत बऱ्याच विषयांना इंग्लिशमध्ये शिकतो.

**केदार :** हो, पण आता पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून – म्हणजे ज्या भाषेत ते घरात बोलतात त्या भाषेत – शिकवण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे शिकणं खूप सोपं होतं.

**राघव :** हो! मी विज्ञानाचा मराठीत वाचला तेव्हा मला खूप पटकन समजलं. आधी इंग्लिश शब्द समजावून घ्यायला वेळ जायचा.

**राधिका:** तेच तर! मातृभाषेत शिकताना मुलांना भीती वाटत नाही. प्रश्न विचारायलासुद्धा धाडस येतं.

**आजी :** अगदी बरोबर! आमच्या लहानपणी तर सगळं मराठीत होतं. म्हणूनच आम्हाला गणित, भाषा, इतिहास सगळं सहज कळायचं.

**आजोबा** : मातृभाषेतून शिकणं म्हणजे फक्त भाषा शिकणं नाही. ते आपली विचार करण्याची शक्ती वाढवते , ती मजबूत बनवते.

**जानकी:** म्हणजे आपण मराठीमध्ये शिकून मोठे वैज्ञानिक, डॉक्टर, इंजिनियर होऊ शकतो का?

**आजोबा (हसत) :**का नाही? ज्ञानाला भाषा अडथळा नसते! खूप मोठे शास्त्रज्ञ, लेखक, संशोधक यांनी त्यांच्या मातृभाषेतून शिकूनच मोठी कामगिरी केली आहे.

**राधिका:** आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये एक छान गोष्ट लिहिली आहे —
"भाषा म्हणजे ज्ञानाकडे जाणारा पूल." ज्या भाषेत आपण विचार करतो, त्या भाषेत शिकल्यास समज अधिक चांगली होते.

**केदार:** हो, आणि नंतर जेव्हा इंग्लिश किंवा इतर भाषा शिकायची असेल, तेव्हा तीही आपण सहज शिकतो. कारण आपल्या संकल्पना आधीच स्पष्ट झालेल्या असतात.

**आजी :** बरोबर! पाया मजबूत असेल तर इमारत मजबूत उभी राहते.

(सर्वजण होकार देतात.)

**जानकी (आनंदाने) :**म्हणजे आता आम्ही मराठीतून शिकताना अभिमान बाळगू शकू!

**केदार:** हो, आणि मला वाटतं की आपल्या स्वतःच्या भाषेचा आदर करणं म्हणजे आपल्या संस्कृतीचा आदर करणं आहे.

**राघव:** आणि बघा, मातृभाषेतून शिकवल्यामुळे आई-बाबांनाही आम्हाला अभ्यासात मदत करता येते. आधी ते "हे प्रश्न काय आहेत?" असं विचारायचे.

**राधिका:** हो! त्यामुळे घरातही शिकण्याचं वातावरण तयार होतं.

**आजोबा:** मातृभाषेचा वापर शाळेत वाढला तर मुलांची सर्जनशीलता, तर्कशक्ती आणि कल्पनाशक्ती वाढते. कारण विचारांची भाषा आणि शिकण्याची भाषा सारखी असते.

**आजी :** शिवाय, मुलांना आपलेपणा आणि आत्मविश्वास वाटतो.

**जानकी:** मला तर आता मराठीत कविता, गोष्टी आणि विज्ञान शक्य तितकं शिकायचंय!

**राघव :** आणि आपण कल्पक भाषा वापरून आपले शोधही मराठीत लिहू शकतो!

(सगळे हसतात.)

**केदार:** मग ठरलं! आपण आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगू — शिकण्यात, बोलण्यात, आणि विचार करण्यात! आणि नवीन शिक्षण धोरणाचा हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवू!

**आजोबा :** शिक्षण हेच राष्ट्राचं भविष्य घडवणारं साधन आहे. शिक्षण माणसाला आत्मनिर्भर बनवतं आणि आत्मविश्वासही वाढवतं. नवीन शिक्षण धोरण म्हणजे तंत्रज्ञान, ज्ञान आणि भाषा यांना जोडणारा पूल आहे.

शिक्षणामुळेच उज्ज्वल भविष्य घडते!
"शिक्षण बदलते, भविष्य घडते !"


# पुस्तक परीक्षण: ‘स्वामी’ – एका ध्येयनिष्ठ नेतृत्वाचा अजरामर इतिहास

**अश्विनी बुट्टे**
बीएड प्रथम वर्ष

मराठी ऐतिहासिक कादंबरी विश्वात रणजित देसाई हे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या लेखणीतून उतरलेली स्वामी ही कादंबरी केवळ एक कथा नसून तो मराठा साम्राज्यातील एका सुवर्णकाळाचा जिवंत दस्तऐवज आहे. १७६१ साली झालेल्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांना पराभव पत्करावा लागला. त्या भीषण पराभवानंतर डळमळीत झालेले हिंदवी स्वराज्य ज्या महापुरुषाने सावरले त्या थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावर आधारित ही कादंबरी आहे.

अवघ्या १६ वर्षांच्या माधवराव पेशव्यांनी विस्कटलेली घडी कशी बसवली, याचा हा रोमहर्षक प्रवास यात दिला आहे. या कादंबरीला १९६४ सालचा 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला आहे, जो या कलाकृतीचा दर्जा अधोरेखित करतो. कादंबरीतील कथा, पात्रे आजही वाचकांना मराठ्यांच्या इतिहासाशी जोडून ठेवतात.

कादंबरीचे कथानक माधवराव पेशव्यांच्या पेशवाई वस्त्रे स्वीकारण्यापासून सुरू होते. त्यांच्यासमोर दुहेरी आव्हान होते: एकीकडे निजाम आणि हैदर अलीसारखे बाह्य शत्रू आणि दुसरीकडे घरगुती कलह. विशेषतः त्यांचे काका रघुनाथराव (राघोबादादा) यांची सत्तालालसा आणि आई गोपिकाबाईंचा करारी स्वभाव यांमधील संघर्षाचे चित्रण लेखकाने अतिशय बारकाव्याने केले आहे. माधवरावांनी आपल्या अल्पायुष्यात स्वराज्य पुन्हा कसे उभे केले, हे वाचताना अंगावर शहारे येतात. लेखकाने थोरल्या माधवराव पेशव्यांना केवळ एक नायक म्हणून न रंगवता, एक हाडामांसाचा माणूस म्हणून उभे केले आहे. त्यांच्यातील न्यायप्रियता, शिस्त आणि 'क्षय' रोगाशी झुंज देत असतानाही स्वराज्याप्रती असलेली त्यांची निष्ठा प्रेरणा देणारी आहे. रमाबाईंची व्यक्तिरेखा या कादंबरीचा आत्मा आहे. पतीच्या प्रत्येक संघर्षात सावलीसारखी सोबत देणारी ही सती, भारतीय स्त्रीच्या त्यागाचे आणि संयमाचे प्रतीक वाटते. रघुनाथराव (राघोबादादा) हे एका महत्त्वाकांक्षी पण अस्थिर मनाच्या माणसाचे चित्रण लेखकाने अत्यंत तटस्थपणे केले आहे. रणजित देसाई यांची भाषा ओघवती आणि चित्रदर्शी आहे. वाचताना आपण प्रत्यक्ष त्या कालखंडात वावरत आहोत, असा भास होतो. कादंबरीतील संवाद अतिशय धारदार आहेत. उदा. माधवराव आणि राघोबादादा यांच्यातील वैचारिक मतभेद ज्या संवादांतून प्रकट होतात, ते लेखकाच्या लेखणीचे सामर्थ्य दाखवतात. पेशवाई काळातील शिष्टाचार आणि भाषेचा लहेजा लेखकाने हुबेहूब जपला आहे. एक भावी शिक्षक म्हणून या कादंबरीकडे पाहताना, यात 'नेतृत्व व्यवस्थापन' आणि 'नैतिकता' यांचे उत्तम धडे मिळतात. प्रतिकूल परिस्थितीतही डगमगून न जाता ध्येयाकडे वाटचाल




कशी करावी, याचे माधवराव हे उत्तम उदाहरण आहेत. इतिहासाचे पाठ्यपुस्तक जे देऊ शकत नाही, ते मानवी भावनांचे दर्शन ही कादंबरी घडवते. इतिहासाचे जिवंत सादरीकरण, भावनिक ओढ आणि उत्कृष्ट व्यक्तिचित्रण हे या कादंबरीचे बलस्थान आहे. ही कादंबरी वाचकाला केवळ माहिती देत नाही, तर अंतर्मुख करते. परंतु काही प्रकरणांमध्ये राजकीय डावपेचांचे वर्णन अतिशय सविस्तर असल्याने कथेचा वेग मंदावल्यासारखा वाटतो. नवीन वाचकांसाठी काही ऐतिहासिक संज्ञा किंवा नाती समजून घेणे सुरुवातीला थोडे क्लिष्ट ठरू शकते. स्वामी ही केवळ एका पेशव्याची कथा नसून ती कर्तव्याच्या विजयाची गाथा आहे. वैयक्तिक सुख-दुःखापेक्षा राष्ट्रहित मोठे असते, हा विचार ही कादंबरी मांडते. मराठी साहित्यातील ही एक अजरामर आणि संग्रही असावी अशी कलाकृती आहे. प्रत्येक मराठी माणसाने आणि विशेषतः विद्यार्थ्यांनी ही कादंबरी एकदा तरी वाचायलाच हवी.

•••

# नातं गुरु शिष्याचं

**सरिता शिवाजी खोटे**
बीएड प्रथम वर्ष)

आम्ही तुमचे विद्यार्थी तुम्ही आमचे गुरु,
लहानपणापासूनच मानतो तुम्हाला कल्पतरू,
ओंजळभर पाणी द्या या रोपट्याला,
आम्हीही मोठ्या झाडाप्रमाणे बहरू,

शिकताना सतत भिरभिरत असतं तुमचं हे वेडं पाखरू,
तरीही तुम्ही उभे राहा पाठीशी बनून आमचे आधारु,
उडताना या भव्य आकाशात आम्ही स्वतःला सावरू,
स्वप्नांची उमेद द्या आम्हांला,आम्हीही खूप उंच लहरू.



चित्रपट परीक्षण: क्रांतीज्योती विद्यालय

# मराठी माध्यम – मराठी शाळा आणि मराठी भाषा टिकवण्यासाठी धडपड




**दिग्दर्शक / लेखक :** हेमंत ढोमे
**निर्मिती:** क्षिती जोग, विराज गवस, ऊर्फी काझमी, अजिंक्य ढमाळ
**प्रमुख भूमिका:** सचिन खेडेकर, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, प्राजक्ता कोळी, क्षिती जोग

**रूपाली अमित फाटक**
(बी. एड प्रथम वर्ष)

आजच्या इंटरनेट च्या युगात इंग्रजी माध्यमाचे आकर्षण किंवा गरज इतकी वाढली आहे की, आपली मातृभाषा आणि मराठी शाळा कुठेतरी मागे पडत चालल्या आहेत.इंग्रजी भाषेत बोलणाऱ्या लोकांना एक वेगळाच मान समाजात दिला जातो. इंग्रजी बोलणारा म्हणजे उच्च सुशिक्षित लोक. मराठी भाषेला मिळणारे दुय्यम स्थान याच संवेदनशील विषयावर भाष्य करणारा हेमंत ढोमे लिखित आणि दिग्दर्शित 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम ' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हा चित्रपट केवळ एक मनोरंजनाबरोबर मराठी शाळांना 'संजीवनी' देण्याचा एक प्रयत्न आहे.

## कथानक

कोकणातील एका गावात कथेची सुरुवात होते, गावातील निसर्ग खूप छान प्रकारे चित्रीकरण केले आहे. 'क्रांतीज्योती विद्यालय' या मराठी माध्यम शाळे भोवती कथा विखूरली आहे. ही तीच शाळा आहे जिने गावाला अनेक डॉक्टर, इंजिनिअर आणि मोठे अधिकारी दिले आहेत.शाळेचे मुख्याध्यापक (सचिन खेडेकर) हे अत्यंत तत्वनिष्ठ आणि मराठी भाषेवर नितांत प्रेम करणारे व्यक्तिमत्व त्या चित्रपटामध्ये आहे. त्यांच्या मते, शाळा ही केवळ इमारत नसून ती संस्कारांची खाण आहे. काळ बदलतो आणि गावात इंग्रजी माध्यमाच्या चकचकीत शाळा सुरू होतात. पालकांचा कल हळूहळू इंग्रजी शाळांकडे झुकू लागतो. पालकांना वाटते की इंग्रजी शिकल्याशिवाय प्रगती नाही, आणि याच ओढीत ते आपल्या मुलांना मराठी शाळेतून काढून इंग्रजी शाळेत प्रवेश घेतात. परिणामी, क्रांतीज्योती विद्यालयाची पटसंख्या झपाट्याने घटते. पटसंख्या कमी झाल्यामुळे सरकारकडून मिळणारे अनुदान थांबते. शाळेत मिळणाऱ्या सोयीसुविधांचा अभाव निर्माण होतो. सरकारी अधिकारी 'अनास्था' दाखवत शाळा बंद करण्याचा नोटीस पाठविण्यात येते. याच काळात सचिन खेडेकर यांचे पात्र एक जळजळीत सत्य मांडते की, आपण अशा पिढीचे आहोत ज्याला आपल्याच मातृभाषेची लाज वाटू लागते. शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर असताना, माजी विद्यार्थी मुख्याध्यापकांच्या पाठीशी उभे राहतात.(सिद्धार्थ चांदेकर , अमेय वाघ आणि इतर) एकत्र येतात. त्यांना जाणीव होते की, आज ते जे काही आहेत, ते याच मराठी शाळेमुळे आहेत.

सिद्धार्थ चांदेकरचे ह्यांचे पात्र आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि सोशल मीडियाचा वापर करून या शाळेची अवस्था जगासमोर मांडतात. 'मराठी शाळा वाचवा' ही एक लोकचळवळ उभी केली जाते. गावातल्या लोकांना आणि पालकांना हे पटवून देण्याचा प्रयत्न केला जातो की, मराठी माध्यमात शिकूनही मुले जागतिक स्तरावर यशस्वी होऊ शकतात.

शाळा वाचवण्यासाठी कायदेशीर लढा, गावकऱ्यांचे प्रबोधन आणि माजी विद्यार्थ्यांचे योगदान असा एक भावनिक प्रवास सुरू होतो. चित्रपट एका अशा वळणावर येतो जिथे जुन्या आठवणी, मैत्रीचा ओलावा आणि मातृभाषेचा स्वाभिमान यामुळे गावकरी पुन्हा आपल्या मुलांना मराठी शाळेत पाठवण्याचा निर्णय घेतात. शेवटी, सरकारी अनास्थेवर मात करून 'क्रांतीज्योती विद्यालय' पुन्हा नव्या उमेदीने उभे राहते. हा चित्रपट सांगतो की, भाषा कोणतीही असो, शिक्षणाचा पाया हा मातृभाषेतूनच भक्कम होतो. मराठी शाळांना वाचण्यासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी भाषेला महत्व, उजाळा देण्याचा प्रयत्न दिसून येतो. मराठी भाषेचा उगम उत्तरेकडून झाला. मराठी भाषा मूळ आर्यांची भाषा ओळखली जाते. जवळपास १५०० वर्षांचा इतिहास जपणारी मराठी भाषा आहे. उत्तरेकडील सातपुडा पर्वता पासून ते कावेरी नदीच्या पश्चिमेकडील प्रांतापर्यंत, उत्तरेस दमणपासून दक्षिणेकडे गोव्या पर्यंत मराठीचा विस्तार झाला आहे. प्रामुख्याने महाराष्ट्राच्या दक्षिण भागात मराठी भाषा विकसित झाली. येथील सह्याद्री, सातपुडासारख्या डोंगररांगा, किल्ले, दऱ्याखोऱ्यांचा परिसर म्हणजेच महाराष्ट्र भूमी, मराठी भूमी म्हणून ओळखली जाते.

## दमदार अभिनय

**सचिन खेडेकर:** एका निष्ठेवान मुख्याध्यापकाच्या भूमिकेत सचिन खेडेकर यांनी अभिनयाची उंची गाठली आहे. त्यांचे संवाद काळजाला भिडतात विशेषतः त्यांनी म्हटलेले हे वाक्य— "या पृथ्वीवरची पहिली जमात असेल आपली, ज्याला आपल्याच मातृभाषेची लाज वाटते"— हे प्रेक्षकांच्या मनात घर करून जाते. मुख्याध्यापक कसा असावा हा आदर्श त्यांनी ठेवला आहे. आजच्या डिजिटल युगात, नातेवाईक दुरावून लोक स्वार्थी होऊन अधिकाधिक धन संपादन करण्याच्या प्रयत्ना मध्ये आहेत. चिखलात एखादे कमळ फुलावे तसें पात्र मुख्याध्यापकाचे दाखवले आहे. **अमेय वाघ:** अमेय वाघ यांनी विनोदाची भूमिका अतिशय कौशल्याने साकारलेली आहे. त्यांचे मराठी भाषेवर असलेले प्रेम आणि त्यांनी अभिनयात आणलेली विनोदी झाक चित्रपटाला रंजक बनवते. अमेय वाघ याच्या बबन म्हात्रे या पात्राने अमावस्या आणि पौर्णिमा यातील फरक आपल्या मातृभाषेत सोप्या पद्धतीने मांडून, मातृभाषेचे महत्व अधोरेखित केले आहे. 'सहलीला जायचं' या कडव्यावर लहान मुलांना किंवा विद्यार्थी वर्गाला कशा प्रकारे आनंद होतो हे व्यक्त केले आहे. मागील बाकावरील मुले ही यशस्वी होतात हे दाखवले आहे.

**सिद्धार्थ चांदेकर :** सिद्धार्थने 'सोशल मीडिया' चा वापर करून एका शाळेचा आवाज जगापर्यंत कसा पोहोचवता येतो, हे प्रभावीपणे दाखवले आहे. क्षिती जोग यांनी हसीना अंतूले असे पात्र साकारले आहे. गरीब कुटुंबातील मुले मराठी शाळेत फी कमी असल्याने शिकू शकतात हे त्यात अधोरेखित केले आहे. काही मुले मनाने हळवी असतात त्यांना मुलाने चिडवले की ते मानसिकरित्या चलबिचल होतात हा ही संदेश ह्या पात्रातून दिला आहे. पण तीच गरीब, हळवी मुलगी पुढे जाऊन कणखर पोलीस अधिकारी होते. प्राजक्ता कोळी यांनी अंजली राणे उर्फ अंजु ची भूमिका साकारली आहे. जीवनात पुढे जाण्यासाठी ची धडपड त्यात बऱ्याच नात्याचा त्याग त्यात दिसत आहे. नंतर अशाच द्विविधा मनस्थिती मध्ये अंजु चित्रपटात दिसत आहे. आणि विराज गवस आणि अशा बऱ्याच कलाकारांनी आपापल्या पात्रांना योग्य न्याय दिला आहे. हेमंत ढोमे यांचे दिग्दर्शन वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी विषयाचे गांभीर्य कुठेही ढळू दिले नाही. चित्रपटाची सुरुवात थोडी संथ वाटत असली, तरी कथेचा विकास आणि भावनिक वळणे प्रेक्षकांना स्थिरावून ठेवतात. निसर्गरम्य शाळा, वर्गातील बाके, खडू-फळ्याचा आवाज यातून त्यांनी एक जिवंत माहोल उभा केला आहे.

## चित्रपटाची जमेची बाजू

मराठी माध्यमाच्या शाळेत शिकून हजारो विद्यार्थी जगभरात मोठ्या पदांवर गेलेले आपल्याला दिसून येतात, ही वस्तुस्थिती ह्या चित्रपटात ठळकपणे मांडलेली दिसून येते. मातृभाषेचा अभिमान बाळगणे म्हणजे इतर भाषांचा द्वेष करणे नव्हे, तर आपल्या मुळांना न विसरणे होय, हा संदेश यात दडलेला आहे. गंभीर विषय असूनही चित्रपटात मैत्री, विनोद आणि भावनिकता यांचा सुरेख संगम आहे. सरकारी अनास्थेमुळे कुलूप लागण्याच्या वाटेवर असलेल्या शाळांना पुन्हा उभारी देण्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने हा चित्रपट पाहणे गरजेचे आहे. आपली मुले इंग्रजी शिकलीच पाहिजेत, पण त्यांना मराठी संस्कारांपासून तोडू नये, अशी शिकवण ह्या चित्रपटातून दिलेली दिसून येते. "मायबोलीचा सन्मान आणि मराठी शाळेचा अभिमान म्हणजे - क्रांतीज्योती विद्यालय!"

## हा चित्रपट का पहावा?

मराठी शाळांचे महत्त्व समजून घेण्यासाठी, आपल्या मातृभाषेचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी तसेच सचिन खेडेकर आणि अमेय वाघ यांचा कसदार अभिनय पाहण्यासाठी . आपल्या मराठी शाळांना संजीवनी देण्यासाठी सर्वांनी हा चित्रपट पहावा असे मला वाटते. प्रत्येकाने हा चित्रपट पाहिल्यानंतर आपली मराठी शाळा व भाषा जपण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. या चित्रपटातील कलाकारांनी आपली शाळा वाचवण्यासाठी जे प्रयत्न केले तेच प्रयत्न चित्रपटा पुरते मर्यादित न ठेवता सर्वांनी आपल्या शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

●●●

# चारोळी

**धनश्री वैद्य**
बीएड प्रथम वर्ष

## मकरसंक्रांत

एचढूश्या तिळाची,
मूर्ती किती लहान,
पण गुळ आणि साखरे सोबत,
तोंड गोड करतो छान.
पतंगासोबत घेऊ भरारी
उंच उंच आकाशी,
पण आज आधी तिळगुळ घ्या,
अन गोड गोड बोला आमच्याशी.

## दिवाळी पहाट

सुगंधी उटणे आणि सुवासिक तेल,
सोबतीला तिखट गोड फराळाची रेलचेल,
अलगद थंडी पक्षांचा किलबिलाट,
आनंदी होवो तुमची दिवाळी पहाट.

## गणपती चतुर्थी

भाद्रपदातील चतुर्थीची पाहतो वर्षभर वाट,
बाप्पाच्या स्वागतासाठी दिव्यांचा झगमगाट,
मोदकाच्या नैवेद्याने सजलेले ताट,
बाप्पाचा माझ्या वेगळाच थाट.

## महिला दिन

जन्म घेते ती कन्यारत्न म्हणून, घडते ती बाबांची
मुलगी म्हणून, सुखात नांदते सासरी सून म्हणून,
सुखावते जीवनात आई होऊन, पूर्णत्व लाभते तिला
आजी होऊन,
अशा या बहुरूपी नारीला महिला दिनाच्या शुभेच्छा
भरभरून.

## निवडणुका

निवडणुकीच्या रणधुमाळीत भल्याभल्यांची डोकी
झाली आहेत बंद, आणि गल्लीतल्या दादा- ताईंना
मात्र जडला आहे निवडणूक लढवण्याचा छंद.

# शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | १२ | १३ | १४ | | | | | |
| | १५ | १६ | १७ | १८ | | | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| २४ | | | | २५ | | | २६ | २७ | २८ | | |
| २९ | | | ३० | ३१ | | | ३२ | | | | |
| ३३ | ३४ | | ३५ | ३६ | | | ३७ | ३८ | ३९ | ४० | |
| ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | | ४६ | | | ४७ | | |
| ४८ | ४९ | ५० | ५१ | ५२ | ५३ | ५४ | | | ५५ | | ५६ |
| ५७ | ५८ | | | | | ५९ | | | ६० | | ६१ |
| | | | | ६२ | ६३ | ६४ | ६५ | | ६६ | | ६७ |
| | ६८ | | | | | ६९ | ७० | ७१ | ७२ | | ७३ |
| ७४ | ७५ | | | | | ७६ | | ७८ | ७९ | ८० | |

## आडवे

१. प्रसिद्ध मराठी कवी –
६. कादंबरी लिहिणारा -
१२. भाषा व संस्कृतिचा पाया –
१५. संताची कविता -
१९. एक मराठी कादंबरीचे सिनेमात रूपांतर –
२६. रचनांचे रूप –
३७. अरुण कोलटकर याचे एक पुस्तक –
४१. वसंत बापट यांचे एक पुस्तक –
५०. कृष्णाजी केशव दामले यांचे टोपन नाव -
६२. ग्रंथ लिहिणारा –
७०. दिवसाची सुरुवात –
७४. कधीही न थांबणरी -
७८. सारोजिनी बाबर यांची एक रचना -

## उभे

१२. "श्यामची आई" यांचे लेखक –
२९. 'मृत्युंजय' कादंबरीचे लेखक –
२६. काव्य लिहिणारा –
३०. वाचण्याची रचना –
३४. स्त्री कवी –
३९. पु. ल. देशपांडे यांचे पुस्तक –
४६. "तुका म्हणे" याचे अभंगकार –
५६. महाभारताचे रचनाकार –
६८. नेहमी बदलानारा -

पूजा राहुल चव्हाण

द्वितीय वर्ष बी. एड.




कम्युनिटी एंगेजमेंट उपक्रमांतर्गत बीएड प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी नवक्षितिज शाळेला भेट देऊन विविध उपक्रम राबवले.




सामाजिक उपक्रमांतर्गत गतिमंद मुलांच्या शाळेत बीएड प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबवले.




वार्षिक स्नेहसंमेलनात बक्षिस मिळालेले विद्यार्थी मार्गदर्शक प्राध्यापकांसह.




रांगोळी स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी नेहा पोवार.



९) योगासनांची प्रात्यक्षिके करताना विद्यार्थी.



आविष्कार प्रकाशन

ISBN 978-93-95127-04-2

**स्नेहवर्धक मंडळ सोशल अ‍ॅन्ड एज्युकेशन ट्रस्ट**

बी.एड कॉलेज, २५ पंचवटी, बालविकास विद्यालयाच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे